

REFBK-0012410
विषय चारंभ
सं. क्र. 1038
१०६२

# आफिसर

यशवन्त

३२१८२
४१५६२
१०३८
परिश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२१८२ वि: परिश
क्रमांक १०३८ नों दि ४१५६२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32902 दि: [illegible]
क्रमांक 2032 [illegible]

रविकिरण मंडळाचें सत्तेचाळिसावें पुस्तक

# हापिसर

REFBK-0012410
REFBK-0012410

य. दि. पेण्ढरकर

दा. क्र. [illegible]

© यशवन्त दिनकर पेण्ढरकर

प्रकाशक
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २

प्रथम मुद्रण
जानेवारी १९६२

छायाचित्र
प्रा. श्री. बा. रानडे

मुद्रक :
सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर,
५८० सदाशिव पेठ, पुणें २.

मूल्य साडे तीन रुपये

*चिरंजीव*

**सौ. माई**

*आणि*

**कु. काशीताई**

*या दोघां बहिणींना*

मकर संक्रान्त,

१४-१-१९६२

१२४१०

प्रस्तावना

# " चरित्र त्यांचें पहा जरा "–

" थोर महात्मे होउनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा ", ह्या कविवचनाचा अर्थ स्पष्ट आहे, आणि त्यांत पुरेपूर अर्थ आहे. सामान्य माणसाला कुंठित-मति होण्यासारखे प्रसंग पदोपदीं येत असतात. अर्थातच तो भांबावून जातो. 'काय करावं ? कसं पार पडावं ह्या प्रसंगांतून ? ' अशा प्रश्नांनीं तो बेचैन होत असतो. सल्लामसलतीसाठीं आप्तस्वकीयांकडे धांव घ्यावी, असें त्या त्या वेळीं त्याला वाटत असतें. पण कित्येक अडचणी अशा असतात कीं, त्या दुसऱ्याजवळ सांगण्यासारख्या नसतात किंवा त्या अडचणींचा बागुलबुवा आपल्या ज्या परिस्थितीमुळें आपणाला वाटत असतो त्या परिस्थितीचें दुसऱ्यांना नीट आकलन न झाल्यामुळें ते सल्लामसलत देऊं शकत नाहींत. शिवाय उठल्या-बसल्या सल्लामसलतीला दुसऱ्याकडे पळण्याइतका अवसर तरी कुठें असतो ? तेव्हां, प्राप्त परिस्थितींतून पार पडण्यासाठीं आपल्याला वेळच्या वेळीं उपाय सुचावेत म्हणून थोरामोठ्यांच्या चरित्राचा अभ्यास करून ठेवलेला असावा, असें वरच्या कविवचनांत सांगून ठेवलेलें आहे. थोरामोठ्यांचें थोरपण त्यांनीं आपल्या आयुष्यांत ज्या लढाया मारून फत्ते मिळविलेली असते, त्यांनीं सिद्ध झालेलें असतें. अर्थात् त्यांच्या अडी-अडचणींशीं त्यांच्या पेंच-प्रसंगांशीं, त्यांच्या संकट-संग्रामांशीं आपल्या सामान्यांच्या

जीवितांतील विकट प्रसंगांची तुलना होणार नाहीं. तरीहि मानवी मन कोणत्या प्रसंगीं कसें चाललें हें कळल्यानें, आपल्या परीनें आपल्यापुढें आलेल्या प्रसंगाशीं कसें तोंड द्यावें याचा कांहींसा बोध व्हायला हरकत नाहीं. अशा रीतीनें, उच्च स्थानावर जे विराजमान झालेले असतात त्यांच्या अंगचें असामान्य कर्तृत्व व अलौकिक गुण समाजाला मार्गदर्शक होत असतात. आणि म्हणूनच त्यांचीं चरित्रें गायिलीं जातात. उलट, मुळांत अत्यंत निकृष्ट परिस्थितींत व अज्ञात अवस्थेंत असलेले जे कोणी पुरुष आपल्या अंगच्या कर्तृत्वानें व अलौकिक गुणसंपन्नतेनें समाजाचें अग्रस्थान पटकावतात त्यांचीहि वाटचाल जनतेला प्रोत्साहक होत असते. या अनुरोधानें, मोझेस हार्वे याचे उद्‌गार आठवतात. तो म्हणतो, थोर महात्मे आपल्यापेक्षां कितीतरी उच्च स्थानीं असले, तरी त्यांच्याविषयीं आपल्या मनांत भ्रातृभाव वाटूं लागतो आणि त्यांना प्राप्त झालेल्या महत्पदावरून, मनुष्याच्या सामान्यत्वांतहि केवढ्या थोरवीची संभाव्यता अवगुंठित आहे याचा प्रत्यय येतो. त्यांनीं जें उच्च शिखर गांठलेलें असतें त्या शिखरावरून झळकत असलेल्या त्यांच्या व्यक्तित्वाच्या किरणशलाका जणूं कांहीं पायथ्याशीं असलेल्या लोकांना वर येण्याला आवाहनच करीत असतात.

हें जरी खरें असलें तरी सामान्य स्थितींतून निघून अत्युच्च पदावर आरूढ होण्याचें भाग्य, गुण-चारित्र्य-कर्तृत्व यांत कमतरता नसूनहि, सर्वांनाच मिळत नाहीं. तें शिखर प्राप्त व्हायला गुणसंपन्नतेबरोबर दैवाची अनुकूलताहि हवी असते. ती अनुकूलता न मिळाल्यानें शिखरावर आरूढ होण्याचें भाग्य न लाभल्यानें, त्यांच्या चरित्राकडे (संबंधितांव्यतिरिक्त) कुणाचें लक्ष जाणार ?

पण म्हणून ह्या चारित्र्यवानांना समाज-जीवनांत कांहीं स्थान नाहीं असें नाहीं. किंबहुना, महासागरांतील दीपगृहाप्रमाणें थोर महात्म्यांचीं चरित्रें मानवी जीवनाच्या महोदधीवर उपकारक असलीं, तरी अशीं दीपगृहें दूर राहतात आणि सामान्यांना आपापल्या घरकुलांत व अंगणांत पणती, कंदील, दिवटी अशांचा–कांहींना कांहीं–उजेड हवा असतो. आणि महात्म्यांचीं देदीप्यमान चरित्रें समाजाला जितकीं उपकारक असतील तितकींच किंबहुना

त्यांहूनहि अधिक अशीं मिणमिण प्रकाश देणारीं चरित्रें उपकारक होतात. गांवांत सार्वजनिक स्वरूपाचें एखादें देवालय असलें आणि त्यांतील कथा-कीर्तनें, भजन-पुराणें, उत्सव-समारंभ, काकड आरतीपासून शेजारतीपर्यंत सर्व उपासनाप्रकार, ह्यांचें गांवकऱ्यांना आकर्षण असलें तरी घरगुती देवघर, देव्हारा, निदान देवळी ह्यांतील देवमूर्तीवरच घरोघरच्या भावभक्तीची गुजराण होत असते. या घरांतल्या देवांकडे गांवकऱ्यांपैकीं कोणींहि ढुंकून पाहत नसलें तरी, देवपण काय तें सार्वजनिक देवालयांत आहे आणि माझ्या कोनाड्यांतल्या मूर्तींत नाहीं, असें थोडेंच आहे? तद्वतच, सामान्य स्थितींतल्या – म्हणजे इतिहासांत ज्यांचे पोवाडे गायिले जायचे नाहींत अशा सामान्य कोटींतल्या – गुण-चारित्र्य-शीलयुक्त माणसाची समाजांत आवश्यकता असते. अशीं माणसें जितकीं अधिक तितका तो समाज सामर्थ्यवान् होय. Great countries are those that produce great men. पण ह्या उक्तींतील great ह्या विशेषणाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. भरजरी शालू, शेला, पैठणी यांची मौल्यवान वस्त्रांत गणना होते. रास्तच आहे तें. जरीचे कांठ, जरीचे लफ्फेदार पदर, अंगभर जरीचें भरतकाम, ह्यांच्या वाढत्या प्रमाणांत त्या वस्त्राचेंहि मोल वाढत जातें पण त्याचबरोबर त्या महावस्त्राचा पोतहि लक्षांत घ्यावा लागतो. वस्त्राचा टिकाऊपणा जरीच्या वैपुल्यानें सिद्ध होत नाहीं. वस्त्राच्या पोतावर त्याचा टिकाऊपणा अवलंबून आहे. जरीचे कांठ ही वस्तु मौल्यवान खरी, पण शोभादायक बाब झाली. त्या मौल्यवान् शोभेमुळें मोठमोठ्या समारंभांत ऐटीनें व मानानें मिरवतां येतें. पण पोत जर टिकाऊ नसेल तर? पादरफुसका पोत उपयोगी नाहीं. वस्त्राचें बळ पोताच्या पिळदारपणांत असतें. त्याचप्रमाणें, थोर महात्मे देशाच्या थोरपणाची ग्वाही देत असले तरी, त्या देशांतल्या समाजाचा सर्वसामान्य घटक कितपत कणखर आहे, कितपत टिकाऊ गुणांचा आहे, हा प्रश्न उरतो. पूज्य ते पूज्यच. त्यांचे जन्मोत्सव साजरे होतील, पुण्यतिथ्या साजऱ्या होतील; आणि आम जनता तार स्वरानें त्यांचा जयघोष करील. थोरांचा चरित्रग्रंथ पूजिला जाईल. पण, एव्हढें सारें झालें तरी समाजमन कोरडेंच राहण्याची शक्यता आहे. थोरांच्या

थोरवीचे पाझर समाजांत मुरले नाहींत तर काय उपयोग ? वाऱ्यानें धूळ उडून जाते, भिजलेली माती उडून जात नाहीं. समाज भुसभुशीत होत जातां कामा नये. त्याचा कसदार चिकटपणा कायम राहिला पाहिजे. वस्त्राचा पोत पिळदार हवा असें जें म्हणायचें तें ह्या अर्थानें. गुण-चारित्र्य-शीलसंपन्न सामान्य माणसांनींच समाज सामर्थ्यवान् होतो, असें म्हणायचें तेंहि याच अनुरोधानें आणि Great countries are those that produce great men ह्या उक्तींतील great शब्द लक्षांत घ्यायचा तोहि ह्या विवेचनाच्या अन्वयार्थानें. आपला भारत हा महान् देश आहे. कारण, महर्षि व्यास-वाल्मीकि, प्रभु रामचंद्र, भगवान् श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, छत्रपति शिवाजीमहाराज, लो० टिळक, महात्मा गांधी अशा अनेक विश्ववंद्य महात्म्यांची ती खाण आहे. पण त्याबरोबरच सर्वसामान्य मनुष्यहि चारित्र्यादि गुणांनीं भारलेला नसेल – आपला मर्यादित परीघहि प्रभावित करण्यास समर्थ नसेल तर देशाची महनीयता शिरोधार्य विभूतींच्या नांवांपुरतीच राहील आणि धकाधकीच्या जागतिक मामल्यांत त्या देशाचा मुळींच निभाव लागणार नाहीं. तो निभाव लागण्यासाठीं घरोघरच्या रमणींची कूस अनामिक नररत्नांची खाण ठरली पाहिजे. वरील उक्तींत हाहि अर्थ समाविष्ट आहे, असें मला वाटतें.

हें पुस्तक म्हणजे समग्र चरित्र नव्हे. एका सामान्य गृहस्थाच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे जे ठसे माझ्या चित्तावर उमटले त्यांचें हें चित्रण आहे. जन्म, बाल्य, शिक्षण, कर्तृत्व, वृद्धापकाळ, देहावसान इत्यादि गोष्टींचा संगतवार तपशील चरित्रांत आवश्यक असतो. त्यावरून त्या व्यक्तीचें मूल्यमापन करतां येतें. त्या व्यक्तीच्या जीवितांतील घडामोडी किती प्रमाणांत त्या काळाचा परिपाक होत्या, किंवा त्या घडामोडींनीं त्या कालखंडावर कांहीं ठसे उमटवले का, किंवा कालौघाला कांहीं गति दिली का, वगैरेंचा अंदाज घेतां येतो; कांहीं निष्कर्ष काढतां येतात. ह्या व्यक्तिचित्रणाचा तशा दृष्टीनें अर्थातच

उपयोग होणार नाहीं. कारण, हें कांहीं कोणा थोर महात्म्याचें चरित्र नव्हे; किंवा निकृष्ट स्थितींत जन्म पावून चढत-चढत महत्पदाला पोंचलेल्या थोर गृहस्थाचेंहि चरित्र नव्हे. थोर महात्म्यांच्या ग्रंथनिविष्ट चरित्राचे पाठ घेऊन पावन होणें निराळें, आणि प्रत्यक्ष एखाद्या तुल्यगुणी सामान्याच्या चारित्र्यानें उजळून निघणें निराळें. दीपगृह तें दीपगृहच. पण आपण कितीकजण दीपकळीच्या उजेडांतच वावरत नाहीं का? अशी दीपकळी जवळ असणें हेंच महद्भाग्य. ह्या जाणीवेनें हें चारित्र्यदर्शन घडविण्यांत येत आहे.

हापिसरांच्या सान्निध्यांत मी इतक्या उशीरां आलों कीं त्यांचें साद्यंत चरित्र माझ्या पाहण्यांत येणें शक्य नव्हतें. आणि तें कोणी पूर्णपणें सांगूं शकतील इतक्या जवळिकींतलेहि मला कोणी उपलब्ध नव्हते. मला साधारण समजूं लागलें तेव्हां हापिसर पेन्शनींत निघाले होते. त्यानंतरची त्यांची कालक्रमणा काय ती मीं पाहिलेली; आणि कांहीं विचार त्यांच्या तोंडून ऐकलेले. पण तेव्हढ्यानेंहि मी इतका संस्कारित झालों कीं कोणाहि दीपगृहतुल्य महात्म्याच्या चरित्राचा अभ्यास करायची तादृश गरज उरली नव्हती. माहात्म्य हें केवळ उत्तुंगपणांतच नाहीं; बारीक-सारीक गोष्टींतहि त्याचें प्रत्यंतर येऊं शकतें.

> In small proportions we just beauty see
> In small measures life may perfect be.
>
> —Benjamin Johnson.

ही उक्ति त्रिकालाबाधित सत्य आहे. हापिसरांचें मोठेपण ह्या कोटींतलें होतें. तें नीट ध्यानीं घेणाराला ह्या उक्तींतलें सत्य पटायला कांहीं हरकत नाहीं.

आपल्या पडवीला त्यांनीं 'दिवाणखाना' म्हणून भूषविलें होतें आणि मागीलदारीं 'रमणीय बाग' म्हणून पाटी लावली होती, असा जो पहिल्या प्रकरणांत मजकर आला आहे तो वाचतांना, बहुश्रुत वाचकाच्या ध्यानीं येईल कीं बाल्झॅक ह्या थोर कथालेखकाचा जीविताकडे पाहण्याचा दृष्टिकोन हापिसरांच्याहि मनोधर्माशीं जुळता होता. बाल्झॅकच्या चरित्रांत असें नमूद करून ठेवलें आहे कीं :

Honore De Balzac lived many years in a cold and all but empty attic. There was no flame in his fire place, no picture on his wall. But on one wall he inscribed with charcoal : " Rosewood panelling with Commode "; On another " Gobeline Tapestry with venetian mirror, " and in the place of honour over the fireless grate : " Picture by Raphael. "

—Edwin Foley,

बाल्झॅक हें नांवहि हापिसरांना ठाऊक नव्हतें आणि इंग्लिश साहित्याचें वाचन त्यांच्या आटोक्यांतलें नव्हतें. तथापि त्याची काय गरज ? थोर ते थोरच.– मग ते कुठल्याहि खंडांतले असोत. त्यांची मनोरचना अशी सम-पातळींतच आढळणार. आणि खऱ्या मोठेंपणाचें – मनाच्या मोठेपणाचें – लक्षणहि असेंच सांगितलें आहे कीं :

Great is he who enjoys his earthenware as if it were plate; and not less great the man whom all his plate is no more than earthenware.

—Sen.

जेवायला काटवट किंवा परळच असेल, पण चांदीच्या ताटांतूनच आपण जेवत आहों अशी मनांत समाधानी भावना असणें हें अभिजात मोठेंपणाचें गमक आहे. उलट, चांदीच्या ताट-वाटयाहि ज्याच्या हिशेबीं मातीच्या परळासमान होत त्याचेंहि विभूतिमत्त्व कांहीं कमी नव्हे. अशा तऱ्हेचें चारित्र्य हापिसरांच्या ठिकाणीं दिनानुदिन प्रत्यक्ष पाहत आलों असतांना विश्ववंद्य महात्म्यांचीं चरित्रें आवर्जून चाळण्याची जरुरी काय ? सार्वत्रिक थोरपणा प्राप्त न झालेले, पण भवसंग्रामांतले झुंजार वीर आपल्या जवळ-पास असतील तर त्यांच्या चारित्र्याच्या संस्कारानें आपणांस आपल्या आयुष्याला कांहीं आकार आणतां येतो.

ऋणमुक्त होण्याचें एकच एक व्रत हापिसरांनीं घेतलें होतें. आमरण त्याच व्रताचें ते अखंड पालन करीत आले. अखेरच्या घटकेपर्यंत ते त्याबाबत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 32982 दि: 25/6/7
क्रमांक 2035 नों. दि. 27/5/61



सावध होते. “आलों, थांबव शिंग ! दूता, आलों, थांबव शिंग” हें सुद्धां त्यांनीं म्हटलें नाहीं. दूत यायचाच काय तो अवकाश होता; तो येतांच त्यांची निघायची तयारी होती. मात्र त्याच्या शिंगाचा ललकार कानीं यायच्या क्षणापर्यंत त्यांनीं आ वलें तें देणें देऊन टाकलें—कृतज्ञतेच्या जाणीवेनें वाटलें तेंहि देणें देऊन टाकलें. ( शेवटलें प्रकरण पाहावें. )

ऋणमुक्त होण्याचा त्यांनीं जो अव्याहत ध्यास घेतला होता तो आज ध्यानीं घेतांना मला The Moon is Down ह्या कादंबरींतील मेयर ऑर्डेन याच्या चारित्र्याची आठवण होते. जॉन स्टीनबेक ( John Steinbeck ) यांनीं रेखाटलेलें त्या महापौराचें चारित्र्य हापिसरांच्या व्यक्तिमत्त्वाशीं कितीतरी जुळतें आहे. परचक्र आलें, नगरीचा ताबा जेत्यांनीं घेतला आणि ठिकठिकाणीं नाकेबंदी केली. नगरीचा महापौर ऑर्डेन व त्याचा मित्र डॉक्टर विंटर यांना त्यानीं राहत्या घरीं स्थानबद्ध करून टाकलें—जनतेनें प्रतिकारात्मक अत्याचार करूं नयेत म्हणून ओलीस ठेवून घेतलें. महापौर तसा गबाळा व विसरभोळा दाखवला आहे. खमिसाचीं मागील बाजू पाटलोणींत घालायलाहि तो विसरतो. त्याचे उखर-त्राखर शुष्क केस चाप-चोपून बसवण्याची दक्षता त्याच्या अर्धांगीलाच घ्यावी लागते. कोटाचीं बटणें आपण खालींवर लावलीं आहेत, हेंहि त्याच्या लक्षांत येत नाहीं. आणि महापौर-पदाचें मानचिन्ह (पदक असलेली सांखळी) गळ्यांत घालायचीहि त्याला आठवण नसते. त्याच्या सहधर्मिणीनें ‘नेहमींच तुम्ही विसरतां ही’ असें म्हणत, ती भूषा त्याला बैठकींत आणून द्यावी आणि त्यानें तिच्यापुढें मान तुकवावी ! असा हा महापौर ! जेत्यांनीं त्याला त्याच्या घरीं मित्रांसमवेत स्थानबद्ध केलें तेव्हां त्या दोघां मित्रांत त्या वेळीं गोष्टी निघाल्या त्या कोणत्या ? तर शालेय जीवनांतल्या ! ऑर्डेनवर आज जो आणीबाणीचा प्रसंग आला आहे तसाच प्रसंग सॉक्रेटिसवर आला असतांना त्यानें ज्या धीरगंभीर वृत्तीनें तोंड दिलें त्या त्याच्या वृत्तीचे निदर्शक जे त्याचे उद्गार त्यांची आठवण ऑर्डेनला झाली. विद्यार्थिवशेंत त्यानें सॉक्रेटिसची भूमिका केली होती. त्या भाषणाची उजळणी तो करूं लागला. किती वर्षांपूर्वीची

गोष्ट ? तेंहि ऑर्डेनला नीट आठवेना. तो म्हणाला, "चाळीस वर्षें झालीं असतील, नाहीं ?" विंटर म्हणाला, "दोस्त, शेहेचाळीस वर्षें झालीं शेहेचाळीस !" पण विस्मरणाची असली चूकभूल ऑर्डेनला नेहमींच द्यावी-घ्यावी लागे. पण सॉक्रेटिसचें तें भाषण – तब्बल शेहेचाळीस वर्षांपूर्वी विद्यालयांत असतांना पाठ केलेलें भाषण मात्र त्याच्या हृदयावर वज्रलेप झालें होतें. नुसतें 'वर' वज्रलेप झालें नव्हतें, तर, रोमरोमांत आणि रक्ताच्या कणाकणांत भिनलें होतें, आणि तदनुसार त्याच्या चारित्र्याचीच जडण-घडण झाली होती. (आपण शूर नाहीं, आपण तरवारबहाद्दर नाहीं ह्याची पूर्ण जाणीव असणाऱ्या त्या ऑर्डेनची – महापौराची – ती धीरोदात्त भूमिका किती हृदयस्पर्शी आहे तें मूळ कादंबरींतूनच वाचावें तेव्हां कळेल.) त्याला गिरफदार करून जेत्यांनीं चालवलें तेव्हां त्या अखेरच्या क्षणीं त्यानें आपल्या बालमित्राला एकच विनंति केली :

Crito, I owe a cock to Asclepius. Will you remember to pay the debt ?

मित्रानें तसें आश्वासन दिलें. त्यावर, दारांतून बाहेर पडतां पडतां, मागें वळून महापौर म्हणतो—

I remembered that one. I did not forget that one.

आपण आठवणीचे धड नाहीं, लोक आपणाला विसरभोळा म्हणतात. पण विस्मरण कशाचें होतां कामा नये ? तर, जें आपलें ब्रीद, जी आपली भूमिका, जें आपलें चारित्र्य त्याचें विस्मरण होता कामा नये. आणि, दुसरें म्हणजे, जें देणें द्यायचें आहे त्याचें विस्मरण होतां कामा नये. ऑर्डेननें जातां जातां जे उद्गार काढले त्यांच्या मुळाशीं हीच मनोधारणा नाहीं काय ?

The Moon is Down ह्या कादंबरींतल्या महापौराची ही व्यक्तिरेखा (परचक्र, महापौरपद वगैरे गोष्टी सोडून) हापिसरांच्या चारित्र्याशीं किती तरी जुळती आहे, असेंच नाहीं का ? "अहो, ती कादंबरी आहे." असा कोणी आक्षेप काढील, तर मी एवढेंच म्हणेन कीं कथा-कादंबरींतल्या व्यक्तिरेखांना वास्तवाचा भरभक्कम आधार असतो.

सारांश, सामान्य माणसांच्याहि आयुष्याचा कणा असा कणखर असला, अंगांत असा पीळ असला, नीतिमूल्यांबद्दल अशी प्रखर चाड असली तरच तो समाज सामर्थ्यशाली ठरतो. एक एक माणूस मिळून समाज बनतो, राष्ट्र बनतें.

सामान्य व्यक्तीची ही तेजस्वी चारित्र्य-रेखा ह्या हेतूनें सादर करण्यांत येत आहे. दैवाची मधून-अधून अनुकूलता लाभली म्हणजे मनुष्याला जीवित-यात्रेंत वाटचाल करतांना धीर येत असतो. कांहीं वेळ रखरखीत उन्हांतून जातांना पुढें लवकरच सांवली लाभेल, अशी आशा त्याला पाय उचलायला मानसिक बळ पुरवीत असते. हापिसरांना तो अनुभव आयुष्यांत कधींच आला नव्हता; दैवाची किंचितहि अनुकूलता वा कृपा चुकूनहि लाभली नव्हती. जें कांहीं लाभलें होतें तें उदंड प्रयत्नानें ! – सामान्यत: ज्या प्रयत्नानें कांहीं एक फळ लाभावें त्यापेक्षां कितीतरी पटींनीं केलेल्या प्रयत्नानें ! असा खडतरपणा असूनहि, खंबीरपणें कालक्रमणा करणाऱ्याचा पिंड किती अनन्यसाधारण म्हटला पाहिजे. चिडाचिड नाहीं, धुसफुस नाहीं, त्रागा नाहीं किंवा वैताग नाहीं. मन कधींहि भडकूं न देतां, संयमानें व सावधानतेनें प्राप्त कर्तव्य करीत राहणाराचें आयुष्य म्हणजे एक दिव्य व प्रदीर्घ यज्ञ होय.

न्याय्यात्पथ: प्रविचलन्ति पदं न धीरा: ।

" एकश्चंद्रस्तमो हन्ति नच तारागणोऽपिच । " हें जरी खरें असलें तरी, आकाशाला ' तारांगण ' हें नामाभिधान रात्रीं तळपणाऱ्या लाखों स्वयंप्रकाशी इवलाल्या चांदण्यांनीं दिलें आहे. हापिसरांचें हें पुण्यस्मरण करतांना आपला समाज तारांगणासमान व्हावा ही अपेक्षा आहे.

*यशवन्त दिनकर पेण्ढरकर*

हें पुस्तक हापिसरांच्या श्राद्धदिनीं प्रकाशित करावें, अशी मनीषा होती. पण, पुस्तक लिहायला घेतल्यापासून कितीक श्राद्धतिथी आल्या नि गेल्या; पुस्तक कांहीं पुरें झालें नाहीं – छोटेसेंच असलें तरीहि पुरें झालें नाहीं ! तेव्हां, आतां तें पुरें झाल्यावर, श्राद्धदिनापर्यंत थांबणें युक्त वाटेना.

आणि श्राद्धदिनच साधायला हवा, असें थोडेंच आहे ? ज्या ज्या वेळीं ह्या चारित्र्य-रेखाटनास लेखणी प्रवृत्त होत होती त्या त्या वेळीं ती तत्त्वत: श्राद्धच करीत नव्हती काय ? नेमकी तिथि साधूनच श्राद्ध करायचें, असा हापिसरांचा तरी कुठें कटाक्ष होता ? उपाध्ये बोवांच्या सोयीसवडीनुसार चालढकल करायला त्यांची तयारी असेच कीं नाहीं ? शिवाय, ' भट आहे तर तीथ नाहीं; तीथ आहे तर भट नाहीं, ' असें व्यवहारांत कितीदां तरी घडतें. श्रद्धाञ्जलि अर्पण करणें म्हणजे श्राद्ध. आणि श्रद्धाञ्जलि अर्पण करण्याला कोणताहि क्षण वा दिन मुहूर्तच होय. तशांत, आज मकरसंक्रान्त. ह्या दिवशींहि तर्पणविधि करावा असें सांगितलें आहे. तो हा मी करीत आहें :—

ओवाळुनी कितीदां     हा देह टाकुं बोला<br>
ओवाळुनी कितीदां     ही कीर्ति टाकुं बोला<br>
ओवाळुनी किती मी     मज्जन्म टाकुं बोला<br>
अपुरें तथापि सारें...... ऋण–भार–मुक्ततेला

१४–१–१९६२

# हा पि स र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम 32902 वि: [illegible]
क्रमांक 2036 नों दि: 22/52

# : : १

" हापिसऽऽर ! " थोरल्या दरवाजांतून हाक आली.

अंगणांत खेळणाऱ्या मुलांच्या अंगाऱ्या-बिगाऱ्या एकदम थांबल्या आणि हाक कोणीं मारली तें पाहण्यासाठीं सर्वांच्या नजरा दरवाज्याकडे वळल्या. गांवांतले एक कर्ते गृहस्थ – अण्णा त्यांचें नांव – दरवाजांत उभे होते. त्यांनीं मुलांना विचारलें, " काय रे, हापिसर आहेत का घरांत ? "

हापिसर हें नांव गांवांत सगळ्यांना माहीत होतें. लहानापासून थोरांना – कोणालाच त्या नांवाचें कोडें नव्हतें. कोडें पडायचें किंवा कौतुक वाटायचें काय तें नवख्यांना. तसें पाहिलें तर तें गांव एक लहानसेंच खेडें होतें. ना कोर्ट, ना कचेरी. ना कुठल्या कंपनीची शाखा, ना कोणा एजंटाची वस्ती. गांवकामगार देखील चावडीवर बसत नसत; घरच्या घरींच गांवचा वसूल करीत. मग, गांवांत ' ऑफिस ' हा शब्द कोण कशाला लावणार ?

पण ह्या वाड्यांत एक हापिसर राहत असत. साधें जुनाट घर – एक-मजली, चौसोपी. पण त्या घराला ज्या न्यायानें ' वाडा ' म्हणायचें त्याच न्यायाने घरमालकाला ' हापिसर ' म्हणायचें. घराच्या मानानें दरवाजा किती तरी टोलेजंग होता. त्याचप्रमाणें गरीब मास्तरांचें मनहि मोठें होतें. त्यांना हापिसर हें नांव पडलें तें त्यांच्या दिलदारीमुळेंच.

हो, ते होते एक शाळामास्तर. जिल्ह्यांत नोकरीनिमित्त ठिकठिकाणीं ते बदलून गेले होते. बदलींत त्यांना कधीं कोर्टकचेऱ्या असलेलीं तालुक्याचीं गांवें मिळालीं होतीं, तर कधीं अगदीं कुग्रामहि पत्करावें लागलें होतें. अधून-मधून सुट्टीला किंवा रजेवर ते ह्या आपल्या गांवीं येत. असेंच एकदां मोठ्या रजेवर ते गांवीं आले होते आणि घरांत मांडामांड चालली होती. गरीब शाळा-मास्तराच्या प्रपंचांत सामानसुमान तें काय असणार? तथापि नीट-नेटका संसार असावा ही जशी त्यांच्या गृहिणीची महत्त्वाकांक्षा त्याचप्रमाणें आपल्या व्यवहारांत चोख हिशेबीपणा असावा ही मास्तरांची महत्त्वाकांक्षा. अर्थात्, माजघरांत त्यानीं आपली बैठक थाटली. कारण ओसरी आल्यागेल्या-साठीं मोकळी ठेवायला हवी होती. पोत्यांनीं येणारी धान्याची रास किंवा बाचवयांतून येणारा किरकोळ माल यासाठींहि ओसरी उपयोगी येई. डेस्क, टेबल, खुर्ची ह्यांचा वापर शाळेंत होत असला तरी घरीं ह्या वस्तू कुठून असणार? तथापि एक देवदारी खोकें–दोन रॉकेलच्या डब्यांचें–त्यांनीं एका पाटावर आडवें मांडून त्यांत आपल्या जमाखर्चाच्या वह्या, टिपणें, कात्रणें वगैरे कामकाजाचे कागद लावून ठेवले होते. पाटाखालीं स्वाभाविकच चाकू-कात्रीसारख्या चिल्लर वस्तू सुखरूप नांदूं लागल्या. खोक्यावरतीं दौत, दिवा, डिकाचें डबडें असल्या अलगद ठेवायच्या वस्तू स्थानापन्न झाल्या. माजघरांत अशी मांडामांड चालली होती, इतक्यांत कोणी तरी समवयस्क भेटीला आले त्यांनी विचारलें —

"काय चाललंय ?"

"हापिस मांडतोंय !" मास्तरांनीं सांगितलें. आणि त्या दिवसापासून मास्तर 'हापिसर' झाले. दारीं येणारे हांक मारूं लागले 'हापिसऽऽर! ... काय रे बाळ, हापिसर कुठं आहेत ?'

अंगणात खेळणारा बाळहि पण उत्तर देऊं लागला, "हापिसांत आहेत."

इतक्यांत हापिसरच ओसरीवर आंचवायला आले.

"काय हापिसर, जेवण झालं वाटतं ?" अण्णांनीं विचारलें. उघड दिसत

असूनहि असें विचारण्याची आपली रीतच आहे. "काय बेत होता आज ?"

"गुलाबजांब, केशरीभात,—"

"काय थापा मारतोय!" अण्णाबरोबर आलेले गणूदादा हळूच पुटपुटले.

पण मास्तरांची वृत्तीच तशी होती. शिळ्या भाताला फोडणी देऊन तो खातांना त्यांनीं केशरी-भाताचें समाधान मानलें असेल आणि गोळ्यांचें सांबारें गुलाबजांबच्या चवीनें त्यांनीं ओरपलें असेल. ते खातील मीठभाकर, पण तूपरोटीची देतील ढेकर. ह्याचा अर्थ 'पोकळ डौल मिरवणें' असा मात्र नव्हे. प्रश्न भावनेचा आहे. त्यांची भावनाच अशी, कीं माझा कळणा-कोंडा अमृतालाहि लाजवील. कारण, परिस्थितीनें कंगाल असणें निराळें आणि मनानें कंगाल असणें निराळें. परिस्थिति सर्वांशीं आपल्या कह्यांत नसते. पण आपलें मन आपल्या कह्यांत ठेवतां आलें पाहिजे. श्रीमंती मनाची हवी. ती नसली तर लौकिक श्रीमंतीहि व्यर्थ होय. कद्रूपणानें आणि आंबूस चेहऱ्यानें जगणाऱ्या श्रीमंतापेक्षां तृप्तीच्या भावनेनें जगणारा रंकहि कुबेरासारखा असतो. समाधानी वृत्तीचा माणूस कल्पवृक्षाच्या सावलींत असतो म्हणाना!

आणि ह्या त्यांच्या दिलदारीचें प्रतिबिंब त्यांच्या घराच्या आगेंमागेंहि दिसून येईल. त्यांच्या मागीलदारीं पांच-चार फुलझाडें जशीं उगवलीं नि वाढलीं तशींच सांभाळलीं गेलीं होतीं. पिवळी कण्हेरी, पडक्या कुसवाकडेची पांढरी व सोनेरी कोऱ्हांटी, हीं कोणीं न लावतांच नांदत होतीं आणि फुलत होतीं. तिथें जाई-जुईचे कुंज नव्हते आणि कल्हारासाठीं मांडव नव्हते. फुलझाडांच्या आळ्यांची आंखणीहि नीट नव्हती. मध्येंच एक गोड्या पाण्याची छोटीशी विहीर होती. रहाटाला लागूनच धुण्यासाठीं डोण आणि लांबरुंद, दणकट सपाट दगड होता. त्या दगडालगत सांठलेल्या सांडपाण्याच्या गारींत अळू फोफावलें होतें. अधेंमध्यें चार पांगिरे प्रतिष्ठेनें डोलत होते. असें हें सारे मागीलदार! त्याच्याच एका पलीकडच्या कोपऱ्यांत कडब्याची गंज, दुसऱ्या कोपऱ्यांत जळणाचा ढिगारा आणि एका बाजूला गाईसाठीं घातलेलें छप्पर. मागीलदार विस्तीर्ण असल्यामुळें हें सारें सामावून घेतांना त्याच्या विस्कळीतपणाला बाध आला नव्हता—दाटीवाटी कोणालाच होत नव्हती.

पश्चिम कुसवाला लागून गांवांतला वर्दळीचा मुख्य रस्ता होता. त्याच कुस-वाला एक दार होतें आणि त्या दारानें गांवांतल्या साळी-माळी-शिंपी-कुणबी मंडळींची विहिरीवर सारखी वर्दळ चालत असे. पाण्याला येणाऱ्या त्या गांवकऱ्यांनीं त्या मागीलदाराची ही शोभा पाहिली होती. पण त्यांची कल्पना अशी कितीशी चालणार! मास्तरांनीं आपल्या हापिसरीच्या ऐटीला शोभेशी पाटी एका पांगेऱ्यावर ठोकली होती आणि ती साऱ्या गांवकऱ्यांना सांगत होती कीं ही आहे —

**र म णी य**
**बा ग**

दरिद्री शाळामास्तराच्या वृत्तींत करंटेपणाला थारा नव्हता; त्यांची रसिकता अशी फुलत होती.

मागीलदारचें हें परसूं जसें 'रमणीय बाग' म्हणून मिरवीत होतें, त्याच-प्रमाणें पुढीलदारची ओसरी 'दिवाणखाना' म्हणून दिमाख दाखवीत होती. दिमाखाचा तपशील सांगायला लोड, तक्के, रुजामे अशा वस्तूंची यादी वाचायची जरुरी नाहीं. धान्य भरायच्या उपयोगी येईनासें झालेलें जुनें पोतें उसवून त्याची बैठक ओसरीच्या एका खणांत अंथरलेली असे. तिला काय कल्पना कीं, हापिसरांच्या अमदानींत आपण 'गालिचा' ही पदवी पावलों आहों! भिंतीवर रविवर्म्याच्या कलाकृति नव्हत्या आणि देवदेवतांच्या तसबिरीहि नव्हत्या. फोटोंचा फैलाव झाला नव्हता आणि सवंग कलात्मक-तेच्या हव्यासानें आजच्यासारखीं कॅलेंडरेंहि फडफडत नव्हतीं. पण वाण-सवद्याला गुंडाळून आलेल्या इंग्रजी रद्दींतलीं कांहीं चित्रें मास्तरांनीं खांबावर चिकटवून दिलीं होतीं. आणि तीं चित्रें तरी कसलीं? आपल्या अंगोपांगांचें उत्तान प्रदर्शन मांडणाऱ्या नखरेल नटींचा जमाना अजून सुरू व्हायचा होता. (आणि तसल्या पांचटपणाला मास्तरांच्या मनोधारणेंत अवसरहि नव्हता म्हणा!) आगगाडीच्या एंजिनाचा नवा नमुना, मोटरी, विमान ह्यांच्या

निर्मितींतले प्रगतिपथावरले प्रयोग, गटंगळ्या खाणारी प्रसिद्ध आगबोट, किंवा इंग्रजी वर्तमानपत्रांतलीं व्यंगचित्रें, अशीं कात्रणें भिंतीवर चिकटविण्याची हापिसरांची हौस. जागतिक घडामोडींतलें कुतूहल, नवलाई ह्यांनीं त्यांची अभिरुचि व्यक्त होई आणि तिच्या अनुरोधानें दिवाणखान्याला काय ती शोभा येई.

हापिसरांच्या घरांत एका सोप्यावर भिकंभटाचें बिऱ्हाड असे. केशरीभात, गुलाबजांब असले गोड शब्द ऐकून गप्प राहील तो भटजीच नव्हे ! त्यांतून भिकंभट खवचट ! हापिसरांच्या दिलदारीचा त्यांना पहिल्यापासूनच हेवा. पक्वान्नांच्या गोष्टी कानीं येतांच, पडदीमागून ते बाहेर आले आणि त्यांनीं मध्यॆंच तोंड घातलें.

" अण्णूभाऊ, हापिसर म्हणोत कांहींहि ! पण खरं म्हणजे त्यांना आज जेवण गेलंच नसेल ! " भिकंभट बाराबंदीची गांठ मारीत मारीत म्हणाले.

गणूदादा प्रश्नार्थक नजरेनें भिकंभटाकडे बघूं लागले. चार गांवचें पाणी पिऊन आलेल्या हापिसरांना भिकंभटाच्या त्या उद्गारांतली खोंच क्षणांत उमगली. तथापि उसळून उत्तराचा घाव घालायला ते तसे उतावीळ स्वभावाचे नव्हते. पण भटजींनींच तो घाव ओढवून घेतला. गणूदादाच्या प्रश्नार्थक नजरेला त्यांनीं जाब दिला.

" अहो, आजपासून मास्तर पेन्शनींत निघाले ना ? कमाईंत एकदम निम्मी घट झाली नाहीं का ? "

" चुकताय भिकंभट तुम्ही ! " मास्तरांची वाणी खणखणीत नाण्याप्रमाणें निनादूं लागली. भाषेंत पीळ होता. ते म्हणाले, " आपल्यावरून नेहमींच जग ओळखत जाऊं नका. तुमच्या पंगतीला बसणारा हा 'गृहस्थ' नव्हे. पगार निम्मा झाला तरी आजपासून जेवण दुप्पट जेवणार मी तब्बल तीस वर्षें नोकरींत राबतांना कांट्यांवर नाच करावा लागला. वरिष्ठांच्या अरेरावीचा कांच होता आणि घड्याळाच्या कांट्यांचा जाच होता. आजपासून घड्याळाकडे पाठ फिरवून वागणार आहें आणि लढाई मारल्याच्या विजयानें ताठ मान करून ताटावर बसून दुप्पट ताव मारणार आहें. कमाई निम्मी झाली

ह्याची खंत मिळालेली दक्षिणा मोजून पाहणारांना! केल्या कामगिरीचं हयातीचं इनाम मिळालंय मला! कुणाचा ताबेदार नाहीं मी आजपासून! वामकुक्षी घ्यायला आजवर मला फुरसतच नव्हती. अर्ध्यापोटीं उठावं लागत होतं रोज. आतां वामकुक्षीला भरपूर अवसर असल्यावर दुप्पट कां नाहीं जेवणार? भिक्षुकाचं रक्त नव्हे हें भिकंभट–भोजनाचं कुठलें आमंत्रण आलं नाहीं कीं जेवण न जायला!!"

तीस वर्षांच्या नोकरींत मास्तरांनीं चुकूनहि हातांत छडी धरली नव्हती. तरी पण पिळाच्या वेताची होती त्यांची जीभ–नेहमीं नव्हे हो; पण अशा विशेष प्रसंगीं! पाणउतारा करायला कोणी सरसावला कीं ती सपासप चालूं लागे. भिकंभट किती कळवळले असतील कोण जाणे. कारण ह्या वेताच्या छडीचे वळ मोजतां येत नाहींत.

## : : २

"पण मास्तर, इतक्या लवकर कसे पेन्सलींत निघालात तुम्ही ?" गणूदादांनीं विचारलें.

"लवकर ? अहो, आतांच सांगितलं ना, तब्बल तीस वर्षें नोकरी झाली म्हणून ?" मास्तर म्हणाले.

"तें खरं हो ! पण पिकलं पान थोडेच झालां आहांत ? अजून चांगले घडधाकट आहांत. पांच वर्षंसुद्धां मुदतवाढ मिळायला हरकत नव्हती."

"हां, 'मिळायला हरकत नव्हती' हें तुमचं म्हणणं रास्त आहे. पण ती मागावी लागते ना ? अन् तेंच तर जमत नाहीं आम्हांला !"

"पण जिल्ह्यांतल्या नामांकित शिक्षकांच्या यादींत तुमचं नांव नेहमीं वर असतं, असं आम्ही ऐकत आलों—"

"गणूदादा, मुदतवाढीचा संबंध नुसत्या नामांकितपणाशीं थोडाच आहे ? एक वेळ नामांकित नसलांत तरी चालेल; पण वरिष्ठाच्या अंकित आहांत का, हा प्रश्न मुख्य विचारांत घेतला जातो. काय अण्णा, मी म्हणतों हें बरोबर आहे ना ?"

"मास्तर, ह्या गणूदादाला ठाऊक का नाहीं ? उगीच वेड पांघरून पेडगांवाला जातोय ! !" अण्णांनीं शेरा मारला.

गणूदादा आतां सूर बदलून बोलायला लागले. वयाच्या वडीलकीनें ते

गांवांतल्या सगळ्याशींच एकेरी नांवानें बोलत. तीच त्यांची प्रकृति. अधून-मधून 'अहो जाहो' म्हणून ते बोलायला लागत तेव्हां मठांतल्या नगाऱ्यागत त्यांचा पोकळपणा असतो तो ! त्यांच्या प्रकृतीचा सूर लागतो तो 'अरे-तुरे' च्या तुतारींतून ! त्यांनीं अण्णांना उत्तर दिलें,—

"अरे, मला माहीत आहे. अन् म्हणूनच म्हणायचं कीं, मास्तर तात्या-साहेबांचे भाऊबंद म्हणवितात पण त्या थोरल्या घरचं वळण कांहीं नाहीं त्यांना ! रावसाहेबांच्या भेटीला जातांना, बाजारांतला केळीचा घड विकत घेऊन 'हा परड्यांतल्या केळीचा आहे' असं म्हणत म्हणत रावसाहेबांच्या पुढें ठेवायचा, ही थोरल्या घरची चालरीत मास्तरांनीं शिकायला हवी होती. शिकवण्यांत जन्म गेला, पण असं कांहीं शिकायचं राहून गेलंय ह्यांचं !" गणूदादांनीं व्यवहारशास्त्रांतला एक सिद्धान्त सांगितला.

"मग आतां तुम्हांला सांगायला का हवं ? तसली लायकी असल्या-शिवाय मुदतवाढीची कृपा खावंदांनीं कशी करावी ? कनिष्ठाच्या अंगच्या खऱ्या गुणांवर भाळणारा वरिष्ठ विरळा ! असल्या मतलबी अवांतर गुणांचं अवडंबर आधीं हवं ! मग, भुसाच्या गोणींत आढळणाऱ्या कणाएव्हढा मुख्य गुण असला तरी पुरे !"

हापिसरांच्या ह्या प्रतिपादनापोटीं कांहीं तरी कडू अनुभव मळमळतोय हें अण्णूभाऊंनीं हेरलें; तोंच त्यांच्या लक्षांतहि आलें एकदम. तेव्हां ते म्हणाले,

"खरंच मास्तर, त्या प्रकरणाचं काय झालं ?"

"तुमच्या कानीं आहे तर ?"

"आहे पुसट पुसट; नीटसं नाहीं."

"बरं विचारलंत ! मुदतवाढीच्या प्रश्नाचं उत्तर त्यांत आहे. साद्यंतच सांगतों."

हापिसरांनीं कोपऱ्यांतली चिलीम पुढें ओढली. एका मुलाला छापी भिजवून आणायला दिली. ती येईपर्यंत चिलमींतली पहिली जळकी राख टोकरून काढून टाकली. जवळच्या डबड्यांतली चिमूटभर तंबाखू तळहातावर घेऊन तिच्यांतला केरकचरा निवडला. मग ती घोळून चिलमींत आबदार दाबून

भरली आणि छापी गुंडाळली. तोंच गणूदादा पुढे सरकले आणि त्यांनीं काडी ओढली. एक झुरका मारून झाल्यावर मास्तर नव्या दमानें सांगूं लागले,

" अण्णूभाऊ, गुण असणं चांगलं; पण तेच कितीकदां आपल्याला गोत्यांत आणतात – हेव्यादाव्याला न् मत्सराला कारण होतात.

ते प्लेगचे दिवस होते. प्लेगाचा प्रादुर्भाव झाला कीं माणसं परगांवीं पळूं लागतात. ज्यांना गांव सोडून जातां येत नाहीं ते शिवारांत झोंपड्या घालून राहतात. आम्हांला शाळा बंद ठेवायचा हुकूम मिळतो. पण दुसऱ्या कुठल्या तरी गांवीं आम्हांला मदतीला पाठवतात. घरीं बसून फुकट पगार कोण खाऊन देणार ? त्यांतल्या त्यांत सोयीचं गांव मागण्याची सवलत असते, शक्य असेल तर तेव्हढी सोय बघितलीहि पण जाते. आमचे एक जुने दोस्त आमच्यासारखेच ज्या गांवीं हेडमास्तर होते तें गांव आम्हीं मागितलं. तसा हुकूम आला. पण माझी सोय लक्षांत घेऊन नव्हे, बरं का ! ते हेडमास्तर वरिष्ठांच्या मर्जींतले असल्यामुळें, त्यांना जादा कुमक देण्याच्या कृपेंत आमची मागणी मंजूर झाली.

" पुष्कळ पंतोजी 'छडी लागं छमछम ! विद्या येई घमघम' अशा धोपटमार्गानें जाणारे असतात. कुणाचं बळ कशांत, तर कुणाचं बळ कशांत ! शिकवण्याचा प्रभाव पडेनासा झाला कीं छडीला फावतें. समोर बसलेल्या मख्ख मुलांच्या तोंडाचीहि मिठी मोकळी व्हावी असं शिकवायला यायला हवं —"

" पण मुलं आधीं समोर बसलीं तर पाहिजेत ? " गणूदादांनीं जरा पक्ष घेण्याचा आव आणला.

" बसलीं पाहिजेत ?" मास्तरांना इसाळा आला. " चुकारपणानं पळून गेलेलीं मुलंसुद्धां आपसुक धांवत परत आलीं पाहिजेत ! ओस असलेला वर्ग भरघोस भरला पाहिजे आपोआप ! हें ज्यांना जमत नसेल त्यांनीं पळी-पंचपात्री आणि दर्भ घ्यावे हातांत, छडी कशाला ? मधाच्या टिपुसासाठीं माशा गुं-गुं करीत फुलांभोंवतीं पिंगा घालूं लागतात. मुलं नि फुलपांखरं ह्यांत फरक का आहे ? त्यांच्यापुढं राक्षसी अवतार धारण करायला कशाला हवा ? छडी हातीं धरायला पंतोजी म्हणजे फौजदार का आहे ? छडी छमछम

वाजल्यानें मुलं जर विद्यावाचस्पति होतीं तर शिक्षक तयार करायसाठीं ट्रेनिंग कॉलेजं कशाला काढायला हवीं होतीं ? कळकीचीं बेटं लावून बुरुडाच्या नेमणुका केल्या असत्या सरकारनं गांवोगांव ! मुलांना विद्या घमघम यायला मुळांत ती द्यायची मास्तरांना हातोटी साधली पाहिजे ! ज्याला विद्या देतां येत नाहीं तो थोबाडींत देतो किंवा छडी देतो. पण थोबाड रंगविल्यानं किंवा हातावर वळ उठविल्यानं मुलांच्या मनावर संस्कार काय होणार ? मास्तरानं हात उगारला कीं मुलाचं मन आणखीनच खोल दडी देऊन बसलं म्हणून समजावं. मुलांचीं मनं फुलवायला मारपीट नको. मनं फुलवायचीं म्हणजे पोहे का कांडायचेत ? का लाह्या फोडायच्यात ? मास्तरांच्या मुखांत सरस्वतीची सतार छेडली जायला पाहिजे, आणि मुलांना वाटलं पाहिजे कीं, पिसारा पसरून मोरच नाचतो आहे समोर. बुजलं-दडलेलं मन कौतुकानं बाहेर येतं आणि कोंवळ्या किरणांनीं उमलणाऱ्या कळ्यांप्रमाणें सुखानं फुलूं लागतं किंवा चंद्रकांत मण्याप्रमाणें पाझरूं लागतं. गणूदादा म्हणतील, 'काय फुशारकी मारतोय पण !' पण अण्णा, फुशारकी म्हणा किंवा घमेंड म्हणा – हातांत छडी धरायची सबंध नोकरींत पाळी आली नाहीं एव्हढं बरीक खरं !"

"न धरीं शस्त्र करीं मी !" "कृष्णाचाच अवतार कीं नाहीं तूं !" – गणूदादाचे हे उपरोधी उद्‌गार केवळ विनोदाचे आहेत, नव्हे मैत्रीच्या कौतुकाचे आहेत हें हापिसरांना सांगायला नको होतें.

"मदतमास्तर म्हणून गेलों तिथं आमचा हा गुणच आम्हांला भोंवला. तिथले हेडमास्तर पडले 'धोपटमार्गी.' त्यांनीं छड्या फोडाव्यात आणि मुलांनीं त्यांच्या नांवानं खडे फोडावेत, असं होतं तिथलं वातावरण. मला त्यांनीं रुजू करून घेतलं; आणि आपल्याला आराम मिळावा म्हणून त्यांच्या वर्गावर त्यांनीं मला जायला सांगितलं.

"तुलना करा – असं अभ्यासांत मुलांना शिकवलेलंच असतं. पण त्या तुलना करायच्या त्यांना जमलं नाहीं तरी, मास्तरा-मास्तरांची तुलना न शिकविताहि त्यांना तत्काळ करतां येते ! मदतमास्तर मुलांचे प्यार बनले आणि गल्ली-बोळांतून तिथल्या हेडमास्तरांच्या नालस्तीची पिसणी खुसखुसूं

लागली. आणि त्यामुळं ते बेचैन झाले ! "

"ए मास्तर!"... गणूदादा मिष्किलपणानें म्हणाले, "अशी कुचराई नाहीं खपायची."

मास्तर प्रश्नार्थक नजरेनें पाहूं लागले.

"अर्धवटच तुलना केलीस तूं !" गणूदादा म्हणाले. "पण ती पुरती करायचं तुला नाहीं जमणार. मीच करतों ती पुरी."

मदतमास्तरांची राहणीहि मोठी वेधक होती. बिऱ्हाडांतून निघायचे ते सरळ शाळेंत जायचे. अंवतींभंवतीं बघायचे नाहींत. नजर पायावर आणि चाल अगदीं रस्त्याच्या कडेनें. अंगकाठी सरळ, तिला कुठं वाक नव्हता. वेष साधाच. रुमालाला कांठ नव्हता आणि त्याच्या बांधणींत घाट नव्हता. ते अंगावर उपरणं घेत, त्यांतहि एक विशिष्ट धाटणी होती. डाव्या खांद्या-वरून तें पुढच्या बाजूनें गुडघ्यापर्यंत लोंबत असे आणि त्याचा दुसरा पदर पाठीवरून उजव्या काखेखालून पुढं येऊन उजव्याच खांद्यावर चढून परत पाठीवर मागं रुळत राही. सोलापूर चेकचा पारशी फॅशनचा कोट ते घालीत. सारांश, पोशाखांत कसलाच थाट नसे. हातांत टणक सोटा असे झाडाच्या फांदीचा, बेतशीर छाटाछाट केलेला. मुठीच्या बाजूला नैसर्गिक बांक आणि खालच्या टोंकाला भरभक्कम मायणी. भार घालून चालायसाठीं तो नव्हता. [तशी अजून जरूरहि नव्हती.] पण तोच ठरला होता त्यांच्या स्वभावाचें प्रतीक. वारकऱ्याच्या खांद्यावर जशी पताका किंवा भालदाराच्या हातांत जशी चांदीची छडी ! तशी, सोटा ही मास्तरांची ठरली 'निशाणी'—हेतु-पूर्वक नव्हे, पण सहज स्वभावधर्मांप्रमाणें वापरतां वापरतां ! कोणाकडेच गप्पा मारायला जाणं त्यांना आवडत नसे. फावला वेळ वर्तमानपत्रं वाचण्यांत ते घालवीत. गप्पा मारतांना कोणाच्या तरी कुटाळकीचे साक्षीदार होण्यापेक्षां किंवा कोणाच्या तरी चालचलणुकीची चर्चा करण्यापेक्षां जगाची वाटचाल काय दिशेनें चालली आहे, हें समजून घेण्यानंच जगण्याचा खरा आनंद कळतो असं ते म्हणत. कोणाचं एक नको कीं बेक नको. अशानें पक्षपातीपणा चिकटण्याचाहि संभव टळतो. मदतमास्तरांचं हें एक टोंक तर हेडमास्तरांचं

प्रत्येक बाबतींतलं विरुद्ध टोक. मग ते कां बेचैन होणार नाहींत ? तुलनेनं मनुष्य उठून दिसतो ना ? "

" तें तुमचं तर्कट मला नाहीं समजत." हापिसर अभिजात विनयानें म्हणाले. " पण मी माझं कर्तव्य करीत होतों. त्यांना त्याच्या खाजकुइल्या लागल्या त्याला मी काय करणार ? त्यांतून मी कांहीं त्यांचं वैर उगवायला गेलों नव्हतों. त्यांना मित्राबद्दल मत्सर वाटायला नको होता. पण धर्म करायला जातां कर्म उभं राहतं तें असं !

" पुढं थोडेच दिवसांनीं त्याच भागांत डिपोटीसाहेबांची फिरती आली. तालुक्याच्या गांवीं त्यांचा मुक्काम पडला. हे आमचे हेडमास्तर—मी सुद्धां त्यांच्याच ग्रेडचा आणि हुद्याचा होतों बरं का—पण तिथें मात्र 'मदतमास्तर' म्हणून दुय्यमपणा होता माझ्याकडे ! तेव्हां, हेडमास्तर रावसाहेबांच्या भेटीला तालुक्याच्या गांवीं गेले.—

" केळीचा घड घेऊन, होय ना ? "—गणूदादा.

" नाहीं; फुलांची परडी आणि भाजीची करंडी घेऊन ! "

" आणली असेल शाळेंतल्या एका इनामदार मुलाच्या मळ्यांतून आणि सांगितलं असेल, " शाळेतल्या आवारांतली आहे—मुलांच्या हौसेची भेट." खुषामत आणि आत्मप्रौढी ह्यांचा बेमालूम बनाव कसा करायचा तें तंत्र सगळ्यांनाच नसतं साधत ! "

" होय कीं. अगदीं तसंच घडलं त्या भेटींत. रावसाहेब म्हणाले म्हणे, 'वा, वा, मास्तर ! अहो, मुलांची हौस खरी; पण आधीं हेडमास्तरहि हौशी असावा लागतो. सगळ्या शाळामास्तरांना नाहीं जमत तें !' अन् मग बोलण्यां निघतां निघतां मदतमास्तराबद्दलहि बोलणं निघालं. मी त्यांच्या बरोबर गेलों नाहीं. ह्या माझ्या वर्तनाचा विपर्यास करण्याची आयती चालून आलेली संधि त्यांनीं कां दवडावी ? पण मी तुम्हांला विचारतों, आपल्या गांवांतून उठून परगांवीं जायचं, ही काय लाचारी ? "

" बाबा रे, ह्याला म्हणतात अगत्य ! " गणूदादा.

" अहो, आपल्याच गांवीं येतील तेव्हां वाटल्यास सीमांतपूजन करा कीं साक्षात्, हवं तर ! "

" ह्यः! कोणीहि करील तें ! पण दुसऱ्या गांवापर्यंत दौड मारण्यानं—"

" वरिष्ठांना लाडावून ठेवतात हे असले खुषामतखोर अन् बाकीचे ठरतात आढयतेखोर ! बहुतेक त्या भेटींत आमची संभावना ह्याच किताबानं झाली असणार.

" पुढं आमच्या गांवचा प्लेग कमी झाला. लोक परत गांवांत यायला लागले. शाळा उघडायला आतां हरकत नाहीं असा पाटील-तलाठ्यांचा रिपोर्टहि आला आणि 'मदतमास्तर' ही आमची भूमिका संपून आम्ही आमच्या कामगिरीवर परत दाखल झालों. कांहीं महिन्यांनीं दिपोटीसाहेबांची स्वारी आमच्या गांवीं आली. शाळा-तपासणी सुरू झाली. वर्गा-वर्गांतून हिंडून अगदीं कसून घेतली चांचणी रावसाहेबांनीं. बरोबर एक असिस्टंट दिपोटीहि होते. पण कुणालाच कुठं कांहीं कमी आढळलं नाहीं. प्लेग संपतांच आले असते तर मात्र विस्कळीतपणा दिसला असता."

" बराच आहेस कीं तूं !" गणूदादा म्हणाले. " प्लेगचा फैलाव झालेल्या भागांत जीव मुठींत घेऊन येण्याचं धारिष्ट सुखासुखी कोण करील ?"

" पण मग आमची सर्व चोख सिद्धता होती. जमाखर्च, डेडस्टॉक, लायब्ररी, हजेरी, बटवडापत्रकें, तक्ते, नकाशे, सारं सारं कांहीं—"

अरे, ती तयारी ठेवलीस काय अन् न ठेवलीस काय ! आधीं तयारी हवी असते निराळीच." गणूदादा सांगूं लागले, " कणीदार लोणकढ्या तुपाची बरणी, धारोष्ण दुधाची चरवी, गरम पाण्याचं घंगाळ, असं सारं मुक्कामावर हजर ठेवलं होतस का ? हें नसलं तर तें सारं निष्फळ !"

" होय, तेंच सांगतों. मग रावसाहेब आणि असिस्टंट डिपोटी बसले दप्तर तपासायला. मधली सुट्टी होती. मुलं बाहेर आवारांत वावरत होतीं. मुलंच तीं ! चांचणी चांगली झाल्याचा आनंद मास्तरांप्रमाणें त्यांनाहि असतो; नव्हे, मास्तरांपेक्षांहि त्यांच्या उल्हासाला जोरांत उकळ्या फुटलेल्या असतात. स्वाभाविकच, आवारांत वावरतांना त्यांचे हसण्या-खिदळण्याचे सूर वरच्या पट्टींत लागले होते. गप्प राहण्याबद्दल मधून-मधून इतर मास्तर त्यांना सूचना देत होते. रावसाहेबांचं लक्ष दप्तरांत लागेना.

" काय मास्तर, तुमचा धाक दिसत नाहीं मुलांना ? " रावसाहेब मला म्हणाले.

मीहि मग एक-दोनदां बाहेर डोकावून आलों. पण मुलंच तीं ! तेव्हढ्या-पुरते दबलेले आवाज माझी पाठ वळतांच पुन्हा चढत. रावसाहेबांना दप्तरांत चूक आढळेना. चोखपणाचं त्यांना समाधान वाटलं असतं तर—पण चुका न आढळल्यामुळेंच त्यांची मळमळ वाढू लागली, आवाज करडा आला—

" मास्तर ! काय गोंगाट चाललाय बाहेर हा ? "

" मुलंच आहेत तीं ! त्यांतून मधली सुट्टी. कोंडलेल्या भावनांना वाट मिळायला हवी. " मी सौम्यपणानें संपादणी करायला गेलों.

" वा: ! चांगलीच गति दिसते मानसशास्त्रांत तुमची ! पण मुलांवर धाक नाहीं हें कबूल करा ना ! " रावसाहेब म्हणाले.

मग मलाहि राहवलं नाहीं.

" धाक पोरांवर काय ठेवायचा ? माझा धाक थोरांवर असतो ! "

झालं, प्लेगच्या दिवसांत त्या दोस्त हेडमास्तरांनीं सुरुंग पेरलाच होता. आतां ही फुणगी लागली वातीला. पण, असल्या सुरुंगाचा स्फोट लगोलग होत नसतो. तपासणी आवरली. रावसाहेबांचा मुक्काम हालला. बाण लागलेला काळवीट पळ काढून झुडुपाच्या आडोशाला जाऊन दडतो.

" लवकरच बदलीचे हुकूम सुटले. आम्हां शिक्षकांतलं तिथलं दिलजमाईचं वातावरण विसकटलं. जिथं एकमेकांत कुरबूर, लाथाळी, कागाळ्या ह्यांचा बुजबुजाट झाला होता अशा शाळेवर माझी नेमणूक झाली. तिथले फर्स्ट असिस्टंट होते मोठे आंतल्या गांठीचे, पाताळयंत्री, चहाडखोर; आणि ह्याच गुणांनीं रावसाहेबांच्या मर्जीतले झालेले. त्यांच्याकडेच होतं पोस्टाचं काम—त्यांच्या ह्या कर्तबगारीबद्दल त्यांना खावंदानीं दिलेली बक्षिशी.

" एकदां मला तांतडीनं रजेवर जाणं भाग पडलं. मीं रजेचा तक्ता भरला, त्या फर्स्ट असिस्टंटकडे चार्ज दिला आणि पोस्टानं रवाना करण्यासाठीं त्यांच्याच स्वाधीन केला तो रजेच्या तक्त्याचा लखोटा. इतका बनेल गळेकापू असेल तो ह्याची कल्पना मला नव्हती. त्यानं सरळ तो लखोटा दडपून टाकला

आणि वरिष्ठाकडे कागाळी केली, 'हेडमास्तर आपल्याच अख्त्यारींत बिगर-परवानगी परगांवीं गेले आहेत.'

"मग काय विचारतां! रावसाहेबांना हवा होता तसा मोका आला. जाब-जबाब, खरं-खोटं, खोटं-नाटं, सर्व प्रकारची रंगत वाढू लागली. असिस्टंट मजकुराच्या ताब्यांत असलेल्या शाळेच्या दप्तरांत कांहीं ठिकाणीं खाडाखोड झालेली, तर कांहीं पानं फाटलीं गेलीं असलेलीं आढळून आलीं.

"रावसाहेबांनीं सारं प्रकरण छान सजवून प्रांताच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे रवाना केलं. त्या वरच्या ऑफिसांतहि त्यांचा एक पित्त्या होता. त्यानं प्रकरण साहेबापुढें ठेवतांना आणखीन् फोडणी दिली कीं, 'प्रस्तुत मास्तर इथं आलेले वेळोवेळीं दिसतात. परवां प्रिन्सिपॉल प्रभुदेसाई यांच्याकडील लग्नांतहि ते चार दिवस होते.' इतका बार भरल्यावर सर्व कारस्थान माझ्या अंगावर बेतलं. 'दहा रुपये दंड आणि पुढील बढती तहकूब' असा माझ्या सर्व्हिसबुकांत शेरा मारला गेला.

सच्चेपणाला आणि सीधेपणाला अशीं फळं यावींत? तीस वर्षांच्या तपश्चर्येवर असा बोळा फिरवला जावा? पण, मी ही मात्रा गिळणारा नव्हें. न्यायाची इतकी गळचेपी व्हायला लागली तर सज्जनांना जगांत जगणेंच मुष्कील झालं म्हणायचं! तें कांहीं नाहीं. ही केस भांडायचीच असं मीं ठरवलं. पूर्वीचे आमचे आनंदकर रावसाहेब होते. लाख माणूस. खरा जाणकार हल्लींचीं हीं कुठलीं भटुरकीं जमलीं आहेत! क्षुद्र नि कंगाल! ह्या काळ्यासारखं त्यांचं अंतःकरण काळंकुट्ट नव्हतं. त्यांना भेटलों आणि त्यांच्या मध्यस्थीनं सर्वांत वरच्या साहेबमहाशयांची गांठ घेतली. अण्णूभाऊ, कांहींहि म्हणा! स्वजातीयापेक्षां गोरा माणूस भला! त्याला मराठी समजत होतं बरं का. माझ्यावर हें कुभांड रचून, मला नोकरींतून उठवायचा कसा घाट घातलाय तें सांगितलं. त्यांनीं पण शांतपणानं ध्यान दिलं. प्रकरणाची सगळी नक्कल त्यांच्या हातीं दिली.

"कांहीं फिकीर करूं नकोस! you go. मी जातीनं बघतों" असं त्यांनीं स्पष्टच म्हटलं. आणि खरोखरीच प्रकरणाची नीट छाननी केली.

" साहेबानं पहिला मुद्दा काढला तो हा कीं, ज्या प्रिन्सिपॉलसाहेबांकडे हा शिक्षक वेळोवेळीं येतो म्हणून साक्ष दिलीय तो प्रिन्सिपॉल इथेंच असूनहि त्याचा जाब कां घेतला नाहीं ? ताबडतोब त्याचा जाब मागवावा."

" अन् नवल असं कीं जाब आला तो असा – " ह्या मास्तरांना मी एक सच्चा आणि कर्तव्यदक्ष शिक्षक म्हणून ओळखतों. पण माझ्याकडे तो अलीकडे कित्येक महिन्यांत आलेला आठवत नाहीं. "

" झालं ! एकदम सारा मोहरा फिरला. खोटयाच्या पाठींत सोटा बसला !

" अन् मग काय सांगूं महाराजा ! जेव्हां का त्याची खात्री झाली कीं गरीब मास्तरावर हें किटाळ घेतलं गेलंय् तेव्हा त्यानं सगळयांची अशी कांहीं खरडपट्टी काढली कीं आपला गुंडा व्हावी काय करील !

अखेर, त्यांनीं प्रकरणांत निकाल दिला कीं—

(१) पोस्ट-मास्तराचें काम करणारे हे जे फर्स्ट असिस्टंट आहेत त्यांना ताबडतोब कामावरून कमी करावें.

(२) ज्या असिस्टंट डेप्युटीनें ह्या प्रकरणांत चौकशी केली त्यांनीं पक्षपातीपणानें एकच बाजू रंगविण्यासाठीं खोटेनाटे कागद बनवून घेतले; तेव्हां त्यांची बढती कायमची थांबविण्यांत येत आहे.

(३) जिल्हाधिकारी काळे डेप्युटी यांच्याबद्दल काय म्हणावं ! जिल्ह्याचा कारभार करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं असावी तशी दिसत नाहीं. शिक्षकांच्या आपापसांतील हेव्यादाव्यांत त्यांनीं अलिप्तपणा ठेवून आपली भूमिका पार पाडायला हवी होती. इतःपर एवढा बोध त्यांनीं घ्यावा इतकंच मी तूर्त म्हणतों.

(४) हेडमास्तरांना करण्यांत आलेला दंड व इतर शिक्षा रद्द करण्यांत येत आहे. त्यांची नुकसानभरपाई त्वरित करण्यांत यावी.

" शाबास, शाबास, हापिसर! चांगलंच पाणी पाजलंत लेकांना! " गणूदादा.

" मग कांहीं रावसाहेब त्या भागांत फिरून फिरकले नसतील?" अण्णूभाऊ.

" आडनांवाप्रमाणें अंतःकरण होतंच ! आतां तोंडहि झालं ! खरं म्हणजे त्यांनीं कमाई केली. ' आंत एक बाहेर एक ' असं आतां त्यांना कोणी म्हणालं नसतं ! " गणूदादा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थूळमत.
अनुक्रम 32९८ प्रकरण विसरें 4३३ ग
स्थांक 2036 नों दि 22/4/42

“चल, चहाटळ कुठला !” अ

“पण हा विजय मिळाला त्याच दिवशीं ठरवलं कीं पंचावन्न वर्षें ज्या दिवशीं पुरीं होतील त्या दिवशीं नोकरीला रामराम ठोकायचा ! मुदतवाढ मिळाली असती. अजून मुलंबाळं रंगारूपाला यायचीं आहेत. सारा प्रपंच पुढंच आहे. पण म्हटलं ‘नको !’ साप डूख धरून चावा घ्यायची संधि डोळ्यांत तेल घालून शोधीत राहणार. आणि मी झालं तरी माणूसच आहें. चुकणारच नाहीं, असं कसं म्हणावं ! शिवाय गोडवा असेल तोंवरच नोकरीत मजा. वरिष्ठाचं मन एकदां का कलुषित झालं कीं मग चव नाहीं ! बढतीसाठीं खालचे लोकहि आम्ही पेन्शनीत जाण्याची वाट पाहतच असतात. त्यांच्या वाटेंत आपण कशाला या ? त्यापेक्षां, मानानं मुजरा ठोकून वेळींच बाजूला होण्यांत भूषण.”

## :: ३

हापिसर परगांवीं गेले होते. राहत्या गांवीं त्यांची थोडीशी शेती होती. तशीच थोडी जमीन तिथून कांहीं मैलांवर असलेल्या एका गांवीं होती आणि आणखी कांहीं जमीन त्याच्याहि पुढें बारा मैलांवर होती. वसुलासाठीं ह्या गांवीं त्यांना जावें लागे. त्या टापूंत रेल्वे उपयोगी येण्यासारखी नव्हती. तो प्रवास द्राविडी प्राणायामाचा झाला असता. मोटर बस-सर्व्हिस तर अजून सुरू झाली नव्हती.

तीन ठिकाणीं (दोन तालुक्यांत) असलेली ही जमीन वतनी होती. आपण 'वतनदार – दुमालदार – इनामदार' ह्याचा हापिसरांना अर्थातच अभिमान होता. पण सारी उमर नोकरींत गेल्यानें जमिनी कुळांना खंडानें लावून दिल्या होत्या. वर्षांतून मिळणाऱ्या रजेच्या मोजक्या दिवसांत धावत येऊन पळत जाण्याच्या धांदलींत वसूल पुरता होत असे, असें नाहीं. कुळें खमंग असतात. वसुलाला आलेल्या मालकाला 'आज देतों, उद्या देतों' अशी टंगळ-मंगळ लावायची ! रजेचे चार-दोन दिवस अशा टोलवाटोलवींत घालवले कीं झालें ! मालक 'नोकर' पडल्यानें आपसूक हात हालवीत परत जातोच ! आणि वसुलासाठीं कोर्ट-कचेऱ्या करायला तरी त्याला फुरसत कुठें आहे ?

पण आतां नोकरीचा कांच नसल्यानें वसुलाला गेल्या गांवीं कमीजास्त मुक्काम ठोकायला हरकत नव्हती. मुक्काम ठोकायचा तर सारी शिधा-

सामग्री आपली आपल्याजवळ हवी. कारण वसुलाला जायचीं हीं गावें पडलीं आडवळणीं खेडीं. तिथें कुठली बाजारपेठ ? जवळपासच्या मोठ्या गांवचा आठवड्याचा बाजार हाच सगळ्या खेड्यांचा आधार. त्या बाजारांत आपला माल विकायचा आणि लागणाऱ्या जिनसा विकत आणायच्या असा सगळ्यांचा शिरस्ता. आयत्या वेळच्या किरकोळ गरजा गांवांतलें एखादें-अर्धें वाणसवद्याचें दुकान भागवीत असे. अशा स्थितींत आपल्याला लागणाऱ्या जिनसा ज्याच्या त्यानें बरोबर नेणें हेंच सावधगिरीचें धोरण हापिसरांनीं ठेवलें होतें मुख्य म्हणजे तंबाखू व आपल्या आवडीचा चहा ! साखर, गूळ, तांदूळ, तिखट, मीठ, भाकरीचें पीठ हे जिन्नस तर ओघानेंच आले. तिथल्या एखाद्या देवळांत किंवा चावडींत मुक्काम ठोकतां येत असे. लागणारीं दोन भांडीं आणि जळणकाटुक कुळें पुरवीत. दुधाचें दुर्भिक्ष नव्हतें.

हापिसरांना स्वयंपाक येत असे. घरीं असतांनाहि स्वयंपाकाचे प्रसंग वेळोवेळी येत बायकोनें ह्या कामीं शेजारणींची मनधरणी करावी हें त्यांना पसत नव्हतें; आणि ‘ इकडे जर जमतं तर तेव्हढं तरी शेजारणींचं मिंधेपण कशाला ’ अशी तिचीहि पण विचारसरणी होती.

वसुलाला जायचें, तेव्हां सात-आठ दिवस तरी मोडायचे, म्हणून अंबिका-बाईंनी ( हापिसरांच्या सहचारिणी ) वरील जिनसांच्या बेजमीच्या पुड्या-पुरचुंड्या बांधून दिल्या होत्या. शिवाय, वाटचालीपुरती पिठलें-भाकरीहि दिली होती.

हापिसर गावीं गेलेले असले म्हणजे ताईंना (कुणी कुणी अंबिकाबाईंना ताई म्हणत) अधिक फुरसत मिळे. मुलांचें करून त्यांना नेहमीप्रमाणें शाळेला लावून दिल्यावर वाळवणें, सारवणें, असलीं शिलकीं कामें त्या ह्या वेळीं काढीत अशीं कामें होतां होतां. एक दिवशीं साफसफाईसाठीं त्या फडताळा-कडे वळल्या आणि डबे-बरण्या काढायला लागल्या मात्र –

शाळा सुटली मुलें घरी धावत आलीं आणि पाहतात तों आई फडताळा-च्या भिंतीला टेकून बसून पदरानें डोळे टिपीत मुसमुसत आहे ! हंसत खिदळत आलेलीं मुलें एकदम चुपचाप उभीं राहिलीं. इतक्यांत त्यांचें लक्ष

आईच्या पुढ्यांत असलेल्या सारनोऱ्याच्या डब्याकडे गेलें. मग थोरल्या मुलाला कांहींसें उमगलें. "दादांच्या बरोबर हा डबा द्यायचा होता नं ?" तो बुजत बुजत पुटपुटला.

"होय ! जळ्ळी मेली आठवण ! चार दिवस निदान भाकरी तरी नकोत थापायला म्हणून टिकाऊ जिन्नस केली ही ! पण इतकी कशी मी विसरलें ! सारं बांधून दिलं न् नेमका हाच डबा राहिला !" म्हणून अंबिकाबाई स्वतःला बोल लावून घेत अधिकच आंसवें ढाळूं लागल्या.

आणि त्या दिवशीं त्यांनीं एकहि घास तोंडांत घातला नाहीं. त्यांच्या जिवाला इतकी लागून राहिली ती गोष्ट ! दिवसभर त्या कुणाशीं मोकळ्या मनानं बोलल्या नाहींत कीं चेहऱ्यावरचा म्लानपणा लवमात्र विरघळला नाहीं. आईच्या खिन्नतेच्या पडछायेनें मुलांच्या खेळकरपणालाहि झाकळून टाकलें.

"दादा आले ! दादा आले !"

धाकटा मुलगा रस्त्यावरून ओरडत-ओरडत धांवतच आला घरांत. हापिसरांनीं उजव्या हातांतली कळशी आणि डाव्या खांद्याला भलें-थोरलें लावलेलें ओझें आपल्या हापिसांत उतरलें. मुलांनीं त्यांच्याभोंवतीं कोंडाळें केलें. मात्र, स्वयंपाकघराच्या दारांत थबकलेल्या सहचारिणीच्या डोळ्यांत दाटलेलीं आंसवें गालावरून टपटप ओसरलीं. हापिसरांनीं स्वयंपाकघराच्या दाराकडे पाहिलें तोंच ताईंनीं डोळ्यांना पदर लावून तीं आंसवें लपविण्याची लगबग केली. पण हापिसरांना तीं दिसलींच आणि 'हें काय' तेंहि समजून आलें. त्या आसवांचा उगम कशांत आहे हें कोणीं कोणाला विचारायला नको होतें नि सांगायलाहि नको होतें. सहजीवनांत दोन तपें गेल्यावर शाब्दिक खुलाशांची गरज उरत नाहीं.

केव्हां एकदां दादा बोचकें सोडतात, म्हणून उतावीळ झालेल्या मुलांना ताईंनीं गळा दाटून आलेल्या आवाजांत जरा दाबण्याचा प्रयत्न केला, 'अरे, कांहीं टेकून तरी जरा द्याल कीं नाहीं ?'

हापिसरांनीं रुमाल काढून ठेवला, उपरण्यानें घाम टिपला आणि दीर्घ निःश्वासानें दम टाकून बोचकें सोडायला सुरुवात केली.

ओल्या हरभऱ्याच्या पेंड्या, उसाचीं कांडीं, हुरड्याची पिशवी, गुळाच्या सायीचे चिमुकले (पंचपात्रीच्या आकाराचे) रवे, बिब्ब्याच्या माळा, वाळकें, अशा एक एक वस्तु बोचक्यांतून बाहेर पडल्या.

"अन् कळशी कसली ही ?" ताईंनीं विचारलें.

"काकवी आहे ती !"

कळशी मातीची होती. शिकाळें करून ती आणली होती. मुलांच्या गडबडींत तिला धक्का लागायचा ह्या भीतीनें ती उचलून बाजूला ठेवीत ताई कळवळून म्हणाल्या, "कशाला हें इतकं जिवाचं रान करायचं ! आधीं मेलं इतकं मैल चालायचं ! अन् तशांत हें खंडीभर ओझं !"

तोंच भिकंभट तिथें येऊन उभे राहिले. त्या आणलेल्या वस्तूंचा पसारा पाहून त्यांना बोलायला निमित्त मिळालें.

"हापिसर, काय हो हें ओझं ? इनामदारांना शोभत नाहीं. छकडा तरी करायचा ? पण, बाकी तुम्ही—"

"तुमचं पण-परंतु आलं ध्यानांत." हापिसरांनीं भिकंभटांना मध्येंच आडवलें. "रुपया-दोन रुपयांना मागें पाहणारा मी नव्हें. पण तो तसला फुकटंफाकटी खर्च कशाला ? त्यानं मिळणार काय ?– तर छकड्यांत बसण्याची ऐट ! पण देहाला तसं सोकवून देण्यापेक्षां, वांचवलेल्या भाड्यांत महिनाभर दुप्पट तूप-लोणी खाईन कीं ! तें खरं अंगाला लागेल !"

हापिसरांच्या ह्या युक्तिवादानें भिकंभटांना कांहींतरी विषय बदलणें भाग आलें –

"काय मुलांनो ! चैन आहे कीं नाहीं !"

ताईंनीं त्या जिनसांतून दोन हरभऱ्याच्या पेंड्या, चार उसाचीं कांडीं, एक बिब्ब्याची माळ असे जिन्नस उचलले आणि भिकंभटांच्या बिऱ्हाडीं पोंचते करायला आपल्या थोरल्या मुलाला सांगितलें. भिकंभटांनींहि 'कशाला-कशाला' म्हणत पाय काढता घेतला.

त्या मेव्यांत मुलें गुंतलीं. असल्या मेव्याची विशेष गोडी वाटते. कारण तो परगांवाहून आलेला असतो. तशांत वडिलांच्या वात्सल्यभावाची प्रेरणा त्यांत मिसळलेली असते आणि वात्सल्यप्रेरित कष्टांनीं त्यांचें मोल बाजारभावापेक्षां कितीतरी पटींनीं वाढलेलं असतं. मग त्याचं कौतुक कां वाटूं नये ? हलवायाच्या दुकानांतील उत्कृष्ट मिठाई त्याच्यापुढें फिकी आहे.

ताईंनीं चुलीवर चहाचें आधण टाकलें. दमून भागून आलेल्याला चहानें हुषारी वाटते म्हणूनच केवळ नव्हे. मास्तर 'हापिसर' झाले तेव्हांपासून त्यांच्या दिनचर्येंत चहाची महती वाढली होती. एका कपानें त्यांचें भागत नसे आणि किंचित्हि तो निवालेला त्यांना चालत नसे. अर्थात् ताईंनीं चुलीपाशींच त्यांचा पाट मांडला आणि हापिसर मागीलदारीं हातपाय धुवायला गेले.

हापिसरांच्या चैनीच्या कल्पनेंत 'मुबलक पाणी' ही एक बाब असे. केव्हाहि, चार चुळा भरायच्या असल्या किंवा हातपाय धुवायचे असले तरी कमींत कमी घंगाळभर पाणी त्यांना लागायचेंच. तितकें पाणी वापरल्याशिवाय त्यांना समाधान वाटायचें नाहीं. पाणी एकच तांब्याभर जर चुकून ठेवलें गेलें तर ते रागावलेच म्हणून समजावें.

"उरुण-इस्लामपूर आहे का हें? कुठनं लांबनं मोजक्या माकणी कां घ्यायची पाळी आहे? का डोक्यावरून नदीच्या घागरीं दरड चढून आणाव्या लागतात ?"

त्या उद्गारांत अनुभवलेल्या हाल-अपेष्टांची चीड होती, हें उघड आहे. नोकरींत असतांना पाण्याची हाकाहाक असलेल्या गांवीं त्यांना काळ कंठावा लागला होता सांठलेल्या पाण्याच्या तळच्यावर निर्वाह करण्याची पाळी म्हणजे दिनानुदिन मळमळ ! गोडें पाणी कुठून तरी लांबून कावडीनें किंवा माकणीनें आणवायचें ! अर्थात् तें मोलाचें ! एकाची मळमळ व दुसऱ्याला मोल – ह्यामुळें काटकसरीने पाणी वापरण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. ह्याची मनांत अशी एक चीड धुमसत राहिली कीं 'पेन्शनींत निवाल्यावर ह्याचं सव्याज उट्टं फेडीन. दारातल्या आडाचं पाणी वापरतांना तर हात आंखडायला नको ! पूर्वजांची पुण्याई उदंड भरलेली आहे. ऐसपैस घर, बारा

महिने तेरा काळ तुडुंब भरलेली परसांतली विहीर आणि वाचनाला बख्खळ फुरसत ! ' हापिसरांचें ऐश्वर्याचें हें स्वप्नरंजन असल्यामुळें आतां पाण्याचा हेमटेपणा त्यांना अजिबात खपेनासा झाला होता.

हात-पाय धुऊन हापिसर पाटावर आले. ताईंनीं त्यांच्या कपांत चहा गाळला आणि गरमागरम दूध सायीसकट ओतलें.

" अग अग ! काय हें ! साय पडली न् ? "

" तूप-लोणी दुप्पट खाणार आहांत ना ? मग साय त्यांचीच माय आहे कीं ! "

" तर मग, तूंच हा सायीचा चहा आधीं घेतला पाहिजेस. तूं घेतलास तर मी घेईन. "

इतका वेळ हातांतल्या कामावर खालीं असलेली ताईंची नजर एकदम समोर घरभिंन्याकडे वळली. क्षणमात्रच. त्या नजरेंत खोल अर्थ होता, महा-सागर हेलावत होता, ब्रह्मांड भरलें होतें. दुसऱ्याच क्षणीं त्या मागें टेकल्या, पुन्हा नजर खालीं पायाच्या बोटांकडे वळली.

" मीं कुठं चोवीस मैल तंगड्या तोडल्या आहेत ?" त्या म्हणाल्या.

" चोवीस मैल कां किती ? कुणीं मोजले आहेत ? पण चोवीस वर्षं खासच तंगड्या तोडल्या आहेस. तरी, आज तूं सायीचा चहा घेशील तर मी घेईन "

" उगीच कां आग्रह करायचा ? मी नाहीं माझा नेम इतक्यात मोडणार "

' नेम ' आणि ' इतक्यांत ' हे शब्द कानीं पडतांच हापिसर खजील झाले. ह्या दोन शब्दांच्या पोटीं तसाच इतिहास होता.

असाच एक कांहीं वर्षांपूर्वींचा प्रसंग. हापिसर चहा पिण्यास पाटावर येऊन बसले होते आणि ताईंनीं चहाच्या कपांत दूध घालतांना फुकून साय मागें सारली होती. मास्तरांना आला राग. त्यांनीं खस्सदिशीं ताईंच्या हातांतलें भांडें ओढून घेतलें आणि दुधावरची सगळी साय आपल्या चहाच्या कपांत घातली. साय घालून चहा पिण्यांत त्यांना वैभव वाटत होतें.

"तुझे काय चार चव्वल खर्चताहेत ?" असें ते पट्कन् तोंडल्यागत बोलूनहि गेले. आणि त्याच तावातावांत त्यांनीं तो चहा संपविला. ताईंना तो अविचार आवडला नाहीं; पण त्यांनीं एक ब्रहि काढला नाहीं.

पुढें दुपारचीं जेवणें झालीं. स्वयंपाक करतां करतां वाढायचें असल्यामुळें, सगळ्यांचें उरकल्यावर ताई एकटयाच मागून जेवीत. पण रात्रीं मुलांचीं जेवणें आधीं होत आणि मागून हापिसर व ताई एकदमच बसत. हापिसरांना भातावर तूप, भाकरीवर लोणी, असें कांहीं ना कांहीं डाव्या हातानें ताई वाढीत होत्या. पण अवचित हापिसरांच्या ध्यानांत आलें कीं ताईंनीं अन्नशुद्धीलाहि भातावर तूप घेतलें नाहीं, मग भाकरीला लोणी घेणें दूरच राहिलें.

"कां ग, तुला नको का तूप-लोणी ?"

"मी कुठं चार चव्वल मिळवतें ? मिळवायची अक्कल नाहीं, म्हणून जमेल तितकं वांचवायची माझी धडपड ! सहामाही सावकारी हप्ते हयातींत तरी फिटायला हवेत ना? " फुलपात्रभर पाणी पिऊन झाल्यावर ताई म्हणाल्या, "मीं आजपासून नेम केला आहे, जोंवर कर्ज आहे तोंवर तूप-लोणी वर्ज्य."

हापिसर एकदम वरमले. सकाळच्या चहाच्या वेळचा हा प्रतिध्वनी ! नरमाईनें, नव्हे, किंचित् काकुळतीनेंच ते म्हणाले, "पण एखाद्या वेळीं जरा सढळपणा केला तर ? काटकसर काय, कायमचीच कपाळीं लिहिली आहे!"

"पण मी कुठं कुणाला नको म्हणतें ? माझा नेम माझ्यापुरता !"

'नेम' शब्दाचा हा पूर्वेतिहास डोळ्यांपुढें उभा राहून हापिसर खजील झाले. त्यांनाहि पुढयांतला चहा पिववेना. त्यांचा हात अडखळला आणि ताईंच्या डोळ्यांतून पुन्हा खळखळ पाणी वाहूं लागलें.

कुणाचा काय दोष ? नेमाची आठवण द्यायची पाळी ह्या वेळीं आली नसती तर बरें झालें असतें म्हणून त्या हळहळल्या. बरं, हापिसरांनीं सायीच्या चहाचा ताईंना आग्रह केला तो तरी प्रेमभरानेंच ना ?

इतक्यांत मुलें स्वयंपाकघरांत आलीं. चहांत त्यांचा भाग होता ना ? घोट घोट चहा त्यांच्या वांटणीला आला; आणि तो सायीसकट मिळाल्यानें, पितांना त्यांनीं किती मिटक्या मारल्या.

रात्रीं निजण्यापूर्वीं जमाखर्च टिपून ठेवणें हा हापिसरांच्या दिनचर्येंतला शेवटचा कार्यक्रम. तशांत ते आज आठवड्याच्या फिरतीवरून परतलेले. वसुलाचाहि हिशेब मांडायलाच हवा होता. पण आधीं गृहलक्ष्मीकडून घर-खर्चाचें टिप्पण घेतलें म्हणजे ती निजायला मोकळी झाली, अशा विचारानें त्यांनीं ताईकडे टिपणाची मागणी केली.

ताईंना लिहिण्या-टिपण्याचा कंटाळा. आणि टिपायचें तरी काय होतें ? त्या तोंडींच सांगूं लागल्या :—

०–४–० भागीला – कणगींतले जोंधळे घोळून वाळवले त्याबद्दल मजुरी.
०–६–० शितीला – तुरी भरडण्याबद्दल.
०–२–९ दळपिणीला.
०–२–९ शितीला – सारवणाबद्दल

एव्हढेच द्यायचे आहेत. किती झाले ? ”

“ साडे पंधरा आणे ! ” हापिसरांनीं बेरीज करून सांगितलें. “ बस्स ? ” किती थोडे झाले, अशा अर्थाचा सूर होता त्यांच्या ह्या प्रश्नार्थक उद्गारांत.

“ पण आतां कांहीं आठवत नाहीं, ” ताई म्हणाल्या.

पुरता रुपया सुद्धां भरला नाहीं ! ह्या आकड्यांतला पोकळपणा हापिसर पूर्णपणें जाणून होते. पण त्यांनीं तो खर्च विश्वासुकपणानें तपशील-वार मांडून घेतला. आणि अर्ध्या आण्याच्या औदार्यानें, तुरी भरडण्याबद्दल शितीच्या नांवें साडेसहा आणे मांडून ताईंना बंदा रुपया दिला.

जमाखर्चांतला हा धडधडीत खोटेपणा ! पण कोणालाच त्याची खंत नव्हती. त्या दिवशीं ताईंची श्रीमंती एक रुपयानें वाढली होती.

आणि एक रुपया खर्चीं टाकतांना हापिसरहि मनांत म्हणत होते, कीं मीच आज एक रुपयानें श्रीमंत झालों आहें.

## : : ४

‘ सहामाही सावकारी हप्ते हयातींत तरी फिटायला हवेत ना ?’

ताईनीं हे उद्‌गार प्रथम काढले त्या वेळीं हापिसर नोकरींत होते. त्यामुळं हप्ता भागविण्याची त्या वेळीं तितकीशी धास्ती वाटत नव्हती. पण आतां प्राप्तींत निम्मी घट आल्यामुळें कांहींशी फिकीर वाटूं लागली होती.

कर्ज हापिसरांनीं केलेलें नव्हतें. त्यांच्या वडिलांनीं केलेल्या कर्जाचा बोजा हापिसरांच्या शिरावर येऊन पडला होता.

‘ हें इतकं कर्ज कसं झालं बुवा ?’ असें कोणी कोणी विचारीत तेव्हां तेव्हां हापिसर सांगत कीं—

“ भाऊ – आमचे वडील – होते अगदीं साधेभोळे ! इनामी उत्पन्न हेंच काय तें निर्वाहाचं साधन. टुकीनं संसार केला असता तर तेव्हढ्या उत्पन्नांतहि भागलं असतं. पण ‘ इनामदार, इनामदार ’ म्हणून लोकांनीं गौरवायचं आणि त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांना भरीं घालायचं ! मोठेपणाच्या कल्पना उगीच उराशीं बाळगून ते गोत्यांत आले होते. ‘ लोकांत बरं नाहीं दिसणार ’ असं म्हणून आवाक्याबाहेर खर्च करून लग्नकार्यं केलीं. सण-वार, देव-धर्म सारं कांहीं यथासांग व्हायलाच हवं म्हणून अवसान नसतांना खर्च चालूंच ठेवला. कुळांनीं ‘ काय सांगू दादा, आवंदा दोन बैल दगावले! ’ किंवा ‘ पिकलंच नाहीं बघा! ’ किंवा ‘ चोरांनीं उभं पीक कापून नेलं ’ अशीं गया-

वया करून करुणा भाकावी, आणि ह्यांनीं दया दाखवून वसूलांत सूट द्यावी! रोकड पैसा सहसा असत नाहीं जमीनदाराच्या हातांत. अर्थात् वाणी, गुजर यांच्याकडून उधारीनं माल आणायचा. त्यांनीं 'नांवें' काय नि किती मांडून ठेवलं ह्याची शहानिशा करून घेण्याचा सुद्धां भिडस्तपणा. आणि भिडस्तपणा सुद्धां ओढघस्तीमुळेंच बळावतो. त्यांना खडसावून केव्हां विचारतां येतं? बाकी चुकती करायची तयारी असेल तेव्हां! पण ती नसली कीं त्यांना फावतें. त्यांनीं गदळ माल पाठवून द्यावा आणि चोख मालाचा दर-दाम लावावा—अन् तोहि शेराऐवजीं सव्वाशेराचा! शिवाय बाकी फुगत चालली कीं तिच्यावर व्याज लावायचं, हा सावकारीपणाहि व्यापारी करूं लागतात. आणि सर्वांवर कडी म्हणजे नको तिथं भाऊंनीं टाक गुंतवून कांहीं खटलीं अंगावर ओढवून घेतलीं. स्वभाव धीमा; पण हीं वारुळं वाढूं लागलीं ना अंगावर! शेवटीं, सातान्याला नोकरीला गेले. नोकरी कसली करणार? छत्रपतीकडे पागा कारकुनाची नोकरी मिळवली. वय झालेलं. विधुरावस्था. हातानं कसं तरी शिजवून कांहीं तरी पोटांत घालायचं! तें का सोसतंय? प्रकृतीनं ठाव सोडला. अशा थराला गोष्टी आल्या होत्या; पण इतक्यांत—

माझी परीक्षा झाली आणि मी नोकरीला लागलों. लागलीच मीं भाऊंना कळवलं कीं, 'इतःपर नोकरीचे कष्ट करण्याचं कारण नाहीं. आपण घरीं जाऊन स्वस्थ राहावं. मी सारं कांहीं बघतों.'

आणि तसं केलं. ज्यांचीं ज्यांचीं म्हणून देणीं होतीं त्यांचे त्यांचे हिशेब काढले. कांहीं जमीन गहाण टाकून आणखीन् कर्ज काढलं आणि चट सगळे वाणी, गुजर व किरकोळ देणेकरी भागवून टाकले. 'भाऊंना इतःपर परस्पर कांहीं द्यायचं नाहीं' असं दुकानदारांना निक्षून सांगितलं. मीच हवं-नको सारं बघून तिमाही प्रपंचाची पुरेशी बेगमी करून ठेवूं लागलों आणि कोर्टामार्फत सावकारी कर्जाची हप्तेबंदी ठरवून घेतली. सगळीकडून फाटलेल्या आभाळाला असे टाके घातले.—अगदीं आंतडीं तोडून टाके घातले म्हणाना!"

ह्यांनिसर हें सांगत तेव्हां धुणें पिळतांना पाणी जसें खालीं गळतें तसे बोलत.

"सहामाही हप्ते भागवितांना मला कसे दिवस काढावे लागले असतील?"

हापिसरांनीं आपणच प्रश्न केला अन् त्याचें उत्तर द्यायला सुरुवात केली.

"मी नोकरीच्या गांवीं एकटाच होतों. भाऊ थकत चाललेले; त्यांच्या-जवळ कोणी हवं. अर्थात् नोकरीच्या गांवीं 'तिला' घेऊन जाण्याची सोय नव्हती. तिनंहि पण भाऊंच्या भावनांना किंचित्‌हि धक्का न लावतां, देवधर्म, सणवार, सारं कांहीं साक्षेपानं केलं. एका जुनेऱ्यावर तिनें दिवस काढले. एकच धड लुगडं धुऊन वाळवायचं, बाहेर जाण्यापुरतं नेसायला! बाकी घरकामांत माझं आड-जुनं धोतर आडवं लावून वेळ भागवायची.

असं राहून कर्जाचा खडक फोडला! टिटवीच्या चोचीनं सागर उपसला!"

"आतां हत्ती गेला न् शेपूट उरलंय. मग कशाला करतां विवंचना?" गणूदादा धीर देत.

"विवंचना करूं नको तर काय करूं? पेन्शनींत निघालों, प्राप्ति निम्मी झाली अन् प्रपंचखर्च तर वाढताच आहे. अजून मुलांचं काय झालंय? सारं तर पुढंच आहे. गणूदादा, सावकारी हप्ते ह्यातींत तरी फिटायला हवेत ना? हा प्रश्न रात्रीच्या अंधारांत एकदम लखलखूं लागतो. एक एक अक्षर वाढत वाढत जातं. 'शेपूट उरलंय' हें तुमचं म्हणणं खरं; पण हें शेपूट आहे मारुतीचं! भीमरूपीस्तोत्र तर तुम्ही रोज म्हणतां. त्यांतल्या—

वाढता वाढता वाढे भेदिलें शून्यमंडळा
अणूपासून ब्रह्मांडाएवढें होत जातसे
ब्रह्माण्डाभोंवतीं वेढे वज्रपुच्छें करूं शके

ह्या ओळींची प्रतीती सावकारी कर्जपाशानें येते.

व्याजाला व्याज, व्याजाला व्याज लावून सावकार आपल्या कर्जाचा आकडा फुगवीतच असतो. सावकाराचं व्याज हें असं पीक आहे कीं, तें उन्हाळा असो, पावसाळा असो, दुष्काळ असो, बारा महिने तेरा काळ वाढतच असतं." हापिसर कातावून बोलत होते. "कुणाला शाप द्यायचा झाला तर 'तुझ्या प्रपंचांत सावकार घुसो' हा द्यावा!"

"होय बाबा! पण होशील, होशील मोकळा" गणूदादा सांत्वनाच्या सुरांत म्हणाले.

"देवानं मला तेव्हढं आयुष्य द्यावं – पितृऋणांतून मोकळा झाल्याशिवाय राहणार नाहीं. माझ्या मुलांना तरी हा वारसा ठेवणार नाहीं, असं म्हणतोंय. मग अंबाबाईची काय इच्छा असेल ती खरी ! "

"अंबाबाई नाहीं अंतर देणार तुला." गणूदादा धीर देत म्हणाले, "अरे, ताईनीं तिच्या नवरात्रासाठीं प्राण पाखडले आहेत – भाऊ होते तोंवर आणि भाऊंच्या माघारीं देखील ! एखाद्या वेळीं तूं चालढकल केली असतीस, पण ताईनीं चालढकल केली नाहीं कीं रतिभर उणं पडूं दिलं नाहीं. ताईंची तपश्चर्या वांया जाईल ? छे, भिऊं नकोस."

"भीत नाहीं हो." हापिसर अवसान आल्याच्या आवाजांत म्हणाले. "कर्ज काय माझ्यामुळं थोडंच झालंय – मला खंत वाटायला ? स्वतःच्या चैनीसाठीं छदाम खर्च केला असेल तर मला बोल लागेल. हाडाचीं काडं करीत, हरिश्चंद्राच्या निर्धारानं, हप्त्याच्या मोळ्या टाकीत आलों आहें सावकाराघरीं. शेवटला हप्ता ज्या दिवशीं भागवीन त्या दिवशीं मी अवभृत स्नान करीन."

: : ५

अशा ह्या शापित संसारांत हौसेला अवसर कुठून असणार? सावकाराची धन करतां करतां नेहमींची तोंडमिळवणी देखील कितीकदां होत नसे. किमान गुजराणीचे मासिक खर्च भागवतांना एकादें खिंडार बुजवायचें राहून जायचें. पुढच्या महिन्याला तें बुजविण्याची शिकस्त करावी तर दुसरीकडे भोसका पडायचा! किल्ला झुंजविणाऱ्या चांदबिबीप्रमाणें! अशी त्या दंपतीची फेसाटी उडत असे. लौकिकांत पत सांभाळण्याची ते पराकाष्ठा करीत. ओढघस्तपणा लोकांत दिसूंच नये, असें कसें शक्य होणार? – विशेषत: प्राथमिक शिक्षकाच्या प्रपंचात? पण त्यांतहि न्हावी, परीट, गवळी दळपीण अशीं नित्याचीं व दरमहाचीं देणीं वेळच्या वेळीं भागविण्याची त्यांची शिस्त असे ह्या लोकांना पैशासाठीं आपल्या दारीं खेटे घालण्याची पाळी येतां कामा नये, ह्यावर त्यांचा कटाक्ष असे. तत्त्वत:च त्यांना हें पसंत नव्हतें. ही त्याची धडपड आणि तळमळ लोकांच्या जसजशी प्रत्ययास येत गेली तसतशी त्यांच्या प्रासंगिक ओढघस्तपणाकडेहि जनता क्षमाशीलतेनें पाहूं लागली

चागला नमुनेदार माल दुकानांत आला कीं दुकानदार मुद्दामच हापिसरांना हाक मारीत. घरांत तात्कालिक गरज नसल्यास आणि खिशात पुरेसा दाम नसल्यास, हापिसर कां म्हणून माल खरेदी करतील? पण हापिसरांनीं भवानी केली कीं मालाचा उठाव चांगला होतो, अशी दुकानदारांची समजूत

झाली होती. शिवाय, ते आज नाहीं उद्यां बाकी कटाक्षानें चुकती करतीलच, असा भरंवसा दुकानदारांना वाटूं लागल्यामुळें ते चांगला माल सवलतीनें हापिसरांच्या घरीं घालूं पाहत. त्यामुळें, संसारांत काहीं कमी आहे असें सहसा होत नसे.

तथापि एक मात्र निश्चितच कीं, 'हौस' हा शब्दच हापिसरांच्या जीवित-कोशांत नव्हता. ताईंनींहि, अर्थातच, स्वतःच्या हौसेबाबत गांधारीप्रमाणेंच आपले डोळे बांधून घेतले होते. पण आपल्या लेकराला एखादें तरी लेणें घालावें असें 'आई' च्या मनांत कधींच येणार नाहीं, असें कसें होईल ?

ताईंना फार हौस होती सोन्याच्या हसळीची. पहिल्या दोन तीन अपत्यांच्या खेपांना तें जमलें नाहीं ! कारण परिस्थितीच अशी होती कीं कशांत काय नि फाटक्यांत पाय ! लाख-भरल्या सोन्याच्या मण्यांच्या मनगट्या आणि तसलाच बारीकसा ताईत, एव्हढ्या बाळलेण्यांवरच भागवावें लागलें होतें. लक्ष्मीनें घरांतून काढता पाय घेतल्यानें भाऊंच्या जवळचें किडूक-मिडूकहि तिच्या पायांना अडकून गेलें ! पाठ फिरवलेल्या त्या लक्ष्मीचा डोळा चुकवून भाऊंनीं एक पिंपळपान दडवून ठेवलें होतें. तें त्यांनीं मोठ्या कौतुकाने नातवाच्या कपाळावर हलता-डुलतांना पाहून डोळे भिजवले होते. ह्यापरता नातवांना सोन्यामोत्यांचा संपर्क नव्हता.

'चिमुकल्या भास्करभाऊच्या गळ्यांत सोन्याची हसळी घालायचं जमलं तर ! – त्याच्या गळ्यांत ती किती खुलून दिसेल त्याच्या गोरेपणामुळें ! कमरेला घागऱ्यांचा करदोटा आणि गळ्यांत सोन्याची हसळी असं तें गोजिरं ध्यांन घरभर उघडंच दुडदुडतांना पाहून आपण गोकुळींच्या यशोदेचं सौभाग्य भोगावं,' असे मनांतल्यां मनात ताईंनीं कितीदा तरी मनोरे उभारले असतील.

पण हे मनोरथ सफळ होण्यासाठीं हापिसराजवळ बोलणें काढणें शक्यच नव्हतें. करायची तर आपणच सारी जुळवाजुळव केली पाहिजे, हें त्या जाणून होत्या. आणि म्हणून शक्य त्या त्या मार्गांनीं कमाई करण्यासाठीं त्या सावध असत. भांड्यांना कल्हई त्याच लावीत; पण हापिसराकडून बाजार-भावानें त्याचें मोल वसूल करीत. गावांत मोठा उत्सव रामनवमीचा. मोठी

यात्रा जमत असे. यात्रेंत गांवोगांवचे हलवाई येऊन पालें घालीत. त्यांना घडवंची, फळ्या, असें कांहीं सामान लागे आणि स्थानिक गांवकऱ्यांकडून ते त्या वस्तू भाड्यानें घेत. ताईंच्याकडे असें कांहीं भाडें उत्सवांत जमा होत असे. वसुलाच्या दिवसांत घरीं उणेंपुरें खंडीभर धान्य यायचें. त्याची उस्त-वारी त्या स्वतःच करायच्या; पण हापिसराकडून राजरोस मजुरी मागून घ्यायच्या. हापिसरांच्या गैरहजेरींत फाटक्या कपड्यांवर बोहारणीकडून एखादें भांडें मिळालें तर तें विकत घेतलें असा त्या बहाणा करून मालकांकडून त्याचा दाम उकळीत. हापिसरहि हें ‘ उघडं गुपित ’ उमगून होते. पण त्यांनीं तक्रार न करतां तें तसेंच चालून दिलें. ‘ जुगदानाच्या एका कप्प्यांतून दुसऱ्या कप्प्यांत ’ एव्हढ्याच अर्थाचा हा आय-व्यय नव्हे का ?

चैत्रगौरीचे दिवस. सत्यंकाकूकडे ताई हळदीकुंकवाला गेल्या असतांना, सरी-ठुशी वांकी यांचीं बायका-बायकांत बोलणीं निघालीं होतीं. तेव्हां ताईंना कळलें कीं सोनें जरा स्वस्त झालें आहे. घरीं येतांच त्यांनीं गुपचुप-पणें आपली गंगाजळी मोजून पाहिली. ती पुरेशी आहे असें दिसून येतांच त्यांनीं हापिसराजवळ हलकेंच सूतोऽवाच केलें.

“ बरं का, भास्करभाऊचा वाढदिवस जवळ आलाय ! ”

“ होय. ” – हापिसर.

“ सत्यंकाकू म्हणत होत्या – ” ताई जरा थबकल्या बोलतां बोलतां ! पण पुन्हा नव्या दमानें त्यांनीं तें वाक्य पुरें केलें. “ सोन्याचा भाव बराच उतरलाय म्हणे ? ”

“ सोनं, मोती हीं आपलीं खेळणीं नव्हंत ! ”

“ तें कांहीं नाहीं ! आजवर मेलं मन मारलं ! पण एकदां तरी डोळ्याचं पारणं फिटूं द्या कीं ! ”

“ सावकारी हप्ते फिटल्याशिवायच ? ”

“ तुम्ही नाहीच म्हणणार ! पण मी तुमच्या शिरावर ओझं वाढवीतच नाहीं मुळीं ! भास्करच्या गळ्यांत ह्या वाढदिवसाला हसळी घालायचीच ! ” इतकें बोलून संकल्पाच्या सिद्धीसाठीं लागणारी, सांदी-कोपऱ्यांत दडवून

ठेवलेली, 'माया' त्यांनीं हापिसरांपुढें ठेवली. हापिसर काय बोलणार? त्यांचा कंठ दाटून आला होता. तशा सद्‌गदित स्वरांतच ते म्हणाले, "अरे, गणूदादा आहेत का बघून या बघूं कोणी तरी. असले तर त्यांना म्हणावं मी बोलावलं आहे जरा."

आणि एक दिवशीं, चिमुकल्या भास्करचा वाढदिवस उगवला, – नव्हे, अक्षरशः सोन्याचा दिवस उगवला. गोन्यापान गुटगुटीत भास्करच्या गळ्यांत सोन्याची हसळी झळकली. हापिसरांच्या घरांत नवल वर्तलें. सारी ताईंची माया! पाठमोऱ्या झालेल्या लक्ष्मीची नजर चुकवून आजोबांनीं दिलेलें पिंपळपान कपाळावर रुळतें आहे अन् गळ्यांत हसळी झळकते आहे, अशा थाटांत, पुढील घराच्या भव्य दरवाजापासून मागील दाराच्या दिंडीपर्यंत, उघड्या अंगानं भास्करभाऊला दुडूदुडू दौडतांना पाहून ताईंना वाटलं कीं नंदाघरच्या यशोदेचं भाग्य आज माझ्या घरांत गजबजलें आहे.

## : : ६

भल्या पहाटे उठून हापिसर गांवाला जायची तयारी करीत होते. अंबिकाबाईंनाहि तो बेत आदल्या दिवशींच कळला होता. ' कऱ्हाडला जायचं आहे उद्यां ' असें हापिसरांनींच सांगितलें होतें. त्यांना नेहमींच पाटणाला किंवा कऱ्हाडला जावें लागे. किरकोळ दिवाणी-मुलकी दावे चालू असत. मधून मधून त्यांच्या तारखा येत. त्यानिमित्त अशा येरझारा होत. तेव्हां, विशेष विचारपूस करायची गरज नसे. फक्त तयारी काय नि किती करायची हा काय तो प्रश्न. पण, वसुलाच्या गांवीं जायचें असलें म्हणजे तिथें मुक्काम किती व्हायचा त्या मानानें जादा तयारीची गरज पडे. कऱ्हाड, पाटण हीं तालुक्याचीं गांवें. कामापुरताच तिथें मुक्काम. विशेष शिदोरी वा शिधासामग्री यांची त्या मुक्कामासाठीं जरुरी नसे. कऱ्हाडला त्यांची बहीण होती. तेव्हां मुक्काम हक्कानेंच तिच्याकडे होई. पाटणलाहि लागाबांध्याचीं माणसें होतीं. आणि पाहुणा आला कीं कपाळाला आंठ्या पडाव्या, असा तो काळ नव्हता.

तृणानि भूमिरुदकं वाक् चतुर्थीच सूनृता
एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यन्ते कदाचन

पडवी, पथारी, गूळ-पाणी, भाजी-भाकरी यांनीं आल्या अतिथीचें कुठेंहि सादर स्वागत होई. तरी पण, घरून निघणारा आपली कांहीं पुरचुंडी बांधून बरोबर घेतच असे. कऱ्हाड म्हणजे तब्बल सोळा मैलांची वाटचाल! कधीं

कधीं एकठोक कचेरीच गांठावी लागे. तेव्हां, एक वेळची शिदोरी हवीच. म्हणून अंबिकाबाई त्या तयारीसाठीं लौकरच उठून कामाला लागल्या होत्या. निदान पिठलें आणि दशम्या करणें भाग होतें. ऊन व्हायच्या आंत हापिसरांनाहि बरीच मजल मारायला हवी होती. म्हणून घाई, गडबड.

सारें उरकून हापिसर वाटमार्गी झाले. मग, नेहमींचे केरवारे, सडा-संमार्जन करायला अंबिकाबाईंना सवड झाली. गोठ्यांतूनहि खराटा फिरवावा लागे. यथाक्रम एक एक काम हातावेगळें झालें. माळ्यावर अडगळींत टाकलेलीं एकदोन ठेवणींतलीं भांडीं, ढवळणें, घमेलें, दुरडी, यांची आज गरज होती. हापिसर गांवाला जायचे असले म्हणजे ठेवणींतलीं कामें निघत. पोहे कांडणें, *उमलं घालणें, अशा कामांना फुरसत तेव्हां मिळे. शेजारणींना मदतीला बोलवायलाहि तीच संधि. मनमोकळेपणीं त्यांच्या गप्पागोष्टी चालतां चालतां कामाचा फडशा पडत असे. म्हणून, अंबिकाबाई त्या वस्तू खालीं आणण्यासाठीं माळ्यावर गेल्या. सहजच त्यांची नजर कोपऱ्यांतल्या मोडक्या-तोडक्या जिनसांच्या ढिगाऱ्याकडे गेली. मोडीला घालायचीं भांडीं, ठाणवई, समया, मोडकी तिवई, डबडीं, खुरपीं असल्या सटरफटर सामानांचा तो ढिगारा. तो त्यांनींच लावून रचलेला. अर्थातच त्याचें ढळलेलें स्वरूप त्यांच्या लक्षांत आलें. घाबऱ्या अंतःकरणानें त्यांनीं तो ढिगारा चाळवून पाहिला. त्याच्या तळाशीं ठेवणीची एक करंडी होती. गरिबाघरीं तिजोरी-ऐवजीं असल्या ढिगाऱ्यावरच भिस्त असे. करंडी तर दृष्टीस पडली. अधीरतेनें त्यांनीं ती उघडून पाहिली. आणि त्यांच्या काळजांत चर्रर्र झालें. सुरक्षितपणासाठीं तिथें त्या करंडींतच भास्करभाऊची हसळी त्यांनीं ठेवलेली होती; ती आढळली नाहीं. करंडीनेंच ती गिळली काय! जिवाचें पाणी-पाणी झालें. पण इथें ती जिन्नस ठेवलेली तशी कुणाला ठाऊक नव्हती. आणि येथपर्यंत शिरकाव होण्यासारखें घरांत कोणी गडीमाणूसहि नव्हतें. कष्टानें गुजराण करणाराच्या प्रपंचांत चाकर-नोकर नसतातच. मग कुणाचा संशय घ्यायचा ?

---

* लाहया भाजायसाठीं जोंधळा गरम पाण्यानें भिजवून वाफेसहित दडपून ठेवणें.

९२८९०

अंबिकाबाईंना वाटलें, 'आपण माजघरांतल्या फडताळांतच तर ठेवली नसेल ती ?' तशाच, कांपऱ्या पायांनीं त्या लगबगीनें शिडी उतरून खालीं आल्या आणि त्यांनीं फडताळ उघडून पाहिलें. फडताळांत तोंडाशीं कापूर, लवंगा, तीळ, मोहरी, वेलची, असल्या अनेक प्रापंचिक वस्तूंच्या छोटचा छोटचा डब्या-बाटल्या, बारक्या बरण्या, ह्यांची गर्दी होती. त्यांच्या पलीकडे आंत खोलांत एक सांगशी ठेवलेली होती. ती हाताला लागली. ती चटकन् बाहेर काढून त्यांनीं पाहिली. हसळी तिच्यांतहि नव्हती ! त्यांच्या अंतः-करणानें ठाव सोडला !

पण कुणाकडे काय बोलायचें ? आंवढा गिळून गप्प बसणेंच युक्त होतें. कवडी कवडी जोडून त्यांनीं माया जमवली होती. खरेंच, संपत्ति ही नुसती माया ! हरिदासाच्या ह्या तत्त्वज्ञानाचा असा प्रत्यय यावा ? छेः, कथे-कऱ्याची ही व्याख्या त्यांना कशी पटावी ? तें तत्वज्ञान – पुराणांतलीं वांगीं पुराणांत ! व्यवहारांत ती माया नव्हती. अंबिकाबाईंनीं थेंब थेंब घाम गाळून, हाताची सालडीं जाईपर्यंत सारवण करून, सडण्या-पाखडण्यापायीं रट्टे पाडून, रक्त आटवून जें जोडलें होतें तें 'माया' नव्हतें. तें त्यांच्या रक्तामांसाचें प्रतीक होतें. तें असें हरवावें ? शनीची अवकृपा अशी अनु-भवाला यावी ? या विचारांच्या वावटळींनीं त्यांच्या जिवाची कर्दळ पार कोलमडून पडली. त्यांच्या हातां-पायांतली शक्तीच गेली.

'आईला काय होतंय' हें मुलांना कळेना. स्वयंपाक करायचीहि अंबिका-बाईंना उभारी राहिली नाहीं. पण बोलायची सोय नव्हती. त्यांतून, मुलांपाशीं काय बोलायचं ? भात शिजवायला श्रम पडत नाहींत. तो शिजला. हापिसराबरोबर देऊन, दशम्या नि पिठलें पुरेसें उरलें होतें. तेव्हढ्यावर दुपारची वेळ भागायला हरकत नव्हती. मुलाकरवीं त्यांनीं शेजारणींना सांगून पाठविलें कीं, "आज आईला बरं नाहीं म्हणावं. तरी आज दुपारचा बेत रहित केलाय."

आणि तिसऱ्या प्रहरीं अंबिकाबाईंनीं गुपचुप मागल्या दारानें आणि मागल्या आळीनें जोशीबुवांचें घर गांठलें. जोशीबुवा प्रश्न सांगत. ओसरी-

वर ते एकटेच आहेत असें पाहून अंबिकाबाईंनीं त्यांच्यापुढें पैसा-सुपारी ठेवून हरवल्या वस्तूबद्दल प्रश्न विचारला. जोशीबुवांनीं होरा पाहिला; काळ-वेळेची कुंडली मांडली; आणि थंडपणें सांगितलें, " वस्तु परक्याच्या हाताला कांहीं लागली नाहीं ! पण परत मिळणंहि शक्य दिसत नाहीं ! "

हापिसर आले म्हणजे — ? ? ? ?

दुसरे दिवशीं दिवेलागणीच्या वेळीं, अंबाबाईपुढें तेलवात करतांना अंबिकाबाई मनोभावें पुटपुटत होत्या :

**घरांतली इडापिडा बाहेर जावो**
**बाहेरची लक्ष्मी घरांत येवो**
**घरच्या धन्याला उदंड औक्ष येवो**

तों च पारू धामणेरकरीण दूध घालायला आली. ती म्हणाली, " दादा अजून न्हाई आलं जनू ?"

अंबिकाबाईंनीं विचारलें, " कां ग ? "

तेव्हां ती म्हणाली, " तसं नव्हं. पण कारबारी म्हनत व्हतं ' दोपारा दादा पाटणाला व्हतं. ' सांचीपारा येईन ' असं बी ते म्हनाले. तवा म्हटलं अजून कसं न्हाई आलं बा ?"

अंबिकाबाईंच्या मनांत प्रश्न चमकून गेला, ' पाटणाला ? कऱ्हाडला जातों म्हणून सांगायचं झालं होतं ? '

पारू पुढें म्हणाली, " डोंगरांतनं यायाचं ! तवा, दिस है तंवर येनं बरं न्हवं ? —येत्याल बी इकत्यांत. " असें म्हणून, दूध घालून पारूनें पाठ फिरवली अन् हापिसरांचा जोडा थोरल्या दरवाजात वाजला.

" धनी आलं व ऽ ऽ " अशी अंबिकाबाईंना हाळी देत, मानेला किंचित् हिसका देऊन डोईवरचा पदर आणखी जरासा पुढें ओढून, अंग चोरून वाट देऊन, पारू निघून गेली,

पाठुंगळीला पोर बांधतात तसें बोचकें बांधायची हापिसरांची पद्धत असे.

आपल्या हापिसांत येऊन त्यांनीं पाठीवरचें तें ओझें उतरलें न् डोईचा रुमाल खालीं काढून ठेवला. वयोपरत्वें डोकें तुळतुळीत झालें होतें. त्यावर डंवरलेला घाम दिव्याच्या उजेडांत चमकत होता. तो निरपून, उपरण्यानें पुसतां पुसतां त्यांनीं स्वयंपाकघराच्या दाराकडे नजर टाकली. तोंच अंबिकाबाईंनीं आपला उतरलेला चेहरा लपविण्यासाठीं मागें स्वयंपाकघराकडे दृष्टि वळविली. तथापि त्यांची उतरलेली चर्या हापिसरांच्या लक्षांत यायला मुळींच वेळ लागला नाहीं. पण " कांहीं होतंय का " हें विचारावें कसें ? आणि विचारायला हवें होतें तरी कशाला ?

अंबिकाबाई स्वयंपाकघरांत वळल्या आणि भास्करभाऊकडून त्यांनीं विचारलें, " चहा करायचा ना ? " खरें म्हणजे, नेहमींप्रमाणें हें खुद्द अंबिकाबाईंनींच विचारायचें ! पण आज ही विचारपूस मुलामार्फत होत आहे. उतरलेली चर्या, परहस्तें विचारपूस ! —हापिसरांचें मन एक एक तपशील टिपून घेऊं लागलें.

" आधीं अंघोळ करतों " असें हापिसर म्हणाले.

आणि तेंहि रास्तच होतें. गरम पाण्यानें चांगली आंघोळ केली कीं वाटचालीचा अर्धाअधिक शीण जातो. अंबिकाबाई लगेच मागीलदारची चूल पेटवायला गेल्या. एका कोपऱ्यांत तीन तोंडींची चूल भक्कमपणें लिंपलेली होती. तिच्यावर पाणी तापवायचा धुरकटलेला, जळक्या बुडाचा हंडा नेहमींच ठाण मांडून असे. शेजारींच कोपऱ्यांत जळण-काटुक होतें. गायीच्या पुढचीं टाकाऊ चिपाडें, ज्वारीचे सड, तुरकाट्या, ढलप्या आणि (शेताच्या बांधावरल्या झाडांच्या तोडून आणलेल्या फांद्यांच्या) वाळलेल्या काटक्या, अशा सर्पणाचा ढिगारा नेहमीच सज्ज असे. पाणी तापलें. आंघोळीच्या ऐसपैस हामचौरस दगडाशेजारीं पाटावर धोतर आणि उपरणें नेऊन ठेवण्यांत आलें. हापिसरांचीं धोतरें दहा वारी जाडींभरडीं असत. त्या धोतराची दुहेरी घडीच ते आंघोळीनंतर प्रथम लावून घेत. एक टोक कासोट्यासारखें खोवायचें आणि पुढें जेमतेम निरी-दीड-निरी यायची. त्याप्रमाणें धोतर लावून घेऊन ते माजघरांत आले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...3२७८२... दि: ...
क्रमांक ...२०३८... प्रकरण संहावे ...

भारावलेलीं अंत:करणें किती वेळ तशींच राहणार? दडपण बाजूला सरायला हवेंच होतें. कोणीं कसें सूतोऽवाच करायचें, हाच प्रश्न. पाठीवरून उतरून ठेवलेल्या बोचक्यांतील, फाडलेल्या कागदाचे चार-पांच कपटे घेऊन हापिसर स्वयंपाकघरांत आले. कांहीं बोलायचा इरादा होता. पण गळा दाटून आला. अखेर तशाच गहिंवरलेल्या आवाजानें ते म्हणाले, "आज अवभृत स्नान करून मोकळा झालों! ही भास्करभाऊची हसळी!" कसेबसे एव्हढे शब्द उच्चारून त्यांनीं अंबिकाबाईंपुढें हातांतले ते कागदाचे तुकडे टाकले; आणि पाटावर धपकन् बसून ते मागें टेकले व धोतराचा सोगा त्यांनीं डोळ्यांना लावला.

अंबिकाबाईंच्याहि डोळ्यांतून टपटपटप अश्रूंची धार लागली. जोशीबुवांनीं सागितलेला मोघम होरा त्यांना आतां स्पष्ट झाला. कऱ्हाडवरून पाटण कां गांठलें, त्याचाहि उलगडा झाला.

अश्रू वाहूं लागले कीं शब्द खुंटतात. उभयपक्षीं तशाच अबोल अवस्थेंत किती काळ गेला कुणास ठाऊक! मुलेंहि त्या प्रसंगानें अगदीं चूर होऊन गप्प बसलीं होतीं – माजघरांतल्या दिव्याभोंवतीं उगीच दप्तरें उघडून, खालीं मान घालून बसलीं होतीं. त्यांना असल्या प्रकरणाचा नीट अर्थ कळला नाहीं तरी वातावरणाचा वास येतोच. खालच्या नजरेनेंच तीं वास घेत होतीं.

दुसऱ्या दिवशीं गणूदादा आले तेव्हां इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी निघतां निघतां हापिसरांनीं सांगितलें –

"गणूदादा, काल अवभृत स्नान करून मोकळा झालों. कर्जाचा शेवटचा हप्ता भरून दस्तऐवज सोडवून आणला. पण एक भयंकर पाप घडलं काल माझ्या हातनं!" एव्हढें बोलून हापिसर थोडा वेळ थांबले; आणि पुन्हा बोलूं लागले, "पेन्शनींत निघाल्यापासून पसा गांठीला राहीना. तारीख तर चुकूं द्यायची नव्हती. अखेर सोन्याची हसळी कराडला जाऊन मोडली आणि पाटण गांठलं. कर्जरोखा फाडून घेतला. भाऊंच्या ऋणांतून मुक्त झालों. चोरी,

चहाडी, शिदळकी मला स्वप्नांतहि माहीत नाहीं. पण घरच्या हसळीची बरीक काल चोरी करावी लागली. ती बोचक्यांत गुपचूप बांधून घेतांना मला कांहीं वाटलं नसेल होय? अरे, जन्मभर जिवाला खातंय कीं गुंजभर देखील सोनं मला घेतां आलं नाहीं! अन् उलट, आज, तिनं स्वकष्टानं मोठ्या हौसेनं केलेल्या बाळलेण्यालाच चोरून हात घालायचा प्रसंग आला! पण सावकार घरांतून घालवायचा होता. दगडासारखं मन केलं. कर्जबाजाऱ्याच्या घरांतल्या चांदी-सोन्याला शाप असतो. त्याच्या घरांत किडुक-मिडुकहि ठरत नाहीं. एक एक जिन्नस सराफकट्टयाची वाट धरत असतो. गणूदादा, कर्ज-फेडीपायीं इतका पैसा सावकाराच्या घरांत घातला कीं तेव्हढ्यानं ह्या घरांत सोन्याची पहार उभी झाली असती सोन्याची पहार!"

शब्द फुटेनासा झाला कीं चिलीम जवळ घ्यायची, हा हापिसरांचा प्रघात. तिची साफसुफाई करीत, आवंढा गिळून, ते पुन्हा बोलूं लागले –

"अरे, सोनं सोनं तें काय! माझ्या संसारांत ही (–खालच्या मानेनें अंबिकाबाईकडे हात करीत ते म्हणत होते–) ही सोन्याची चालती-बोलती पहारच प्रत्यक्ष वावरतेय."

❊ ❊ ❊

*भुंगा – सावकार – वाळवी – व घूस यांचा प्रवेश घरांत झाला म्हणजे घर पोखरलें म्हणून समजावें. वाळवी आपला व्यवसाय गुपचुप चालविते – घूस रात्रीं अंधारांत – चोरून – सावकार व भुंगा हे मात्र धडधडीत दिवसा – व मालकाच्या कानाशीं भिणभिण – कटकट लावून.*

*न्हाव्याकरितां हजामत – व सावकाराकरितां व्याज – यास खळ नाहीं. प्लेग असो, दुष्काळ असो – इसम हैराण – बेहोष – विपद्ग्रस्त – निदान बेशुद्ध – परागंदा – कसाहि असो – आज गुळगुळीत, उद्यां खडबडीत! – व्याजाचा प्रकारहि तसाच – प्लेगांत कैक कारणानीं धंदे – रोजगार बंद पडतात. – व्याज बंद पडल्याचें ऐकिवांत नाहीं.*

*[ हापिसरांच्या पत्रांतील एक परिच्छेद ]*

## : : ७

हापिसरांच्या अंगणांत चिखलाची गार दोन दिवस भिजत होती. आज ती चांगली कालवून, तुडवून, विटा घालायच्या असा हापिसरांचा बेत दिसत होता. मागीलदारच्या विहिरीवरून घागरी आणून त्या गारींत ओतायचें काम चाललें होतें.

अंगणाच्या पूर्व बाजूच्या दुजोडीला भिकंभटाचें बिऱ्हाड होतें. सकाळची वेळ. स्वाभाविकच स्नान-संध्या, देवपूजा, इत्यादि नित्याचीं प्रातःकर्मं उरकण्यांत ते ह्या वेळीं गुंतलेले होते. मधून-आधून उच्च स्वरांत—

शंखादौ चंद्र-दैवत्यम् कुक्षौ वरुणदेवता
पृष्ठे प्रजापतिश्चैव अग्रे गंगा-सरस्वती

* * *

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थांगतोऽपिवा
यःस्मरेत् पुंडरीकाक्षम् सबाह्याभ्यंतरःशुचिः

* * *

मालत्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनिवैप्रभो
मयाहृतानि पूजार्थम् पुष्पाणि प्रतिगृह्यताम्

सेवंतिका–बकुल–चंपक–पाटलाब्जैः
पुन्नाग–जाति–करवीर–रसाल–पुष्पैः
बिल्वप्रवाल–तुलसीदल मालतीभि-
स्त्वां पूजयामि जगदीश्वर मां प्रसीद

असे जे मंत्र अंतरा–अंतरानें आणि तुटकपणानें ते म्हणत ते अंगणांत सहज ऐकूं येत होते आणि त्यांवरून त्यांच्या ब्रह्मकर्माचा पल्ला कुठवर आला आहे तो सहज कळत होता.

इतक्यांत गणूदादा तिथें आले. त्यांचाहि एक नित्याचा उद्योग ह्या वेळीं ठरलेला असे. त्यांच्या अंगावर नुसतें उपरणेंच होतें. अंगावरच्या उपरण्यानें सर्व गांवभर भटकून येण्यांत त्यांना कांहींच उणेपणा वाटत नसे, संकोच वाटत नसे. ब्राह्मणवस्तीचा तो गांव. गांवाची लांबारुंदी खेड्याच्या मानानें आटोपशीर. सकाळच्या वेळीं तेव्हढ्या वेषानें नदी–ओढ्याच्या कांठाकांठानें बहिर्दिशेला दूरवर जावें, येतांना प्रवाहातच हातपाय धुणें होई तें साधावें, कुणाच्याहि मळईच्या कुपाडीचीं कण्हेरी–कोरांटीचीं फुलें उराशीं धरलेल्या उपरण्याच्या खोळींतून आणावींत, असा पांढरपेशांतल्या बहुतेक पुरुषांचा दैनंदिन कार्यक्रम असे. अंगावरून येणारे–जाणारे सारे नित्याच्या परिचयाचे. मग बुजायचें कोणीं कुणाला? आणि कां म्हणून? त्यांतूनहि गणूदादाच्या हिशेबीं सारेच 'अरे–तुरें'तले! 'अहो–जाहो' म्हणायचें तें इतरांनीं गणूदादाला! अशी त्यांची वडिलकी. ह्या वडिलकीच्या बळावर ते कुणाच्याहि परड्यांत आपुलकीच्या निःशंकपणानें शिरत, चार-चार फुलें काढून घेत आणि त्यांच्याच स्वयंपाकघरांतून किंवा माजघरांतून त्यांचें क्षेमकुशल पुसत पुसत बाहेर पडत.

हापिसर तर त्यांचे अगदीं पुढच्या दारचे शेजारी. मग त्यांच्या घरीं त्यांना जादा अधिकार आणि सवलती कां असूं नयेत? ढांसळलेल्या कुसवाच्या खिंडारांतून प्रवेश करून, मागीलदारच्या फुलांची खंडणी वसूल करून, ते हापिसरांच्या हापिसांतूनच ओसरीवर आले.

अंगणांत हापिसर खोऱ्याचा आधार घेऊन चिखल तुडवीत होते. तोंच भिकंभट ताम्हनांतलें पाणी अंगणांतल्या तुळशीच्या आळ्यांत टाकण्यासाठीं आले. गणूदादा समोरच नजरेस पडले. तेव्हां भिकंभटांना बोलायची स्फूर्ति झाली.

"पाहिलंस गणूदादा, पेन्शन घेऊन घरीं आलेल्या हापिसरांनीं हा का

उद्योग करायचा ? स्नान, संध्या, देवपूजा, वैश्वदेव ह्यांत ह्यांनीं लक्ष नको का घालायला ? नोकरीच्या भाऊगर्दीत लक्ष द्यायला जमलं नसलं तरी, म्हातारपणीं फावल्या वेळीं तरी कांहीं परमार्थाची जोड करावी कीं नाहीं?"

"करतोय ना स्नानसंध्या !" उत्तर देणें भागच होतें म्हणून हापिसर म्हणाले, "ही चिखलाची गार तुडवितांना मृत्तिकास्नानच घडतं आहे कीं ! स्नान केल्यावर भस्माचे पट्टे तुम्हीं ओढले आहेत; पण मृत्तिकास्नान तुम्हीं कुठं केलं आहे ? श्रावणीच्या वेळीं तुम्हीच तें करायला सांगतां ! पण वर्षांतनं एकदांच तें नाटक केल्यानं काय श्रेय लाभणार ? त्यापेक्षां मी हें कसं घळघळीत करतोंय ! हें खोरं म्हणजे माझी पळी, हें घमेलं म्हणजे पंचपात्र, हें विटाळं म्हणजे ताम्हन, आणि हे आख्खं अंगण म्हणजे तुळशी-वृंदावन ! वाटलं तर ही घागर हेंच पंचपात्रं, ही गार म्हणजे ताम्हन, असं म्हणा हवं तर ! बघा कशा विटा भराभर घालतों त्या. श्रेय हातीं यायला पुढल्या जन्माची वाट पाहायला नको. ह्या एकेका खणांत ह्याच श्रेयानं पडद्या उभारल्या गेलेल्या दिसतील. होय कीं नाहीं गणूदादा ?"

"असलीं उडवाउडवींचीं उत्तरं देऊन आम्हांला गप्प कराल." भिकंभट भिवया व कपाळ चढवून, मान हालवीत म्हणाले. "मास्तरकीला तें जमणारं आहे. पण देवाच्या दारीं असली चलाखी नाहीं चालणार ! काय रे गणूदादा, तूं कां बोलत नाहींस ?"

"चालूं द्या, चालूं द्या; बरं चाललंय तुमचं." गणूदादा.

"गणूदादा काय बोलणार ?" हापिसरांनीं मारा पुढें चालवला. "पळी-पंचपात्रीनं सांडलेल्या पाण्यानं संतुष्ट होऊन, भवसागर तरून जायला मानवाला मदत करायला, देव म्हणजे गुरुवारच्या बाजारांतला कुणी तहानेलेला हमाल का आहे ? स्नानसंध्या करून, उगवत्या मावळत्या सूर्याला वक्तशीर अर्घ्यें दिलीं म्हणजे परलोकची का तरतूद होते ? परलोक म्हणजे एखादी विमा कंपनी आहे, का पोस्टांतला सेव्हिंग बँक अकाउंट आहे ?— हप्ते भरले कीं चालली सांठत माया, नाहीं ?"

गणूदादाः—अहो शास्त्रीबोवा, हापिसर कांहीं हटायचे नाहींत वाद-

वित्रादाला! तुम्ही आपले जा कसे!—एखादं यजमानकृत्य असलं तर तिकडे खोळंबा मात्र व्हायचा!

हापिसर:—आज बाजारचा दिवस आहे, गणूदादा.

गणूदादा:—मग तर काय? सगळ्यांच्या आधीं जाऊन पेठेच्या तोंडालाच मोडखुर्दा मांडून बसायला पाहिजे! बाकी, गुरुजी, भोजनदक्षिणेच्या जमणाऱ्या खुर्द्यावर चांगला धंदा काढला आहे!

हापिसर:—तसं नव्हे गणूदादा, भोजनदक्षिणेचा धंद्याइतका खुर्दा जमायला फार काळ तिष्ठावं लागेल. अरे, हा खुर्दा सत्यनारायणाच्या पोथीपुढला आणि देवळांतल्या देवापुढला. रुपयाला ६५ पैसे ह्या दरानं देवळाच्या मुख्त्याराकडून गल्ला आणायचा आणि बाजारांत रुपयाला ६३ पैसे – वेळप्रसंगीं ६२ देखील – ह्या दरानें देऊन टाकायचा.

भिकंभट:—दसऱ्या-पाडव्याला पाटीपूजनाचे पैसे पोरांकडून फुकट-फाकटी लाटण्यापेक्षां ही कष्टाची कमाई आहे, म्हटलं!

गणूदादा:—ए, एकमेकांचीं उणीं-दुणीं काढून असं भांडणं! – तुमच्या पोरीबाळी हसताहेत लेको! पांढऱ्या केसांची तरी चाड ठेवा!

हापिसर:—गणूदादा, तुम्ही विषय काढला, मी उगीच विनोद केला. बाकी, कुणाच्याहि वृत्तीबद्दल चकारशब्द काढलेला मला आवडत नाहीं. मी आपण होऊन तो काढीत नाहीं पण मास्तरकीचा उद्धार करण्याची पुष्कळांना संवयच असते. 'मास्तरकी' काढली कीं मी नाहीं गय करणार! एऱ्हीं, बाजारांत खुर्दा मांडून दलाली कमावण्यांत मला तर कांहींहि गौण वाटत नाहीं. त्या दलालीसाठीं ठाण मांडून बसण्याची चिकाटी म्हणजे साधीसुधी गोष्ट नव्हे, हें मीच कबूल करतों. आणि ज्याला जें जमेल तें त्यानं करावं! त्यांत कसली आली आहे शरम? साखरेच्या गोण्या वाहणाऱ्या बैलांपुढें कडबाच टाकतात आणि खतांच्या गाड्या ओढणाऱ्या बैलांपुढंहि कडबाच टाकतात. भाकरीसाठीं सुताराघरीं लाकडी भुस्सा नाहीं मळत आणि कुंभाराघरीं मातीच्या उंडी नाहीं थापत! फुलमाळीण काय, आणि शेणी विकणारीण काय, त्यांच्यांत मी नाहीं भेद करीत. ज्याला जें जमतें तें तो

करीत राहतो. पण एक बरीक सांगून टाकतों, विषय निघालाय म्हणून. पाटीपूजनाचा एक छदामहि ह्या खिशांत पडला नाहीं बरं का ! जिथं जिथं मी बदलून गेलों तिथं तिथं पायंडा पाडला कीं तसा जमा होणारा पैसा गरीब विद्यार्थ्यांच्या कारणीं लावायचा. गोळा होणारी चिल्लर सर्व शिक्षक-मंडळींत वांटून घेण्यानं अशी काय बरकत व्हायची होती ? पण अशा निमित्ता-निमित्तांनीं जमणारे पैसे बाजूला ठेवून गरजू विद्यार्थ्यांच्या नडी भागवायच्या, हें किती उपकारक ठरलं ! बोलणं निघालंच आहे, गणूदादा; चौकशी करा तुम्ही वाटल्यास त्या त्या गांवीं ! गंमत अशी कीं तो निधि वाढत राहावा अशी मुलांच्यांत सुद्धां ईर्षा उत्पन्न होऊं लागली. माझा अनुभव सांगतों. मुलांना वाटेंत कधीं आणा, चवली असे कांहीं पैसे सांपडले कीं ते ह्या निधीसाठीं आपण होऊन आणून देऊं लागले.

पार्टी ज्याप्रमाणें पडद्यांत जातो त्याप्रमाणें भिकंभट पडदीमागें परतले.

ताई माजघरांतून डोकावून हापिसराकडे बघत म्हणाल्या, ‘गणूदादा, चहा घेणार का ?’

“वा, आणा कीं” अशा शब्दांत हापिसरांनींच पसंती दाखवली. “आमचीहि जरा सुट्टीची वेळ झालीच आहे.” असें म्हणून, हातपाय धुऊन तेहि ओसरीवर दाखल झाले.

“ह्या भिकंभटाचा नक्षा उतरवायचा असा तूं अगदीं चंग बांधलाहेस जणूं ?” गणूदादा हलक्या आवाजांत उद्गारले.

“खरं सांगूं, मला मुळींसुद्धां त्यांच्याशीं बोलायची इच्छा नसते. कडक शब्द तोंडून जायचा ह्या भीतीनंहि मी बोलायचं टाळतों ! पण शिष्टपणानं मधेंमधें तोंड घालायची त्यांना खोडच ! ‘शास्त्रीबोवा,–शास्त्रीबोवा’ ‘गुरुजी – गुरुजी’ अशा नांवांनीं गांवांत ज्यानं त्यानं गौरवावं! –ठीक आहे तें ! –पण त्यांना त्यामुळं ‘खरंच आपण विद्यावाचस्पति नि महामहोपाध्याय आहोंत’ असं वाटूं लागलंय ! ‘रामशास्त्र्यांचे बापजादेच जणूं कांहीं लागून राहिलों आहोंत आपण, असा हा त्यांचा एकंदर आविर्भाव ! तुम्हीच सांगा, हे स्नानसंध्या करतात. -करावी त्यांनीं ! त्यांच्या वृत्तीला तें साजेसंच आहे!

आणि कुणाचं काय जातंय त्यांत ? हा श्रद्धेचा प्रश्न आहे ! – पण जेव्हां मला पापपुण्याच्या गोष्टी शिकवूं लागतात तेव्हां मग बोलायची पाळी येते. सूर्याला अर्घ्य देण्यापेक्षां आल्या-गेल्या तान्हेलेल्याला पाणी देणं मी पसंत करीन मीं पाहून ठेवलंय. हे दारावर आलेल्या मोळ्या घेतात. सड्यावरून बाया-बापड्या मोळ्या आणतात. पण सौदा झाल्यावर त्या बायानीं-पोरींनीं पाणी प्यायला मागितलं तर " जा कीं नदीवर! चांगली नदी वाहतीय ! " अशीं त्यांना उत्तरं मिळालेलीं मीं ऐकलीं आहेत ! ही दानत ! काय करायचंय तें तुमचं संध्यास्नान ! ! सूर्य प्रसन्न व्हायच्याऐवजीं संतप्त होईल उलट! सूर्याला अर्घ्यं द्यायचीं म्हणजे उन्हातान्हांतून दारीं आलेल्या तृषाक्रान्ताला पाणी द्यायचं, हा माझा अर्थ आहे."

इतक्यांत हापिसरांना आठवण झाली. माजघराकडे तोंड करून ते जरा मोठ्यानें म्हणाले, " अरे अप्पा, रस्त्याकडची दिंडी उघडली का ? "

" हो, केव्हांच ! " आंतून उत्तर आलें. विहिरीवर येणारांना वाट मोकळी करायला हवी, हाच हापिसरांच्या चौकशींतला आशय. हापिसरांना बोलल्याशिवाय राहवेना.

" गणूदादा, ह्या विहिरीचा मला फार फार अभिमान वाटतो. तुम्ही म्हणाल, ' त्यांत काय मोठंसं ? ' अन् बरोबरहि आहे तुमचं हें म्हणणं ! माझ्याच परसांत काय ती विहीर आहे असं नव्हे. आपल्या गांवांत घरोघर विहिरी आहेत, असं म्हटलं तरी चालेल. पण वाटेच्या वाटसरालाहि जिच्या-वर सरळ येतां येईल अशी विहीर कुणाच्या घरीं आहे का ? तुम्हीच सांगा. बाजारच्या दिवशीं तर दिवेलागणीपर्यंत ह्या रहाटाला विसावा नसतो. सगळ्यांना दार उघडं ! तुम्ही पाहतांच ! कुणींहि यावं अन् पाणी काढून पिऊन जावं ! वाडवडिलांनीं करून ठेवलेली ही पुण्याई ! माझं काय आहे ? पण नाहीं; वर्दळीच्या त्रासानं दिंडी बंद करून ठेवायचा नतद्रष्टपणा मला सुचत नाहीं, हें माझं केव्हढं भाग्य ! पूर्वी दोर ज्याचा त्यानं घेऊन यावं, अशी वहिवाट असे. पण मीं म्हटलं, तेव्हढी तरी कशाला काटकसर ? दोरा-पायीं झीज सोसून पदरमोड करायला लागली तर लागली ! असा विचार

करून दोर काढून ठेवायचा नाहीं, असं मीं ठरवून टाकलं. बाजाराला आलेलीं वाड्या-खेड्यांतलीं शेकडों माणसं – तीं कां दोर घेऊन येणार ? त्यांनीं तो घरांतच मागायचा अन् तो देतांना आम्हीं धुसफुसायचं किंवा ' मोठा उपकार करतोय ' असा आव आणायचा ! –छे, हा नाहीं आपल्याला क्षुद्रपणा पसंत ! मीं मनाशीं म्हटलं, ' अरे लेका, बापजाद्यांची पुण्याई तुडुंब भरलेली आहे; अन् तुझ्याच्यानं दोरखंड देखील देववत नाहीं ? ' गणूदादा साळी, माळी, तांबोळी, लंगोटीवाले धनगर, कातकरी – सारखी बारी लागलेली असते. पाणी पिऊन ताजेतवाने झालेले एकेकांचे चेहरे मी इथं माजघरांत निवांत पडल्या–पडल्या जेव्हां पाहतों तेव्हां माझा ऊर भरून येतो, गळा दाटून येतो, डोळ्यांतून टिपंहि कितीकदां गळतात. गणूदादा, भिकंभटाच्या हिशेबीं नसलेलं पण मला घडणारं, खरंखुरं, हेंचि माझें संध्यास्नान. "

बोलतां बोलतां आतांहि हापिसरांचा गळा दाटून आला आणि डोळे पाणावले. नेसत्या उपरण्याच्या टोकानं त्यांनीं डोळे टिपले. चहा पिऊन झालाच होता. कोपऱ्यांतली चिलीम त्यांनीं पुढं ओढली. एक झुरका ओढून गणूदादा ( जायच्या इराद्यानें ) उठले.

" बसा कीं ! काय घाई आहे ? " हापिसर.

" विटा घालायच्या आहेत ना तुम्हांला ? ऊन व्हायला लागलं ! " ह्या जाणीवेच्या पोटीं गणूदादांनीं उठायचा बेत केला होता.

" आतां उद्यांच घालतील. इथं काय, मक्ता पुरा करायचा आहे थोडाच ? " कप-बशा उचलायला आलेल्या ताईंनीं आपला मानस बोलून दाखविला. " अप्पा कांहीं आज आंघोळ करणार नाहीं. तेव्हां देवपूजा आपल्यालाच करायची आहे. पाणीहि तापून राहिलं आहे. "

' अप्पाला बरं नाहीं वाटतं ? " गणूदादांनीं चौकशी केली.

" विशेष कांहीं नाहीं. आहे साधंच थंडी-पडसें ! " ताई म्हणाल्या.

" ठीक आहे. काढा पाणी " हापिसरांनीं तयारी दाखविली. " आज आपणच होऊं पुजारी ! "

## : : ८

हापिसर देवभोळे नव्हते कीं कर्मठ नव्हते. तसे ते नास्तिक होते अशांतलाहि भाग नाहीं. देवा-धर्मावर त्यांची श्रद्धा होती. पण स्नान-संध्या, पूजा-अर्चा, वैश्वदेव वगैरे नित्य कर्में उरकल्याशिवाय तोंडांत पाणी घ्यायचं नाहीं, असला कडकडीत आचारधर्म पाळणाऱ्या त्या पिढींतल्या पांढरपेशांच्या पंगतींतले ते नव्हते, एव्हढं बरीक खरं. लहर लागेल तर – म्हणजे फुरसत असेल तर, हेंहि यथासांग करण्याची त्यांची तयारी असे. मग –

मातः शैलसुता सपत्नि–वसुधा शृंगार–हारावली

असें गंगाष्टक म्हणत म्हणतच ते स्नानाला सुरुवात करीत, संध्या उरकत आणि 'पुरुषसूक्तेन श्रीसूक्तेन पुराणोक्त मंत्रेण ध्यानावाहनादि षोडषोपचारैः पूजनमहंकरिष्ये' असें उदक सोडून त्यांची पूजा-अर्चा होत असे. हें सारं त्यांना तोंडपाठ येत होतं. त्यांनीं आपल्या मुलांच्या मुंजी केल्या होत्या. उपनयन विधींत बटूचा पिताच गुरुपदेश देतो. हापिसर त्या दृष्टीनें सार्थ गुरु होते. मुंजी झाल्यावर त्यांनीं दररोज निजायला जाण्यापूर्वीं मुलांना संध्या, पुरुषसूक्त, वैश्वदेव, रुद्र, वगैरेची संथा देऊन त्यांच्याकडून हीं सारीं आरोहावरोहासह मुखोद्गत करून घेतलीं होतीं. संस्कार व्हावेत यावर त्यांचा कटाक्ष होता. पण, ह्या साऱ्याच्या बुडांत कर्मठपणाचा कडकपणा मात्र नव्हता.

ते नोकरींत होते तोंपर्यंत हें सारं ब्रह्मकर्म त्यांच्याकडून रोज घडलं नाहीं. 'करूं पेन्शन घेतल्यावर' असें ते म्हणत. पेन्शनींत निघाल्यावरहि तें करायचा आग्रह त्यांनीं धरला नाहीं. असल्या आचारापेक्षां शुद्धाचरणावर त्यांचा खरा भर असे. अर्थातच सोवळ्या-ओवळ्याचं स्तोम ते माजवीत नसत. विहिरीवरच्या वर्दळीचेंच पाहा ना. साळी, माळी, कुणबी असे लोक विहिरीवरून पाणी नेत. त्यांच्यामागून पाण्याला येणाऱ्या ब्राह्मण महिला रहाटाचा दोर हातीं घेण्यापूर्वी त्याच्यावर पाणी शिंपडीत. हापिसरांना हा सोवळ्याचा प्रकार पोकळ वाटे. "ऐचें कैचें रे सोवळें। शिवतां होतसें ओवळें" ह्या संतवाणीचा अर्थ ते जाणत होते. सध्यां, बेछूट वागण्याचा परवाना म्हणून मतलबीपणानें ह्या संतवचनाची कांस धरली जाते. पण हापिसर तसे मतलबी नव्हते. कारण त्यांच्या एकंदर आचरणांत इतका मनःपूत शुचिर्भूतपणा होता कीं, वरकरणीं सोंवळें नेसण्याची त्यांना गरज वाटत नसे. महिना-नु-महिने न धुतलेल्या धुरकट मुकट्यापेक्षां माझं हें दांडीवरचं धुवट धोतर अनेक पटींनीं सोवळं आहे, असा त्यांचा दावा असे.

सण-वार, कुळाचार, ज्या दिवशींचा त्या दिवशींच झाला पाहिजे अशी त्यांची आग्रही विचारसरणी नव्हती. त्यांत ते भटजींची सोय आधीं पाहत. आपल्या उपाध्यायाला दुसरीकडे जर आपल्यापेक्षां अधिक प्राप्ति होत असेल तर ती त्यानें खुशाल साधावी, आपण त्यांच्या सोयीसवडीनें चालढकल करूं, अशी त्यांची उदार दृष्टि असे. उपाध्येबोवांना संकोच वाटायला नको म्हणून तेच आधीं आपल्याकडून म्हणत असत मुळीं –"हें पाहा गुरुजी, उद्यां आहे आमच्याकडचा महालय. पण तुम्हांला जर दुसरीकडचं बोलावणं असेल तर आपण तुमच्या सवडीनें करू. माझ्याकडील कामगिरीसाठीं तुमची ती प्राप्ति बुडावी अशी माझी इच्छा नाहीं. अहो, ज्या तिथीचं त्याच तिथीला केलेलं श्राद्धकर्म पितरांना पोंहोचतं आणि नंतरचं पोहोंचत नाहीं, असं थोडंच आहे? सोयर-सुतकासारख्या नडी-अडचणीच्या वेळीं आपण आपद्धर्म म्हणून चालढकल करतोंच कीं नाहीं? मग, ज्यांत तुम्हाला चवली-पावली जादा मिळण्याची शक्यता आहे, त्याच्या आड यजमानानं येणं बरं नव्हे. अशामुळें

उद्भवलेला आपद्धर्मच मला अधिक पुण्यकारक नाहीं का होणार ? ''

हापिसरांचा असा विवेकी आचारधर्म असे. स्वाभाविकच शेजारची, बरोबरीची, ग्रामस्थ मंडळी घरांतून येतां-जातां उगीचच त्यांना एखादे वेळीं डिवचत कीं, "हापिसर, आतां तरी दररोज नेमानं पूजा-अर्चा करीत जा कीं! तेव्हढच पुण्य लागेल म्हातारपणीं ! ''

पाप-पुण्याचा त्यांचा अर्थ ठाम ठरलेला होता. पुण्य हा शब्द कानीं पडतांच डोळ्यांवरचा चष्मा कपाळावर सरकवून, बोलणाराकडे जरा रोखून पाहत आणि करारी आवाजांत हापिसरांनीं खणखणीतपणें उत्तर दिलं होतं—"मेल्यावर स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणूनच पुण्य करायचं ना ? तर, तुम्हांला सांगून ठेवतों कीं स्वर्ग म्हणून जर कांहीं असेल तर देवाला माझी रवानगी स्वर्गांतच करावी लागेल. कुणाहि कर्मठाच्या आधीं माझा नंबर लागला पाहिजे. जन्मांत चोरी-चहाडी-शिंदळकी केलेली नाहीं. कुणाकडेहि वाकड्या नजरेनं पाहिलेलं नाही. कुणाचं वाईट चिंतिलं नाहीं. कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावरहि पाय दिला नाहीं कीं कुणाच्या तनसडीला शिवलों नाहीं. काय बिशाद आहे देवाची मला स्वर्गांत मज्जाव करण्याची !"

हापिसराच्या ह्या रोखठोक सवालानें चावटांचीं तोंडें बंद झालीं त्या दिवसापासून कारण, ते जे कोणी चेष्टेनें विचारणारे होते त्यांतील कुणाच्या ना कुणाच्या उपरण्याला ह्या नाहीं त्या प्रकारचें पाप थोडें फार चिकटलेलें होतें धोंडा उगारायचाच झाला तर निष्पाप असेल त्यानें तो उगारावा; कलंकितानी तो उगारायचा प्रयत्न केला तर त्यांचे हात असल्या सवालानें लुळेच पडायचे.

भाद्रपद चालू होता. तो लवकरच संपणार आणि आश्विन उजाडणार. आश्विनाचा वेध घरांत आधीपासूनच लागत असे. कारण, हापिसरांची कुलदेवता अंबाबाई अंबाबाईचें नवरात्र हा मोठ्यांतला मोठा कुळधर्म. देव-धर्मांच्या बाकीच्या गोष्टी वेळप्रसंगीं जशा पार पडतील तशा पडोत. पण

नवरात्राच्या बाबतींत मागें-पुढें कांहीं करतां येत नसे. तें यथासांग पार पडावें ह्याबद्दल वाडवडिलांपासून काळजी घेण्यांत आली होती. हापिसरांचे वडील गणेशपंत. देवभोळा माणूस. व्यवहारांतहि अगदीं साधेभोळेच. इतके कीं त्या भोळेपणामुळें ते वेळोवेळीं नागवले गेले होते. त्यामुळें हलाखीचे दिवस आले होते. कर्जाचा बोजा सालोसाल वाढत चालला होता. लौकिकांत उणें दिसूं नये म्हणून आणखीन कर्ज ! त्यांतहि, अंबाबाईचें नवरात्र यथासांग झालेंच पाहिजे, त्यांत यत्किंचित्‌हि हयगय होतां कामा नये, असा त्याचा प्रकृतिधर्म होता. त्याकरितां उधारी-पाधारी करावी लागली, चार पैसे आणखी देणं झालं तरीहि ते माघार घेत नसत; माघार घ्यायची कल्पनाहि शिवत नसे. गणेशपंतांची बायको – म्हणजे हापिसरांची आई – ऐन नवरात्रांत दिवंगत झाली होती. मोठा धसका बसला होता. पण तेव्हढयानं गणेश पंतांनीं नवरात्रांत कधीं कुचराई केली नाहीं. घरांत बाईमाणूस नाहींसं झालं. तरीपण, नवरात्र जवळ आलं कीं नोकरीच्या गांवीं असणाऱ्या हापिसरांनीं आपल्या बायकोची घरीं रवानगी करायची, असा परिपाठ सुरू झाला. सूनबाई आल्या कीं गणेशपंत नवरात्राच्या तयारीला लागायचे. उपाध्येबोवा मोठे जाज्वल्य. जमदग्नीचा अवतार. नवरात्र झालेंच पाहिजे हा जसा यजमानाचा बाणा, तसाच, सोपस्कारांत रतिमात्र उणीव खपायची नाहीं, हा उपाध्येबोवांचा कडकपणा ! 'भागवून घ्यावं' हें त्यांना सहनच व्हायचं नाहीं दहा दिवसांत लागणाऱ्या सुपाऱ्या, बदाम, खारका, खोबऱ्याच्या वाट्या, अष्टगंध, जायपत्री, मांगलिक द्रव्यें, इत्यादींची संपूर्ण यादी ते गणेशपंतांपुढें करीत. नेहमींपेक्षां अधिक लागणारीं उपकरणीं, समया, नीरांजनें, तबकें, मेखा, कलश इत्यादि वस्तूंची जुळवाजुळव व्हायची. जुळवाजुळव करायची म्हणजे कोणाकडून आणायची अशांतला भाग नव्हे. सारी सामग्री घरांत असायची; पण ती आडबाजूला अडगळींत कोठींत असायची. ती बाहेर काढून झकपक करून एकत्र जुळवून ठेवायची. गणेशपंतांची नवरात्राबद्दलची निष्ठा सूनबाईच्याहि नसानसांत मुरन होती, मुरली होती. उपाध्येबोवांच्या तापटपणाला तर सर्वचजण घाबरत असत. ते

सकाळीं लवकरच यायचे. तर, थोरल्या दरवाजापासून देवघरांतल्या चौरंगा-पर्यंत त्यांच्या वाटेंत सूतसुद्धां दिसतां कामा नये, अशी लखलखीत झाडलोट करावी लागे. ते पूजेला बसले अन् 'तें हें कुठं दिसत नाहीं' अशी त्यांनीं तारस्वरांत गंभीर गर्जना केली कीं सूनबाई आणि गणेशपंत यांचा थरकांप होई. असं त्यांनीं विचारण्याची पाळीच येऊं नये यासाठीं कोण दक्षता—दररोज—उद्यांची आदल्या दिवसापासून !

नवरात्रांत दोन समया अहोरात्र तेवत असायच्या. नऊ दिवस. वाऱ्याच्या झुळुकेनेंहि त्या मालवतां कामा नयेत कीं तेल सरल्यामुळेंहि विझतां कामा नयेत. कारण, तें अशुभ ! केव्हढा धाक ! त्या धसक्यानेंच रात्रीं-अपरात्रीं कोणी ना कोणी जागा होई आणि तेलवात पाही. वारा लागू नये ह्यासाठीं भक्कम आडोशाची तरतूद तर केलेली असेच.

दररोज त्रिकाळ पूजा; सप्तशतीचा पाठ. ब्राह्मण, सवाष्ण, कुंवारीण जेवायला. शेवटच्या दिवशीं होमहवन. असा हा नऊ दिवसांचा सोहळा. अर्थात् आटापिटाहि. मोठा ताण पडायचा घरांतल्या मंडळींवर. नवरात्र एकदाचं निर्विघ्नपणें पार पडलं म्हणजे सुटकेचा निःश्वास. तोंवर जीव टांगल्यागत.

हापिसरांची आई नवरात्रांत दिवंगत झाली असल्यामुळें आश्विन जवळ आला कीं त्यांचें मन बेचैन होई. कसं काय एकदांचं नवरात्र पार पडतंय, हीच एक गुप्त काळजी त्यांना लागून राहत असे. पण 'कुलाचार करायचा तो करायलाच हवा. कशाहि परिस्थितींत तो साक्षेपानें आणि निकरानें पार पाडायलाच हवा. भाऊ (गणेशपंत) कधीं ढळले होते का ? मग त्यांच्या पुण्याईनें आपले दिवस तर किती तरी चांगले आहेत.' हे विचार मनांत आले तरी मनाच्या कप्प्यांत धसका लपून बसलेलाच असे. त्याला पार हुसकावून लावतां आलं नव्हतं—लावतां येत नव्हतं.

१९१८ सालची गोष्ट. भाद्रपद चालू होता. आतां आश्विन उजाडला कीं देव बसायचे. नवरात्र म्हटलं कीं हापिसरांच्या काळजांत सालोसाल

घस्स व्हायचं. आणि यंदा तर सगळीकडचे लोक आधींपासून हवालदिल झाले होते. इन्फ्लुएंझाच्या साथीनें सर्व हिंदुस्थानभर हाहाकार मांडला होता. अंथरूण घातलेलं नाहीं असं घर नव्हतं. वादळानं ज्याप्रमाणें झाडं उमळून पडतात त्याप्रमाणें काल हिंडतींफिरतीं असलेलीं माणसं आज अंथरुणावर आडवीं झालेलीं असत. त्या साथीला एखादं तरी माणूस दगावलं नाहीं असं कुटुंब नव्हतं.

हापिसरांच्या घरांतहि त्या साथीनें तारांबळ उडवून दिली होती—भिववून सोडलें होतें. प्रथम त्यांच्या मुलांना तिनें तडाखा दिला. मुलांनीं एकामागोमाग एक अंथरूण धरलं होतं. पण पोरपणचं ताजं रक्त; इतकी हार खाणारं नव्हतं. मुलं टिकाव धरूं शकलीं आणि हळूहळू सांवरलींहि. आणि लवकरच पुन्हा हिंडूं-फिरूं लागलीं. हापिसरांचीहि पाळी झाली. चार दिवस आजारी होते. पण आजारपण थोडक्यांत आवरलें. आणि हळहळू नवरात्राच्या पूर्वतयारीचा ते विचार करूं लागले. तथापि मन निर्वेध नव्हतें. आणि एक दिवशीं अंबिकाबाईंना ताप भरला. ह्या तापाचा पहिला परिणाम होई तो कंबरेवर. कंबर भयंकर गळून जाई, शक्तिपात होई. बायका तर तात्काळ घायाळ होत. अंबिकाबाईनीं अंथरूण धरलं तशी त्यांची कंबर गळली आणि हापिसरांची कंबर खचली. ते मनांत भयंकर चरकले. काढे, मात्रा वगैरे उपचारांचा परिणाम दिसेना; ताप हटेना. अंबिकाबाईंना उठून बसण्याचीहि ताकद उरली नाहीं. इतकेंच नव्हे तर 'हवं-नको' म्हणण्याइतकंहि बोलवेना! हापिसरांच्या काळजानं ठाव सोडला.

उपाध्येबोवा आले होते, ओसरीवर, नवरात्राच्या तयारीबद्दल बोलायला. गणेशपंतांच्या वेळचे उपाध्येबोवा यथाकाल देवाघरीं गेले होते. त्यांनीं आपल्या शिष्याला हापिसरांच्या यजमानकृत्याची सुपारी दिली होती. ते हे उपाध्येबोवा. तेहि जाज्वल्य गुरुजींच्या तालमींत तयार झालेले. त्यामुळें आस्थेवाईकपणा त्यांच्यांतहि कमी नव्हता. पण यंदा सर्वांवरच प्रसंग बांका गुदरलेला. तेहि सचिंतच होते. त्यांच्याहि सहचारिणीनें अंथरुण धरलें होतें. पण यजमानकृत्य टाळायचं थोडंच ? तें पार पाडायला हवं, अशी उपाध्ये-

बोवांची कर्तव्यतत्परतेची भावना. म्हणून ते आले होते. पण यजमान नि उपाध्ये, दोघेहि एकाच फिकिरींत. धीरानें बोलायला कुणाचं मन ठिकाणावर होतं ? त्रस्तचित्त हापिसर एकदम बोलले, "गुरुजी, हल्या घेती तें नवरात्र ! जीव ठिकाणावर असला तर सारं कांहीं ! प्रळय मांडलाय साथीनं ! अंबा-बाईला दिसत का नाहीं ? कसलं करतांय नवरात्र ! "

ओसरीलगत माजघरांतच अंथरुण होतं अंबिकाबाईचं. त्यांच्या कानांवर हे शब्द पडले. ग्लानींत होत्या त्या. पण ह्या शब्दांसरशीं सावध झाल्या आणि म्हणाल्या, "गुरुजी, कुलाचार आहे हा; त्यांत अंतर पडूं देऊं नका." बोलायचं त्राण नव्हतं तरीहि त्या निक्षून बोलल्या. सगळ्यांचेंच बोलणें खुंटलें !

आश्विन उजाडला. भटजी आले. पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध, मातृकापूजन, देवक–प्रतिष्ठापना वगैरे सारे पहिल्या दिवशींचे विशेष विधी झाल्यावर घटस्थापना झाली. मग पूजा, सप्तशतीचा पाठ, पुन्हा माध्यान्ह पूजा. हें सारें होईपर्यंत दुपारचे दोन वाजले. मग भोजन. घरधनीण अंथरुणावर पडलेली. स्वयंपाकाचा साक्षेप अर्थातच नव्हता. कसा तरी पुरणावरणाचा नैवेद्य झाला. करायचा म्हणून झाला, कुणीं तरी येऊन हातभार लावल्या-मुळें. बाकी, हापिसर चुलीपुढें बसून वेळ निभावून नेण्यास हटणारे नव्हते. रात्रीचीहि पंचामृतासह महापूजा, पंचारती, वगैरे झालें. पहिला दिवस पार पडला.

दुसरा दिवस उगवला. उगवणारा दिवस काय घेऊन येतो ह्याची सगळ्यांनाच धास्ती. गांवांत सारं वातावरण निरुत्साहाचं, औदासीन्याचं. सकाळचं चहापाणी झालं, तोंच बाहेर ओसरीवर कुजबूज झाली. कान टवकारले गेले. त्या कुजबुजीतून अशुभाचा वास आला. भटजींची बायको दगावली !

ही कुजबूज कळण्याइतकी अंबिकाबाईना शुद्ध नव्हती.

हापिसरांचा धीर ह्या बातमीनं आणखीनच खचला. उपाध्येबोवा बदली तरी कुणाला देणार ? हापिसराकडील नवरात्र म्हणजे किरकोळ का बाब आहे ? गांवांत तितका पट्टीचा दुसरा भिक्षुक कोण मिळणार ? आणि ज्याला त्याला आपापलं यजमानकृत्य आहेच कीं ! मोठाच प्रसंग गुदरला. हापिसरांनीं स्वत:च 'पाठ' वाचायची उभारी धरण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. आजाऱ्याची शुश्रुषा मुलें करीत होतींच. तेव्हां, तेच यजमान आणि तेच उपाध्ये झाले !

घरांतील एकूण परिस्थितीच जिकिरीची होती. गांवांत घरागणिक अंथरुणं पडलीं असल्यामुळें कोणीं कुणाला मदतीला बोलावण्याची सोयच नव्हती नाहीं तर, आडल्यापडल्याला एकीनें दुसरीला मदत करायची अशी खेडेगांवांतली रीतच असे. नवरात्रांत दहा दिवस 'सवाष्ण' म्हणून जिला जेवायचें आमंत्रण दिलेलें असे तीहि सहजींच जरा आधींच येऊन वरकड कराय-सवरायला लागायची. पण यंदाच्या प्रळयंकर इन्फ्लुएंझानें सोयच ठेवली नव्हती. अंबिकाबाईनीं सुनेच्या नात्यानें गणेशपंतांना सर्वतोपरीं सालोसाल साथ दिली होती. पण त्यांची सून मात्र ती कामगिरी अंगावर घेऊन पार पाडायला सर्वस्वीं अपात्र होती. अंबिकाबाईंची देवाधर्माबाबतची पराकाष्ठेची तळमळ आणि सारा संसारच हिरीरीनें नेटका करायची जिद्द आणि कर्तबगारी यांचा लवलेशहि नव्हता त्यांच्या सुनेच्या ठिकाणीं. कुवतच नव्हती, मग आंच किंवा हिंमत यांची बात कशाला ?

अशा परिस्थितींत, दोहींकडून चिणल्या गेल्यासारखी हापिसरांची अवस्था झाली. तेच, एकीकडे पूजा करतां करतां, मधून मधून चुलीकडे पाहत. सवाष्णीनं त्यांतल्या त्यांत सवड काढून, धावत पळत येऊन चार पोळया लाटल्या तर नशीब, असें म्हणायची पाळी आली होती. अंबाबाई जणुं कसोटीच पाहायला बसली होती !

स्वयंपाकघराच्या एका खणांत देवघर असल्यामुळें हापिसरांना दुहेरी भूमिका निभावून नेतां येत होती. अंतरींचे कढ दाबून चुलीवरच्या कढाकडे पाहायचें. डोळयांत उभें राहणारें पाणी पुसून चुलीवर शिजणाऱ्या वरणांत

पाणी घालायचें. जीव करपून जातच होता, पण भात करपूं नये म्हणून चुलींतला जाळ बाहेर ओढायचा. आणि हें सारें अवधान ठेवतां ठेवतां यथासोपस्कार पूजा चालायची.

श्रीमहाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती – रवळनाथ – महाविष्णु
– प्रमुख पंचायतन – देवताभ्योनमः
धूपं समर्पयामि .....
दीपं समर्पयामि .....

तेव्हढ्यांत लक्ष जायचं नंदादीपातल्या मंदावत चाललेल्या ज्योतीकडे. तेल घालून वात सारायची; आणि नजर जायची माजघरांत निपचित निजलेल्या अंबिकाबाईंच्या क्षीण जीवज्योतीकडे.

आणखी दोन-तीन दिवस उलटले. अंबिकाबाई कांहींच बोलत नव्हत्या. त्यांना उठून बसण्याचीहि शक्ति नव्हती. कोणीं तरी त्यांना वळेंच उठवून बसवावं आणि औषध, दूध, कांजी, पाणी, असं कांहीं चमचा चमचा जाईल तेव्हढं आळंबळं त्यांच्या तोंडांत घालावं. बाकी सारं शांत, थंड. एकदां असंच त्यांना हलकेंच उठवून बसवलं. तर, जड डोळे अर्धवट उघडीत त्या म्हणाल्या 'अरे, मला इकडं कुठं आणलंत – नदीवर – दगडागोट्यांत कां निजवलंत ?" हे तुटक चार शब्द कानांवर पडतांच साऱ्यांचीं अंतःकरणं चर्रर झालीं. "आई, आई" अशा घाबऱ्या-घाबऱ्या हाका मारून नानूनें तिला सावध करण्याचा प्रयत्न केला. सावध झाल्यासारखे तिनें डोळे उघडले. मुलांच्या उरांतली धडधड थोडी शांत झाली. अंथरूण नीटनेटकें करून तिला हलकेंच निजविली.

ते चार तुटक शब्द. इहलोकची यात्रा संपून जे कोणी पुढच्या वाटेला लागत त्यांची ती वाट, तिथल्या गांवकऱ्यांच्यासाठीं, नदींतून – नदीकांठच्या दगडागोट्यांतून जाते. त्या पुढच्या वाटेचं तिला स्वप्न पडलं असावं ! तें ती भ्रमांत बोलून गेली. पण तेव्हांपासून सगळ्यांच्या पोटांत सारखी कालवाकालव माजून राहिली.

दुर्गाष्टमीचा दिवस उजाडला. नवरात्रांतला विशेष महत्त्वाचा दिवस. आज

रात्रीं महालक्ष्मीची महापूजा असते हापिसरांच्याकडे. नवीन घडी मोडून अंबाबाईला लुगडें नेसवायचें; करंज्या, लाडू, अशा प्रकारच्या अष्ट पक्वान्नांचा महानैवेद्य करायचा, असा पूर्वापार कुळाचार. पण अजून दुपारची पूजाहि उरकली नव्हती, मग जेवणं कुठलीं! दुपार तर टळून गेली होती. पण हापिसरांचा 'पाठ' च संपायचा होता. बसल्या जागेवरून त्यांना माजघर सगळं दिसत होतं. सगळं तें काय पाहायचं होतं? अंबिकाबाई काय म्हणतात तेव्हढेंच! थोरला मुलगा आईच्या उशाशीं बसून होता. तिकडे त्यांचें लक्ष होतें. एखादा चरण म्हणायचा कीं लगेच माजघराकडे नजर टाकायची. पुन्हा दुसरा चरण कीं फिरून माजघराचा कानोसा. असं चाललं होतें. पोथीवरच एकसारखी नजर लागणं शक्यच नव्हतें.

**दुर्गे स्मृता हरसि भीतिमशेषजंतोः**
**स्वस्थैः स्मृता मतिमतीव शुभां ददासि**
**दारिद्र्यदुःखभयहारिणि का त्वदन्या**
**सर्वोपकारकरणाय सदाऽऽर्द्र चित्ता**

श्लोक सरला न सरला तोंच –

अंबिकाबाईना उठवून बसवून थोरला मुलगा त्यांना कांजी पाजण्याच्या बेतांत होता. पण अंबिकाबाईनीं ओंठ उघडतां-उघडतांच मुलाच्या खांद्यावर उताणी मान टाकली अन् डोळे गरगर फिरवले. मुलानें हांक मारली, "दादा, आई बघा कसं करतीय." त्यासरशीं हापिसरांच्या हातून सप्तशतीचें पान गळून पडलें. अंबिकाबाईनीं पुरतीच मान टाकली न् डोळे मिटले.

"कसला पाठ न् कसल नवरात्र! देतों अंबाबाई विहिरींत फेंकून." हापिसर शोकावेगानें दाटल्या गळ्यानें भडभडून बोलून गेले.

अंबिकाबाई निघून गेल्या. हापिसरांच्या संसाराचा पाठ पुरा झाला नाहीं.

अध्यांतूनच त्या उठून गेल्या. जणुं कांहीं आपली कामगिरी संपली, आतां राहा कशाला, असा त्यांच्या ह्या निर्वाणाचा आशय होता. अंगावर जबाबदारी पडल्यापासून कर्जात रुतून पडलेले हापिसर ऋणमुक्त होईपर्यंत रक्ताचं पाणी करून कष्ट उपसणारी त्यांची सहचारिणी, ते ऋणमुक्त झालेले पाहिल्यावर चालती झाली. वेळप्रसंगीं शिळंपाकं, सुकं-कोरडं, ह्यावरच न कुरकुरतां भागविणारी, पण काडीचंहि उसनं न मागणारी, एकच-एका जुनेऱ्यावर गुजराण करणारी पण अब्रूनं दिवस काढणारी, जिद्दीनं संसार करणारी, स्वाभिमानी, करारी, अशी सहचारिणी त्यांना सोडून चालती झाली. खरोखरीच, दैत्यसंहारार्थ अवतार घेणारी अंबाबाईच, अवतारकार्य संपलं असं पाहून अंतर्धान पावली.

शेजारपाजारचीं पोक्त बाईमाणसं समाचाराला येत. 'मोठी भाग्याची हो अंबिका. साजऱ्या हातानं सौभाग्य लुटीत गेली. ह्याला नशीब लागतं!' —असें म्हणत. एका माहीतगार आजीबाईनं तर असं सांगितलं कीं "अग, त्यांच्या घराण्यांतच तसं भाग्य आहे बरं का! मला तीन पिढ्यांची तरी माहिती आहे. साऱ्या जणी अहेवपणीं गेल्या आहेत. लक्ष्मी, भवानी, जानकी. लक्ष्मी तर नवरात्रांतच गेली. सासूच्याच चालीनं आज अंबिकाहि नवरात्रांत गेली. सोनं झालं बाईच्या जिवाचं." आल्या-गेल्या बायांचं हें बोलणं—हें दुःखांतलं समाधान. पण हें तिऱ्हाइतांच्या दृष्टीनं झालं. ज्यांची प्रत्यक्ष हानि झाली त्यांना ह्या कौतुकाच्या बोलानं बळ का येणार आहे? हापिसरांच्या पाठीचा कणाच मोडला. आनंद संपला, उत्साह आटोपला. आतां?

तिसरा दिवस उगवला. तिसऱ्या दिवशीं राख सावडायला जायचं असतं. दुःख गिळून हें करणं क्रमप्राप्त असतं. ह्याच हेतूनें शेजारचे गणूदादा हापिसरांबरोबर नदीवर जाण्यासाठी आले. प्रत्यक्ष बोलून आठवण देण्याची गरज नव्हती. गणूदादा आलेले पाहतांच हापिसरांच्या तें ध्यानीं आलें. ते उठले.

तो दिवस होता दसऱ्याचा. हापिसर म्हणाले, "आमच्या पंचांगांत दसरा नाहीं." हापिसरांचा कंठ एकदम दाटून आला. शब्द उमटेना म्हणून किंचित स्तब्ध राहिले. आलेला उमाळा पोटांत दडपून, दाटलेल्या आवाजाने ते पुढें

बोलूं लागले, "गणूदादा, माझी आई नवरात्रांत गेली. पण श्राद्धकर्म नवरात्रांत करायचं नसतं. कारण, तुम्हांला ठाऊक आहेच, आमच्याकडील नवरात्राची सुरुवात देवक बसण्यानं होते. देवक–उत्थापन व्हायचं तें नवरात्र संपल्यावर. देवक बसलेलं असतं त्या काळांत श्राद्धतिथि आली तरी श्राद्धकर्म तहकूब. अर्थातच, देवक–उत्थापन झालं कीं लगेच दसऱ्याच्या दिवशीं तें थोपवलेलं श्राद्ध करीत आलों. म्हणून आमच्या आयुष्यांत दसरा, हा 'दसरा' नसून, आईच्या श्राद्धाचा दिवस ठरला. आतां मुलांच्या नशिबीं तेंच आलं. त्यांच्याहि आयुष्यांत आतां इथून पुढं दसरा हा श्राद्धदिवस म्हणूनच नोंदला गेला. . . . . . वारसा !

कांहीं वेळ कोणीच कांहीं बोललं नाहीं. आणि बोलायचं तरी काय ? आला दिवस भारावलेल्या मनानं, प्राप्त कर्तव्य मुकाटयानं करीत, ढकलायचा असतो.

अंबिकाबाईंची उत्तरक्रिया तिथें खेडेगांवींच उरकण्याचं ठरलं. मनुष्यहानि यथाकाल झाली तर और्ध्वदेहिक करतांना दुःखी-कष्टीपणांतहि एक प्रकारची गौरवाची व हुरूपाची भावना असते. पण मनुष्यहानि अकालीं होऊन जेव्हां कुटुंबाला असह्य तडाखा बसतो तेव्हां और्ध्वदेहिक म्हणजे सक्तीचें धर्माचरण होऊन राहतें. त्यांतून, साथीनें मांडलेल्या सार्वत्रिक कहरामुळें कुठें तीर्थक्षेत्रीं जाण्याची कल्पनाहि बरी वाटेना. गांवाबाहेरच्या महादेवाच्या देवळाच्या परिसरांत नदीकाठीं और्ध्वदेहिक करण्याची त्या गांवीं वहिवाट असे. त्याप्रमाणें क्रियाकर्म करण्यांत आलें. पिंडाला कावळा शिवणें हा एक महत्त्वाचा भाग असतो. पण कावळा शिवण्याचें लक्षण दिसेना. 'काव ! काव !' करून कावळयांना पाचारणहि केलें. अंवतीं-भंवतींच्या झाडांवर कावळे होतेहि. पण कोणी खालीं उतरेना. कावळयांना पिंड सहज दिसावा म्हणून तो इथून तिथें हालवण्यांतहि आला. आणि कावळा न बिचकतां खालीं उतरावा म्हणून सारी मंडळी दूर अंतरावर जाऊन, हालचाल न करतां, अगदीं निःशब्द स्थितींत ताटकळत बसलीं. तरीहि, नुसत्या माना वेळावत कावळे फांद्यांवरच बसून राहिले.

कल्पना अशी असते कीं, अर्ध्या संसारांतून उठून गेलेल्या व्यक्तीच्या कितीक वासना, आशा-आकांक्षा सफळ व्हायच्या राहून गेलेल्या असतात. त्यांत किंवा मायेच्या माणसांत दिवंगताचा जीव अडकून राहिलेला असतो. अंबिकाबाईंचा जीव अशा कितीक कारणांनीं मागें गुंतून राहिला असेल तर नवल काय ? वृद्धापकाळांत पतीची सेवाचाकरी घडावी, पण अकालीं निधनानें त्या सेवेंत अंतराय घडल्यामुळें पतिव्रतेचा जीव मागें घुटमळत राहणारच. पांच अपत्यांपैकीं तीन तर सर्वस्वींच अज्ञान, लहान. आईवांचून उघडीं पडलीं. कोण करणार त्यांचं आईच्या जिव्हाळ्यानं ? त्यांच्याकडेहि अंबिकाबाईंचं अंतःकरण ओढ घेत नसेल का ? मग पिंडाला कावळा कसा शिवणार ? जेणेंकरून आत्म्याला शांति मिळेल अशा अर्थाचे संकल्प सोडले, प्रतिज्ञा केल्या तर पिंडाला कावळा शिवणें शक्य आहे, अशी समजूत. हें ध्यानीं घेऊन मुलांनीं संकल्पांचा उच्चार करायला सुरुवात केली. गळा दाटून एक जण म्हणाला —

> " आई, तूं चिंता करूं नकोस. म्हातारपणांत दादांची सारी कांहीं काळजी घेऊं आम्ही. "

पण एव्हढ्यानें मृतात्म्याचें समाधान झालें नसावें. कारण, कावळा पिंडाकडे वळला नाहीं. आतां दुसरी कल्पना —

> " काशी — माई — भास्कर या धाकट्या भावंडांची आम्ही आबाळ मुळींच करणार नाहीं. आई, तुझा जीव घोटाळायला नको."

नाहीं, कावळा खालीं उतरला नाहीं ! काय, लहान मुलांसाठींहि तिचा जीव अडकलेला नाहीं ! मग, तिला काय हवं आहे आमच्याकडून वचन ? ह्या प्रश्नानें सारेच जण विकल झाले. हापिसर मूढ मनानें बाजूला अंतरावर बसून हें पाहत होते. आजारीपणांत ती असं कांहींहि बोलली नव्हती कीं ज्यावरून तिच्या आशा-वासनेंचा कयास करून तिच्या परिपूर्तीची प्रतिज्ञा करावी !

हां ! आठवलं ! आजारानं विकल झालेल्या अवस्थेंत बोलायची ताकद नसतांनाहि ती बोलून गेली होती तें वाक्य आठवलं ! आणि वाटलं कीं आईला निर्वाळा हवा असेल तो खास हाच !

" आई, कांहींहि झालं तरी आम्ही अंबाबाईचं नवरात्र पूर्वीप्रमाणेंच करीत राहूं. कुळाचारांत कांहीं अंतर पडूं देणार नाहीं."

प्रतिज्ञेचा उच्चार झाला. अधोमुख बसलेले हापिसर मान वर करून मुलाकडे पाहूं लागले. आणि काय चमत्कार ! फांदीवरल्या एका कावळ्यानें पिंडावर झडप घातली.

–हल्या घेती तें नवरात्र !

–फेंकून देतों अंबाबाई विहिरींत !

हे दुःखावेगाच्या तिरीमिरींतले हापिसरांचे उद्‌गार पार पार पुसून गेले. अंबाबाईच्या नवरात्रांत खंड पडणार नाहीं हें ऐकून अंबिकाबाईंच्या आत्म्याला शांति मिळाली !

हापिसरांच्याहि शोकविमूढ चित्ताला धर सांपडला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32702 वि: 41837
क्रमांक 2036 नों दि 77482

## : : ९

निवृत्तीनंतरचा काळ स्वास्थ्यांत जावा अशी मनुष्याची सर्वसाधारणपणें इच्छा असते. म्हातारपणांत शरीरबळ कमीकमी होऊं लागतें. नवे उद्योग करण्याचा हुरूप नसतो. इतकेंच नव्हे तर, नित्याचे उद्योग वा व्यवहार करायलाहि हवी असलेली शक्ति पुरी पडत नाहीं. उद्योगांत कमतरता येते. धकाधकीतून बाजूला व्हावेसें वाटूं लागतें. भरल्या नदींत उडी घेऊन पोहून जाण्याचा एक काळचा ऐस आतां न उरल्यामुळें कांठोशींच डुबुक-डुबुक करावें, ओझें वाहण्यांत भागीदार मिळावा, किंवा ओझेंच कमी व्हावें आणि आराम लाभावा, अशी आन्तर मनाची मूक मागणी सुरू होते. मागीलदारीं पाट-पाणी कुणीं तरी करावें आणि मग आपण तोंड धुवायला बसावें. निजायच्या वेळीं कोणीं तरी अंथरूण घालून द्यावें, मग आपण कलंडावें. बाहेर पडतांना जोडा–छत्री–काठी कोणीं तरी पुढें आणून ठेवावी. अशा प्रकारची सुप्त इच्छा ( मिजास म्हणून नव्हे, तर आपली चपळाई कमी झाली म्हणून ) मनांत उद्‌भवते.

हापिसर अशा रीतीनें निवृत्तींतले दिवस व्यतीत करूं इच्छीत होते. वडिलार्जित कर्ज त्यांनीं निकरानें निवारलें होतें. थोरला मुलगा इंग्रजी स्कूल फायनल झाला होता–त्याला एका सरकारी कचेरींत लावून दिला होता. शेतावर फेरफटका मारून यावें आणि ओसरीवर पेन्शनीच्या लोडाला टेकून

वर्तमानपत्रें वाचीत पडावें अशी दिनचर्या आंखण्याचे मनोरथ त्यांच्या मनांत चालूं लागले होते. पण ईश्वरी इच्छेचा मानवी इच्छेशीं मेळ बसतो असें नाहीं. दैवमन्यत्रचिंतयेत् ! अंबिकाबाईच एकाएकीं देवाघरीं निघून गेल्या. सहचारिणीची सोबत ज्या काळांत अत्यंत आवश्यक असते त्याच काळांत ती अकस्मात् अंतर्धान पावावी ह्यापरता दैवदुर्विलास तो काय ! म्हाताऱ्याच्या हातची काठी काळानें हिसकावून घेतली. काठी तशी कणखर होती. ती इतक्यांत मोडेल अशी कल्पना नव्हती, तशी ती ढिसूळ नव्हती. पण " आलें देवाजीच्या मना। तेथें कोणाचें चालेना."

अंबिकाबाईनीं हापिसरांना आजवर चांगली साथ दिली. कर्जाचे हप्ते सालोसाल भरणें हापिसरांना माफक प्राप्तींतहि शक्य झालें होतें तें अंबिकाबाईंच्या संसार करण्याच्या पद्धतीमुळें. उधळ-माधळ न होईल ह्याची दक्षता, उणें दिसणार नाहीं अशी शिताफी, आहे तेंच टापटिपीनें व टुकीनें मांडून शोभिवंत दिसावें अशी दृष्टि, कष्ट उपसण्याची उभारी, कोंड्याचा मांडा करण्याचा सुगरणपणा, असे त्यांचे गुण होते. काटकसरीनें संसार तर करायलाच हवा होता, पण तो तसा करावा लागतो ह्याची त्यांच्या मनाला कधींच खंत नसे. काटकसर ही सक्ती वाटत नव्हती त्यांना. ती करण्याची चतुराई हवी आणि ती आपणांत आहे, असा आत्मविश्वास होता त्यांच्यांत. काटकसर करतांना गृहिणीच्या कपाळाला आंठ्या पडल्या तर मग काटकसरींत गोडी ती कसली ?

सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोपायला जाईपर्यंतच्या दिनचर्येतली प्रत्येक घटका आणि घरांतली तसू न् तसू जागा अंबिकाबाईंच्या संसारकुशलतेची आठवण करून देत होती. कशावरूनहि बोलणें निघो, त्याचा ओघ त्यांचे गुणानुवाद गाण्याकडे वळे. कुटुंबांतल्या प्रत्येक व्यक्तीवर आणि वस्तूवर त्यांचे ठसे उमटलेले होते. ते पाहून मन भारावून जाई. अशा भारावलेल्या मनानें ह्यापिसर एकदां म्हणाले होते —

" हिचं माहेर चांगलं श्रीमंत होतं. माहेरीं हिला कधीं पायीं चालणें माहीत नव्हतं. दाराशीं सारवट गाडी उभी असे. पण दैवाचा काय तडाखा बसला

कोण जाणे, धनदौलत एकदम लुप्त झाली, जसं स्पिरिट उडून जावं, तशी ! आणि हातातोंडाशीं गांठ पडणंहि कठीण झालं ! त्या दारिद्र्यांत मुलगी उजवणंहि अवघड झाल्यामुळं ही माझ्यासारख्याच्या घरीं येऊन पडली. पण तिची बहादुरी अशी कीं माहेरच्या त्या एक काळच्या श्रीमंतीचा तिनं चुकून-सुद्धां उच्चार केला नाहीं. नाहीं तर, बायकांना माहेरचं मोठेपण गायची काय हौस असते ! " माझ्या माहेरीं अस्सं होतं नि तस्सं होतं "– पदोपदीं त्याची फुशारकी मारायची ! पण ह्या बाबतींत हिनं ' आळीमिळी गुपचिळी ' चं व्रतच घेतलें होतें म्हणाना ! चुकून देखील उच्चार केला नाहीं त्या वैभवाचा. उच्चार करायचा नाहीं, हें एक वेळ जमेल. पण वागणं ? शरीराला कष्ट माहीतच नसले तर तें वाकणार कसं ? आणि मन चरफडल्याशिवाय कसं राहील ? पण काय नवल ! शरीर राबवतांना हिला शरम वाटली नाहीं. समरसता इतकी कीं जणु कांहीं हें बाळकडूच मिळालेलं असावं, असं कुणालाहि वाटावं."

अशी निष्ठावंत सहचारिणी. आपण तिला अंतरलों, हा हापिसराच्या मनाला मोठा हादरा बसला; आणि अंगावर प्रपंचाचा दुहेरी भार पडला. कर्जमुक्त झालेल्या हापिसरांवर आतां अंबिकाबाईंचें ऋण फेडण्याचा भार पडला. मुलांकडे पाहणें आलें. हापिसर तसे कुणापुढें नमले नव्हते. त्यांची शरीर-काठी जशी ताठ तसंच मनहि ताठ. ताठपणानें रस्त्याच्या कडेनें जाणारी त्यांची मूर्ति कोणाच्याहि नजरेंतून निसटली नसेल. खेडवळ बांधणीचा पायांत जाडजूड जोडा. चालतांना नजर पायांवर. बोलणं जसं अच्या-वच्या नाहीं किंवा अघळ-पघळ नाहीं, तसंच रस्त्यांतून जातांना इकडे-तिकडे पाहणें नाहीं, कीं चालीच्या लयींत बदल नाहीं. पाऊल कसं ठामपणानें पडे. पण ह्या ताठपणात आतां बदल होऊं लागला. मात्र, तो कालमानानें नव्हे, तर काळाच्या जुलमीपणानें. त्याच्यापुढें कोणाचें काहीं चालत नाहीं; हळूहळू लवणें भागच पडतें. तसे थोडेसे हापिसर वांकूं लागले होते. अंबिकाबाईंच्या निधनाचा आघात झाला आणि प्रपंचभार दुपटीनें अंगावर पडला.

मुलांकडे पाहणें हें आईचें कर्तव्य असतें ; आणि अंबिकाबाई तें चोख

बजावीत होत्या – इतकें कीं, हापिसरांना तसें कधीं त्याकडे लक्षच देण्याची गरज पडली नाहीं. मुलांना कांहीं हवें असलें तर तीं आईकडे धरणें धरीत. त्यांनीं तें क्वचित् वडिलांकडे मागितलें तरी देखील ते मुलांना आईकडेच रवाना करीत. त्यांनीं धाक कधींच दाखविला नाहीं. तरी पण त्यांचें निःस्पृह आचरण व निर्भीड भाषण यांमुळें एकंदरींतच त्यांचा सर्वांवरच वचक असे. नेणत्या मुलांना घेणें-खेळवणें त्यांना जमलें नाहीं. पण त्याचा अर्थ वात्सल्याचा अभाव, असा नव्हे. त्यांच्या अंतरीं माया उदंड होती. पण स्वभावांत असा एक हळवेपणा होता कीं, उगीच आपल्याकडून धका लागला तर, अशी भीति त्यांच्या मनांत असावी. दिव्याची कांच ते अबदारपणें हाताळीत. एकदां बदली झाली तेव्हां ह्या गांवाहून त्या गांवाला जातांना त्यांनीं कांचेचा स्टँड, दोरी बांधून, गळ्यांत माळेसारखा अडकवून नेला. हें निर्जीव वस्तूबद्दल झालें. मग बालकाला – नाजुक फुलाला ते स्पर्श देखील बुजून करीत होते ह्यांत नवल काय ? कुणाला किरकोळ जखम झाली नि त्यांतून रक्त आलें तर तें देखील त्यांना पाहावत नसे. घरांत कोणी आजारी पडलें तरी देखील, ह्याच काकळ स्वभावामुळें, ते लांबून लांबून वावरत असत. अंबिकाबाईंच्या शेवटच्या आजारांत पराकोटीच्या अवस्थेंतहि ते निकट यायला धजले नाहींत. इतक्या काकळ वृत्तीच्या वडिलांच्या हातचा मार मुलांना माहीत नसणारच.

आतां मुलांकडे पाहणें आलें – घरांत लक्ष घालणें आलें. मुलें सुट्टीला वा रजेवर घरीं यायचीं. त्याची पूर्वतयारी म्हणजे भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा, उकडून वाळवलेल्या शेंगा, गुळाचे खडे, हवळा, हुरडा अशी सिद्धता ठेवायची. ते म्हणायचे, "हं नानू, त्या फळीवर गुळाच्या सायीचे खडे आहेत आणि तिकडे कणगुल्यांतनीं शेंगा आहेत, बरं का !" मेवा-मिठाईचे डबे घरांत येणें इतक्या लहान गावीं शक्य नसे. चकल्या-कडबोळीं ह्यांचेहि डबे भरून ठेवणें शक्य नसे. शिवाय, ऐपतीचाहि प्रश्न असेच. पण शेतकऱ्याच्या घरचें वैभव म्हणजे मेवा-मिठाई किंवा चकल्या-शंकरपाळीं नसून, हवळा, हुरडा, शेंगा ह्यांची चंगळ हेंच होय.

मुलांच्या सुट्टींतल्या मुक्कामांत गांवांतल्या मित्रमंडळींच्याहि घरीं खेपा सुरू व्हायच्या. त्यांच्या गप्पागोष्टी ओसरीवर चालायच्या. त्या एकून हापिसर माजघरांतून हळूच दारांत यायचे आणि म्हणायचे, "अरे, चहा-पाणी कांहीं झालं कीं नाहीं ?" आणि ही विचारपूस करण्यांत देखील किती अबदारपणा ! समजूत घातल्यागत ते म्हणायचे, "अरे, स्नेहीसोबती बसायला आले तर चहापाणी करावं–आतां तुलाच करावं लागणार–पण कर कीं ! अन् हें बघ, आम्हालाहि दे तुमच्याबरोबर". आपली अशी वर्णी लावण्यांतला हेतु मुलांनीं चहा करायला निःशंकपणें उठावें, इतकाच. ते पुढे म्हणत, "अरे, खाऊन कांहीं सरत नाहीं. असं खाऊन खाऊन किती खाल ? (आणि भयसूचक इषाऱ्याच्या गंभीर आवाजांत म्हणत) सरतं व्यसनानं!" व्यसनासंबंधींच्या ह्या कटाक्षाचें प्रत्यंतर आल्यागेल्यांना त्या ओसरीवरच दिसत असे –

**एका व्यसनास जितके लागे**
**तितक्यानें दहांचें पोट भागे**

असा सिद्धान्त एका फळीवर मोठ्या अक्षरांत रंगवून टांगलेला, कुणालाहि वाचायला मिळत असे. हें सुभाषित कुठलें होतें कुणास ठाऊक ? का त्यांच्याच तळमळींतून तें निर्माण झालें होतें तें कांहीं माहीत नाहीं. पण त्याच्या अनुरोधानें व्यसनाचा निषेध त्यांच्या तोंडून वारंवार ऐकायला मिळे.

मुलांच्यासाठीं आणखी एक पाठ त्यांनीं त्याच ओसरीवर टांगून ठेवला होता :–

–: चिनी लोकांतली म्हण :–

दसपट बोलून दाखविण्यापेक्षां
एकपट करून दाखविण्याची किंमत
हजारपट अधिक आहे.

त्यांचें लक्ष, मुलांची मनोधारणा उत्कृष्ट व्हावी याकडे किती होतें ह्याचा

निदर्शक हा कागदी फलक एका खांबावर लोंबत असे. श्रीजगदंबाप्रसन्न, श्रीरामसमर्थ, अशा घवघवीत ईश्वरनामांनीं भिंती किंवा तुळया रंगविण्यापेक्षां, जेणेंकरून मुलांचा पिंड सकस होईल असें कांहीं उद्बोधक त्या ओसरीवर असायचें.

याप्रमाणें ओसरीचा कानोसा घेऊन ते जसें तिकडे लक्ष देत त्याचप्रमाणें स्वयंपाकघरांतहि त्यांना लक्ष द्यावें लागे. दूधवालीचा हिशेबच केवळ ते बघत असें नव्हे, तर दूध तापवून विरजण लावणें हेंहि तेच करीत. थंडीच्या दिवसांत प्रातःकाळीं मुलांना ऊन पाणी मिळावें, म्हणून ते लवकर उठून तें तापवून ठेवीत. शाळेंतल्या वेळापत्रकाची मांडणी ते कुशलपणें करीत आले होते; त्याच ज्ञानाचा उपयोग आतां, दळपिणीला दळण केव्हां द्यायचें आणि सडणें-कांडणें केव्हां करायचें ह्यासाठीं त्यांना करण्याची पाळी आली. मुलांना इयत्तावार वा वयोमानानें किती प्रमाणांत शिकवावयाचें हें त्यांना ठाऊक होतें. त्याऐवजीं आतां डाळ-तांदूळ किती वैरायचे या कामीं त्यांना प्रमाण ठरवावें लागे. स्वयंपाकघर सारवण्याचीहि दक्षता ते घेत.

अशा रीतीनें पिठा-मिठापासून 'सरलं-उरलं' पाहणें आलें. संसारांतून मन बाजूला काढायला शिकायचें तें राहिलें बाजूला, अन् त्यांतच तें अधिक गुंतवणें भाग आलें. शाळेंतले शिक्षक रजेवर असले म्हणजे वेळ कशी भागवून न्यायची याचा त्यांना अनुभव होता. आतां प्रत्यक्ष अंबिकाबाईची गैरहजेरी – संसारांतल्या कर्तबगार सहचारिणीची गैरहजेरी ! आणि तीहि चार-दोन दिवसांची किंवा महिना-दोन महिन्यांची नव्हे ! कायमची ! पदोपदीं जाणवणारी, शरीराला क्लेश देणारी म्हणून नव्हे तर मनाला यातना देणारी ! सुरळीतपणें कांहीं चालूंच नये, असा दैवाचा दुष्टावा ! पण तसे ते दैवाला बोल लावून कपाळाला हात लावणारे नव्हते. त्यांना ह्या हानींतला परमेश्वरी हेतु दिसला तो हा कीं –

" गृहिणीचं ऋणहि जणुं कांहीं आपण ह्याच जन्मीं फेडून टाकायचं आहे, असं विधात्यानं योजलेलं दिसतंय !"

## : : १०

काळ दिवस-रात्रीच्या पावलांनीं एकसारखा चालतच असतो. तो चालत असतो म्हणूनच ठीक आहे. नाहीं तर आंसवें वाळलीं नसतीं, जखमांवर खपल्या बसल्या नसत्या. सूर्याच्या कोवळ्या उन्हांत औषधी गुण आहेत, चंद्र तर स्वत:ला औषधिपति म्हणूनच म्हणवून घेत आहे, आणि रात्रीच्या अंधा-रांत शांतिपाठाची शक्ति आहे. काळ अविरत चालत असल्यामुळें हें सारें प्रचीतीला येतें. चिखलांत रुतलेली गाडी बाहेर निघायची शक्यता असते आणि कळवळणारीं हृदयें सांवरलीं जातात तीं काळाच्या ह्या अखंड गतीमुळेंच.

हापिसरांचा थोरला मुलगा नोकरीच्या गांवीं निघून गेला. दुसरा मुलगा शाळामास्तरकीचें ध्येय ठेवून ट्रेनिंग कॉलेजांत दाखल झाला. तिसरा तर अज्ञानच. तो नुकताच इंग्रजी शिकायला लागला होता. इंग्रजी शिक्षणाची सोय त्या काळीं जिल्ह्यांतल्या एखाद्याच ठिकाणीं असल्यामुळें त्यालाहि वडिलां-पासून दूरच्या गांवीं जाणें भागच होतें. अशा रीतीनें तीन मुलगे तीन दिशांना गेले. घरांत राहिली फक्त एक परकरी मुलगी माई. तिच्या पाठची काशी — ती अवघी तीन वर्षांची. इतक्या लहान मुलीचें घरीं कोण करणार ? आजी शोकसमाचाराला आली होती. तिच्याबरोबर काशी आजोळीं गेली. ह्या पांगापांगीमुळें एव्हढ्या थोरल्या घरांत हापिसरांना भकास वाटूं लागलें. ‘घरांत’ म्हणण्यापेक्षां जीवितांत भकास वाटूं लागलें, हें खरें. विशेष जाणवलें

तें हें कीं, तीन मुलगे असून जवळ कोणीच नसावा ? थोरला नोकरीला लागला आहे. नोकरी सोडून घरीं ये असं त्याला कसं म्हणावं ? अर्थात् तो दूरच असणार, हें ओघानंच आलं. धाकटा तो धाकटाच. त्याचा आधार तो काय ? त्याचं शिक्षणहि व्हायला हवं ह्या वयांत. मधला ? – ट्रेनिंग कोर्स २–३ वर्षांचा झाल्यावर मग मास्तर होणार ! आणि मास्तरकींत मिळणार तरी असं काय ? त्यापेक्षां तो घरीं राहिला तर ? ह्या निष्कर्षानें मनांत मूळ धरलें. हापिसरानीं एक दिवस थोरल्या मुलाला पत्र लिहिलें :

**" भरत जवळि नाहीं मातुलग्रामवासी**
**भरत-जननि धाडी कानना राघवासी**

अशी माझी दशरथासारखी एकाकी अवस्था झाली आहे. तुम्ही नोकरीवर. मिळवत्याला घरीं बैस म्हणणं बरोबर नव्हे. आप्पानं मास्तरकीचा मोह सोडून घरीं आमच्याजवळ राहावं. नोकरींतला दरमहा हातीं मिळणारा रोख पगार घरीं नाहीं; पण शेतीबाब लक्षांत घेऊन, आमच्या हातून जो घडू शकला नाहीं तो उद्योग केला तर त्या पगाराच्या दिढी-दुपटीनें प्राप्ति होईल. उद्योग कसा नि काय करायचा तें आम्ही दाखवूं. आणि ती वेळ हीच आहे. एकदां टाईमबार झाल्यावर मग सर्व निर्फळ. तरी तुम्हीं आप्पास लिहून पाहावें."

थोरल्या मुलानेंच आप्पाला हें लिहायला हवें होतें, अशांतला भाग नाहीं. हापिसर त्याला परस्पर लिहून घरीं परत बोलवूं शकत होते. पण त्यांची पद्धतच ही अशी. 'प्राप्तेषु षोडशे वर्षे पुत्र मित्रवदाचरेत् ।' हें सुभाषित पुष्कळांना पाठ असतें. पण तसें वागणें फार थोड्यांच्याकडून घडतें. आपल्या अधिकारपदांत त्यांना कोणाची भागीदारी खपत नाहीं. निर्णय आपण घ्यायचे आणि इतरांनीं ते मानायचे, असें वर्तनच पुष्कळांच्या बाबतींत आढळतें. पण, हापिसर त्या पुष्कळांसारखे नव्हते. आपला निर्णय ते दुसऱ्यावर लादीत नसत. सज्ञान मुलांपुढें आपली विचारसरणी मांडून प्रत्येक गोष्टीच्या साधक-बाधक दोन्ही बाजू सांगून मग त्यांच्या समजुतीनें काय तें घडावें, काय तें त्यांनीं ठरवावें, असा त्यांचा हेतु.

थोड्याच दिवसांनीं. ट्रेनिंग कोर्सला रामराम ठोकून आप्पा घरीं आला.

मागीलदारीं लाकडाचे ओंडके पडले होते. शेताच्या कांठचें एक झाड तोडून तें घरीं आणलें होतें. वर्षाच्या सर्पणाची बेगमी अशीच केली जाते. ओंडके फोडून फाळी करणें हापिसरांना अवगत होतें. अर्थात् आतां दमादमानें हें काम होत होतें. तोंच गणूदादा आले.

"या गणूदादा. बरं झालं आलांत ते. आप्पाला सांगितलंच होतं कीं तुम्हांला एकदां येऊन जा म्हणावं म्हणून." हापिसरांनीं स्वागत केलें.

"अहो, पण हें काय चालवलं आहेत ? निभणार का आहे आतां लाकडं फोडणं ?" गणूदादांनीं कळकळीनें हापिसरांना त्यांच्या थकलेपणाची जाणीव दिली.

"खरं आहे !" असें म्हणत हापिसरांनीं हातांतली कुऱ्हाड भिंतीला उभी करून ठेवली आणि नेसल्या उपरण्याच्या थिटया सोग्यानें घाम पुसत पुसत ते ओंडक्यावरच टेकले. "हाक अशासाठीं मारली, तुम्हांला ठाऊक आहेच कीं आमच्या भाऊंनीं कुळांना कांहीं जमिनी मिराशी हक्कानं दिल्यात. त्या जमिनी समाईक होत्या, म्हणून मिरासपत्रावर त्यांच्या बरोबरीनं आमच्या काकींचीहि सही होती. मिरासपत्र देणारांपैकीं शेवटची व्यक्ति दिवंगत झाल्यानंतर बारा वर्षांच्या आंत वारसांना त्या जमिनी कुळांकडून सोडवून मिळाव्यात म्हणून दाद मागतां येते. भाऊंच्या मागें काकी कैक वर्षे होत्या. तोंपर्यंत आम्हांला कांहीं करतां आलं नाहीं. नंतरहि 'आज करूं, उद्या करूं' म्हणतां म्हणतां लांबणीवर पडलं. नोकरींत तशी सवड तरी कुठं होती ? पण आतां कायद्यानं दिलेल्या मुदतीच्या आंत दावे लावायला पाहिजेत. दहा दहा मणांचा वांटा ज्या जमिनीचा मिळायला हवा त्या जमिनीचा खंड अवघा १०-१२ रुपये घेऊन गप्प बसावं लागतं. खाल्लं कीं कुळांनीं आजवर कैक वर्षं ! आतां आम्हांला आमच्या पोरांबाळांकडे नको का बघायला ? "

गणूदादाला हें सारें सांगण्याचें कारण हेंच कीं, हापिसर आतां हळूहळू थकत चालले होते. कोर्टकचेऱ्या करायच्या म्हणजे वकिलाकडे, त्याचप्रमाणें तालुक्याच्या नि जिल्ह्याच्या गांवीं तारखांना हेलपाटे घालायचे ! वाहतुकीचीं साधनें त्या वेळीं कुठें होतीं ? छकडा, घोडें किंवा पायपीट. छकडा

किंवा घोडें भाड्यानें करणें नेहमीं कसें जमणार? तेव्हां, पायपीटच स्वाधीनची. तथापि, पायपिटीची जन्मजात संवय असली तरी हापिसर आतां तिच्यावर किती काळ भिस्त ठेवणार? तेव्हां, उठल्या-बसल्या गणूदादाची मदत हवी आणि सोबतही हवी.

" हें पाहा गणूदादा, आप्पाला सारं समजूं लागेपर्यंत तुम्हांला तकलीफ देणार." हापिसर म्हणाले.

" तकलीफ कसली? अन् मला तरी काय उद्योग आहे घरीं? चोया काढून पत्रावळी लावायच्या, नाहीं तर, नदीकांठीं भटकून फुलं-बेल-तुळशी गोळा करून आणायच्या, हाच कीं नाहीं? चला, केव्हां निघायचं? हांक मारलीत कीं मी आहें तुमच्याबरोबर – केव्हांहि!" गणूदादांनीं दिलासा दिला.

आणि तो उद्योग सुरू झाला. खाते-उतारे, कबुलायती, मदतीचे दावे, त्यांच्या निकालाच्या नकला, अशा कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू झाली. उमेदवार आप्पा आणि सोबत गणूदादा यांच्यासमवेत दिवाणी – मुलकी कचेऱ्यांच्या खेपा होऊं लागल्या. कामें रंगाला येऊं लागलीं. होतां होतां आप्पाला सारें समजूं लागलें आणि हापिसर थकत चालले. त्यांना दगदग होईनाशी झाली. साहजिकच त्यांनीं अंग काढून घ्यायचें धोरण अंगीकारलें.

आप्पा त्यांना विचारूनच चालत असे. तो सुचवी, ' उद्यां तारीख आहे; पाटणाला जायला हवं.'

" जा कीं तूंच." हापिसर म्हणत. " मी कशाला? आतां ' गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' एव्हढीच आमची भूमिका. ऐकलंस वाहवा, न ऐकलंस, तरीहि वाहवा! तुझं तुला हित कळतच आहे. नफानुकसान कांहीं झालं तरी तें तुझंच. वाडवडिलार्जित जें जें कांहीं होतें, त्याची वेडीवांकडी विल्हेवाट न लावतां, तुमच्यासाठीं तसंच अपूट ठेवलं आहे. उलट, माझ्या वडिलांनीं केलेला कर्जाचा बोजा – त्याचा वारसा मात्र तुमच्यासाठीं ठेवला नाहीं. तेव्हां, आतां माझ्याकडे कांहीं बोल येणार नाहीं. बरं, भाऊंच्या भोळेपणामुळं जें शेतीचं नुकसान झालं तें भरून कसं काढायचं त्याची दिशा दाखवून दिली, तुम्हाला मार्गाला लावलं. आतां तुमचं तुम्हीं पाहायचं सारं."

जळांत जन्मणारें कमळ पाण्याच्या पृष्ठभागापासून वर अलग डोलत राहतें. हापिसरांच्या ह्या उद्‍गारांवरून त्यांच्या वृत्तीचें हें सौंदर्य कुणालाहि प्रतीत होईल.

वार्धक्याबरोबर त्यांचा दम्याचा विकारहि वाढत होता. कांहीं औषधपाणी करावें, असें कोणी सुचवीत असे. "थोरला मुलगा पुण्याला आहे. जा त्याच्याकडे कांहीं दिवस. तिथं नामांकित डॉक्टर आहेत. सांगतील कांहीं उपाय."

हापिसर म्हणत," खरं आहे तुमचं म्हणणं !" पण तितक्या त्वरेनें तें त्यांनीं मनावर घेतलें नव्हतें. चालढकल होत होती; आणि, नाहीं म्हटलें तरी, इतक्या चटपटीनें तिथून पाय थोडाच निघे. पुण्याला गेलों न् इकडे कचेरींत माझीच साक्ष निघाली, तर इतक्या लांबून चटकन् येणें कसें घडणार ? तेव्हां, "हें झाल्यावर जाऊं, त्याचं काय होतं तें पाहूं नि मग जाऊं," असें कारणा-कारणानें जाणें लांबणीवर पडत होतें.

पुन्हा एकदां कोणीं तरी असाच औषधोपचारांचा विषय काढला. त्या वेळीं ते म्हणाले, "तुम्ही मंडळी सांगतां तें रास्तच आहे. माझ्या सुखाचंच तुम्ही सांगतांय. पण खरं म्हणाल तर मला आतां जगायची कांहीं वासना नाहीं. औषध घेऊन जगण्यांत कसलं आहे सुख ? तरी पण जाऊन पाहणार आहें पुण्याला. औषधांचा गुण येऊन कांहीं जास्त दिवस जगायला मिळालं तर तेव्हढाच आप्पाला फायदा होईल. त्याला मीं घरीं बसवलाय. तेव्हां, दाव्यांचे निकाल लागून गेलेल्या जमिनी परत मिळेपर्यंत मी आप्पाचं देणं लागतों. जितकी अधिक दिवस पेन्शन मिळेल तितकी ती त्याला उपयोगीं येईल. आप्पासाठीं जगायचं !"

हापिसरांचा तो गांव म्हणजे एक खेडेंच होतें. तरी पण तिथें टपाल दररोज येत-जात असे. टपाल यायची वेळ साधारणपणें दुपारीं बारा वाजायची. जेवणाची वेळहि पण तीच असे. पण त्या वेळीं जेवणापेक्षां पोस्टमनकडे हापिसरांची नजर असे. त्याची ते वाट पाहत बसायचे. स्वयंपाकघरांत पानें मांडलीं असलीं तरी ते ओसरीवरच त्याच्यासाठीं घुटमळत. एकदां पोस्टमन

येऊन गेला म्हणजे मग ते पाटावर येत. नोकरीवर असलेला थोरला मुलगा, शिकायला परगांवीं असलेला धाकटा मुलगा, यांच्याकडील क्षेमसमाचाराचीं पत्रें वेळेवर आलीं नाहींत तर त्यांचीं घालमेल सुरू होई. पत्र यायचा दिवस टळला कीं ते लिहून कळवीत 'चार ओळी खरडून टाकायला काय अवघड वाटतं तुम्हाला ? आम्ही इकडे किती बेचैन होतों ह्याची कल्पनाच नाहीं तुम्हांला ! एक पैशाचं कार्ड, पण तें वेळेवर न आलं तर इकडे आम्हांला अन्न गोड लागत नाहीं. काळजीनं पावशेर पावशेर रक्त आटतं आमचं ! "

याशिवाय दुसरेंहि महत्त्वाचें टपाल यायचें असतेंच – वकिलाकडून, कोर्ट-कचेऱ्याकडून – कीं ज्याकडे लक्ष लागून राहिलेलें असतें. दिवसाचा नूर येणाऱ्या टपालानें ठरायचा असतो. आज टपाल नाहीं असें कळणें देखील जरूर असतें. आणि महत्त्वाचेंच टपाल यायची वाट असली तर ?

एक दिवस तसा एक लखोटा यायचा होता. गणूदादाहि त्या अंदाजानें हापिसरांकडे येऊन बसले होते. वेळ जायला हापिसरांची चिलीम असेच. इतक्यांत, पोस्टमननें लखोटा टाकला. हापिसरांनीं तो हातांत घेतला नाहीं. गणूदादा म्हणाले, "पाहा, पाहा हापिसर, काम फत्ते झालं कीं नाहीं तें." त्यांना उत्सुकता होती. हापिसरांना ती नव्हती असें नाहीं, पण ते शांत चित्तानें म्हणाले, "थांबा गणूदादा" आणि त्यांनीं आप्पाला हाक मारली. आप्पा मागीलदारी होता. आठवड्याचा बाजारचा दिवस. सड्यावरचे धनगर लोणी घेऊन येत. आप्पा तें लोणी घेत होता. "आलोंच हात धुऊन" अशी त्याची प्रतिसाद आली. तेव्हढ्या दरम्यान हापिसर म्हणाले "आप्पालाच उघडूं द्या लखोटा. मी दग्धहस्त आहें, गणूदादा."

गणूदादा गंभीर झाले, अधोमुख झाले आणि पुन्हा वर मान करून त्यांनीं हापिसरांकडे पाहिलें. हापिसर जळकी छापी झटकीत होते. गणूदादांच्या नजरें-तला प्रश्नार्थकपणा त्यांना कळून आला. ते म्हणाले "गणूदादा, मी अपेशी आहें. अरे, या दाव्याकरतां लागणारा सारा पुरावा गोळा करायला आप्पाला काय यातायात पडली ! किती मिन्त्या कराव्या लागल्या कारकुनांच्या ! घरांत नव्हता कीं काय पुरावा ? सारा सारा पुरावा होता घरांत. पण –"

इतकें म्हणून त्यांनीं एक उसासा सोडला आणि तयार केलेल्या चिलमीचा एक झुरका मारला, ती चांगली फुलवली आणि गणूदादापुढें ती धरून त्यांनीं सांगायला सुरुवात केली :

" उंब्रजला मी नोकरीला होतों. तिथं प्लेग झाला त्या सालची गोष्ट. इथें घरांत कोणी नाहीं, म्हणून महत्त्वाचीं कागदपत्रं आपल्याबरोबर असावींत म्हणून नोकरीच्या गांवीं नेलीं होतीं. प्लेगांत सारा गांव माळावर झोपड्यांवर राहायला गेला. आमच्या घरमालकानंहि माळावर झोपडी घातली व आमचीहि सोय केली. वसतीला झोपडीवर असायचं. दिवसा गांवांत खेप घालायची, शाळेचें कामकाज-टपाल पाहायचं, आवक-जावक काय तें सारं करायचं आणि कृष्णेवर आंघोळ उरकून परत झोपडीवर, असा क्रम चालला होता. एका रात्रीं जेवणंबिवणं उरकून आम्ही माळावर उघड्यावर गप्पा मारीत बसलों होतों. कुणाचंसं लक्ष गेलं अन् तो चमकून म्हणाला, " अरे, गांवांत आग लागलेली दिसते ! " आणि मग एकेकाचे तर्क सुरू झाले.

" आग त्या ह्यांच्या आळीला दिसते. " एकानें म्हणावें.

" नाहीं रे, पिंपळाच्या पारापलीकडे दिसते ती. " दुसऱ्यानें तर्क करावा.

" छे हो, चंदू टांगेवाल्याची कडब्याची गंज पेटलीय ती. " असें तिसऱ्यानें सुचवावें.

" मला तर वाटतं घाटाकडच्या बाजूला तो कुणाचा बरं वाडा – तिकडं आहे ती आग " चौथ्याची कल्पना.

शेवटीं ' कळेल उद्यां आपसूक ' असें आमच्यांतला कोणी तरी म्हणाला, आणि ह्यावर एकमत होऊन बैठक संपली. आम्ही सारे उठलों आणि आपापल्या झोपडींत जाऊन निजलों. सकाळीं उठून नित्याप्रमाणें गांवांत गेलों आणि जो देखावा दिसला त्यानें काळजांत चर्रर्र झालं. आमचा घरमालकच धुमसणाऱ्या त्या वास्तूच्या कडेला डोकं धरून सुन्न होऊन बसला होता. घर जळलं होतं तें माझं बिऱ्हाड असलेलं ! रात्रीं तर्क चालवतांना आमच्या घरमालकालाहि आपल्या घराची दिशा उमगली नाहीं. मग मला

कल्पना शिवली नाहीं ह्यांत काय नवल ! सर्वस्व जळून त्याची राख झालेली पाहायला आम्ही सकाळीं आलों होतों ! जुजबी चालचलाऊ जिनसा काय त्या झोपडीवर नेलेल्या; बाकी सारं त्या घरांत ! घराचीं किंमत ? ती करतां येईल. पण जळून गेलेल्या कागदपत्रांची काय किंमत करावी ? पदोपदीं अडचण येत गेली हे दावे चालवतांना. अस्सल पुरावाच सारा भस्मसात् ! म्हणून म्हणतों मी दग्धहस्त आहें."

"जाऊं द्या तें हापिसर. गेलं तें गेलं ! पण आतां नवी सृष्टि उभारली ना ?" गणूदादा सांत्वनाच्या सुरांत म्हणाले.

"छे हो ! कसली नवी सृष्टी घेऊन बसलात ? दुरून पाहणाराला तसं दिसतं, पण दिसतं तसं सारंच ठीक असतं, असं नाहीं. 'कळा ज्या लागल्या जीवा मला कीं ईश्वरा ठाव्या !' थोरल्या मुलाचं लग्न, आप्पाचं लग्न, माईचं लग्न, तीन कार्यं केलीं. वरवर ठीक आहे हें पाहणाराला. पण एक तरी सुखाचं झालं आहे का ? तिघांच्याहि संसाराचा खेळखंडोबा झाला ! असला आहें मी अपेशी ! मीं पाहून ठेवलंय. कधीं म्हणून नीट सुरळीत व्हायचं नाहीं कांहीं ! जें रीतीनं, स्वाभाविकपणें, अगदीं ओघांत घडायला हवं त्यासाठीं चौपट आटापिटा करावा लागलाय आजवर ! आम्ही गांवाला जायला निघालों कीं त्या दिवशीं गाडीला मनस्वी गर्दी तरी असायची, नाहीं तर गाडी भयंकर लेट तरी असायची ! नाहीं तर मुसळधार पावसानं ओढेनाले तुडुंब भरून वाहूं लागल्यामुळें कुठें तरी अडकून तरी पडायचे, किंवा माघारीं तरी परतायला लागायचं ! तुम्हांला ठाऊक का नाहीं गणूदादा तें प्रकरण ? त्या जमिनीला हक्कदार वारस म्हणून आमचं नांव लागायचं हें रीतीचं, गांवांतल्या अनोळख्यालाहि कळणारं, दिसणारं ! पण, तलाठ्याला काय तेढी बुद्धि सुचली का कोणीं सुचविली – कुणाला ठाऊक ! केव्हढा ढोणा घातला त्यानं दूरच्या भाऊबंदाचं नांव तिथं घालून ! तो ढोणा दूर करायला काय तंगडतोड करावी लागली महिनानुमहिने ! माझं नशीबच बघ खोटं ! "

इतक्यांत तिथें आप्पा आला. गणूदादा म्हणाले, "आप्पा, बघ काय

लखोटा आहे तो ? " आप्पाच्या कानांवर अपेशीपणाची भाषा आली होती. त्यानें डोळे पुसले आणि लखोटा फोडला.

" निकाल आपल्यासारखा लागला ! "

हें ऐकून हापिसर म्हणाले, " आप्पा, बाळंभटजींना म्हणावं उद्यां अंबा-बाईला एकादशणी करायची. गणूदादा, उद्यां जेवायला या. " हें बोलतांना हापिसरांचा गळा दाटून येत होता. त्यांनीं चिलमींतली राख टोकरून काढून ती कोपऱ्यांत पालथी उभी ठेवून दिली आणि दाटून आलेल्या आवाजानें म्हणाले,

" आप्पाला ही बढती मिळली बरं का गणूदादा ! "

## : : ११

कृतकर्माचें प्रायश्चित्त म्हणून भोग वांट्याला येतात आणि योजनाबद्ध परिश्रमाचें फळ म्हणून योग साधले जातात. पण हा कांहीं त्रिकालाबाधित सिद्धान्त नव्हे. दैवयोग आणि दैवभोग यांची गोष्ट ह्याहून वेगळी आहे. नीट रीतीनें गणित सोडविलें म्हणजे बरोबर उत्तर येतें त्याप्रमाणें, कांहीं एका आचरणाचा परिपाक म्हणून ह्या गोष्टी घडतात, असें नाहीं. तसें कांहीं एक न करतां अवचित योग येतो आणि फळ पदरांत पडतें किंवा भोग उद्भवतो आणि दु:ख वांट्याला येतें. तरवारीचे वार चुकविण्यासाठीं योद्धा ढाल पुढें करतो आणि ओघानेंच ते वार ढालीवर बसतात. पण ढाल योजूनच पुढें करण्यांत आलेली असते. उलट, व्यवहारांत कितीकदां असें घडतें कीं, एका-वर बसायचे घाव उगीचच्या उगीच दुसऱ्यावर पडतात. म्हणूनच त्यांना दैवयोग आणि दैवभोग म्हणायचें. ' नशिबीं असे नच तें टळे ' असे त्या वेळीं उद्गार निघतात – ' शारदा ' नाटकांतल्या शारदेप्रमाणें. पुढचा चरण आहे " परि उगिचचि आइचें आंधळें हें खुळें मन तळमळे ". ह्यांतील ' आइचें ' ऐवजीं ' आपुलें ' असा बदल केला कीं हे उद्गार सार्वत्रिक व सार्वकालीन होतील.

हापिसर असें पद्य गुणगुणत नसत. पण त्यांचा अनुभव मात्र असाच आहे. तरीहि " नशिबीं असे नच तें टळे " असें मानून ते निष्क्रिय कधींच झाले

नाहींत, किंवा त्यांनीं कधींच धीर सोडला नाहीं. भोग भोगलेच पाहिजेत; ते कुणाला सुटले आहेत ? असें त्यांचें धीराचें कणखर आचरण असे.

चैत्राचे सुरुवातीचे दिवस. गांवांत रामनवमीचा मोठा उत्सव. पण हेच दिवस वसुलाचेहि. हापिसर तसे इनामदार होते. त्यांची वतनी शेतजमीन एकाच गांवांत नव्हती; कांहीं ह्या तालुक्यांत तर कांहीं शेजारच्या तालुक्यांत, अशी चार-पांच गांवांत थोडी थोडी विखुरलेली होती. अर्थातच जमिनी खंडानें लावून दिल्या होत्या. कुळें आपण होऊन खंड आणून घालतील असें कुठलें व्हायला ? इनामदारानें खेपा घालाव्यात आणि दर खेपेला थोडा थोडा, मिळेल तितका वसूल घेऊन परतावें. उरलेल्या वसुलासाठीं मामलेदाराकडे मदतीच्या फिर्यादी कराव्यात. ह्या प्रतिवार्षिक शिरस्त्याप्रमाणें हापिसर शेजारच्या तालुक्यांतील एक-दोन गांवीं वसुलाला गेले होते आणि झाला तितका वसूल घेऊन आले होते. त्याचीं टिपणें करणें, जमाखर्च मांडणें, हीं परतल्यावरचीं कामें. आणि ह्यांच्याच जोडीला, वसुलासाठीं बाहेरगांवीं गेलेल्या मुदतींत सांठलेलीं वर्तमानपत्रें परत आल्यावर वाचून काढणें, हीहि एक महत्त्वाची बाब असे.

हापिसरांना वर्तमानपत्रें वाचण्याचा मोठा छंद. दैनंदिन कार्यक्रमांत त्यांना दुसरी कोणतीच करमणूक नसे. अघळपघळ गप्पागोष्टी मारणें हेंहि त्यांना आवडत नसे. स्वाभाविकच ते कुणा गप्पिष्टांच्याकडे जाऊन बसत नसत किंवा त्यांच्याकडे कुणा गप्पिष्टांचा अड्डा जमत नसे. वर्तमानपत्रें हींच त्यांच्या करमणुकीचीं मुख्य साधनें. वसुलाला ते जेव्हां परगांवीं जात तेव्हां आठवडा आठवडा मुक्काम तिकडे होई. वसुलाचीं तीं गांवें इतकीं लहान असत कीं आठवडाभरांत एखाद्याच दिवशीं तिथें टपाल येई; आणि तिथें वर्तमानपत्र हातीं पडत नसे. कारण पांढरपेशांची वसती तिथें नसे किंवा शाळाहि नसे. सध्यां खेडोपाडीं शिक्षण फलावलें आहे आणि वृत्तपत्रेंहि गांवोगांवीं पोंचलीं आहेत. तशी स्थिति त्या वेळीं नव्हती. बहुजनसमाज बहुतांशीं

निरक्षर होता त्या काळीं. त्या फिरतींत वर्तमानपत्रांच्या वाचनाच्या दृष्टीनें हापिसरांना उपासच घडत असे. घरी मुक्कामाला आल्यावर तें पारणें फिटायचें. घरचीं आणि शेजारींपाजारीं मिळतील तीं वर्तमानपत्रें गोळा करून तीं सांगोपांग वाचून संपवल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

हें वाचन रात्रीं चालायचें. जमाखर्चाचीं टिपणेंहि रात्रींच निवांतपणीं व्हायचीं. घरांतल्या मंडळींची निजानीज झाली व इतरांची वर्दळ संपली कीं पसारा पसरून बसायला येई. मागल्या सालच्या खतावण्या पाहायची जरुरी असे. तीं दप्तरें फळीवरून खालीं काढावीं लागत. घरांत कपाटें नसत आणि भिंतींत असलेलें एखाद्–दुसरें फडताळ संसार-साहित्यानें भरलेलें असे. तेव्हां खुंटयांवर टाकलेल्या फळयांवर दप्तरें, पुस्तकें, वर्तमानपत्रें असें हापिसरांचें साहित्य आडगळलेलें असे.

घरांत रात्रीची सामसूम झाल्यावर हापिसरांनीं आपल्या हापिसांत ( म्हणजे माजघरांतल्या खोक्यापुढें ) बैठक ठोकली. मग जमाखर्च लिहिला. शिल्लक जमते कीं नाहीं ती पाहिली. ती शिल्लक निरनिराळया नाण्यांच्या चळतींत खोक्यापुढें मांडून ठेवली. नंतर वसुलासंबंधींचीं कच्चीं टिपणें प्रवासी दप्तरांतून बाहेर काढून त्यांची खातेदारांच्या नांवनिशीवार वहींत नोंद करायला सुरुवात केली.

त्या माजघराला तीन दारें होतीं. एक मागीलदारीं परसांत जाण्यासाठीं, दुसरें पुढीलदारीं ओसरीवर जाण्यासाठीं आणि तिसरें स्वयंपाकघरांत जाण्यासाठीं. परसू ऐसपैस हामचौरस होतें. ओसरीशीं काटकोन करून एक लांबलचक सोपा होता. माजघराचीं तिन्ही दारें उघडीं होतीं. स्टँड जळत होता. त्याच्या उजेडांत लिहिण्या-टिपण्याचें काम निवांतपणानें चाललें होतें. तरीहि परसांत जायच्या दारांतून छाया पडल्याचा त्यांना मधून मधून भास होत होता. भास झाला कीं मान वर करून त्या दाराकडे नजर टाकावी आणि तेथें कोणीच नाहीं असें पाहून पुन्हा मान खालीं घालून लिहायला सुरुवात करावी, असा क्रम चालला होता. परसाच्या कुसवाच्या एका कोपऱ्यांत कडब्याची भली मोठी गंज रचली होती. त्या गंजींत खुसपुस

झाल्याचा आवाज ऐकूं येत होता. मुंगूस, घूस किंवा मांजर अशांपैकीं कुणाची तरी खुसपुस असायची हें ठरलेलेंच होतें. तेव्हां त्या निवांतपणीं आजहि ऐकूं येणाऱ्या खुसपुशीचा त्यांनीं निराळा अर्थ केला नाहीं. कुसवाला लागूनच पलीकडे एक बिघाभर मळा होता. हापिसर व त्यांचे भाऊबंद ह्यांचीं घरें एका ओळींत होतीं. त्यांना लागून असलेला हा समाईक मळा होता. अगदीं भर गांवांत, घराच्या कुसवाला लागून असलेला हा मळा म्हणजे कांहींशी अभिमानाची बाब होती. त्या मळ्याला लागून नदी वाहत होती. आणि नदीच्या पैलथडीला उरलेला गांव, व त्याच काठालगतच्या छोट्याशा उंच टेकडीवर गांवाचें सुप्रसिद्ध राममंदिर.

कुसवालगतच पण मळ्यांतून कुत्रीं भुंकत होतीं. ही देखील नवलाईची बाब नव्हे. रात्रीं कुत्रीं भुंकायचींच. तशांत विझुट, कोल्हं, मांजर अशांची चाहूल लागली कीं मग कुत्र्यांना भुंकायची जोरांत उबळ यायची. नदीपलीकडलें राममंदिर उंचावर असल्यामुळें त्या मंदिरांतल्या कीर्तनांतील टाळ-मृदंगाचा ध्वनीहि सगळ्या गांवांत सहज ऐकूं येई. अशी भिन्नभिन्न आवाजांची साथ कामांत गढलेल्या हापिसरांना मिळत होती. ह्या आवाजांची तशी कांहीं दखल घ्यायचें कारण नव्हतें. पण राहून राहून, मागीलदारांतून कोणीतरी डोकावून पाहिल्यागत सावली पडल्याचा तो भास मात्र त्यांना होतच होता. आणि प्रत्येक वेळीं ते मान वर करून पाहत आणि भास हा भासच आहे असें पाहून पुन्हा कामाला लागत.

तशांत त्यांना बहिर्दिशेला जाण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्या काळीं खेडेगांवांत संडास कुठले ? बहिर्दिशेला जायचें म्हणजे खरोखरीच बाहेर कुठें तरी लांब जाऊन यायचें. नदी असलेल्या गांवीं बहिर्दिशेचा विधि नदीकांठीं व्हायचा. मोठी सोयच ती. हापिसर उठले आणि परसांत आले. तिथल्या विहिरीजवळच्या डोणीशेजारीं असलेली तपेली घेतली आणि रस्त्या-कडच्या कुसवांतील दिंडी उघडून ते नदीच्या वाटेला लागले. मागें सारे कागदपत्र, रुपये-आणे-पै अशी विविध नाण्यांच्या चलतींतली शिल्लक रक्कम, सारें कांहीं जिथल्या तिथें तसेंच पसरलेलें. आणि सारीं दारें तशींच सताड उघडीं. स्टँड ढणढण जळतो आहे.

बहिर्दिशेला जाऊन यायला तास-पाऊण तास लागला. नदीवर हातपाय धुऊनच हापिसर परतले. रस्त्याकडची दिंडी लावली. दिंडीला कडी-कुलूप असे. पण कुलूप किल्लीनें उघडण्याची पाळी येत नसे. कडींतूनच त्याची आरपार काढ-घाल करतां येई. त्याप्रमाणें कुलूप लावून, आडसर ओढून घेऊन हापिसर आपल्या हापिसांत पुन्हा स्थानापन्न झाले. पुन्हा दाराशीं तोच भास, कोणी तरी डोकावून पाहिल्याचा. आतां वर्तमानपत्रें घेऊन, गादीवर लवंडून त्यांनीं वाचन सुरू केलें. तिकडे राममंदिरांत " सीताकान्त-स्मरण जयजयराम " असा मोठ्यानें घोष झाला. कीर्तन संपायचा सुमार आला ह्याचाच तो सूचक. इतक्यांत, दिंडीचा आडसर गडगडल्याचा आवाज झाला. आतां मात्र हापिसरांचा संशय बळावला; किंबहुना आतां संशय उरलाच नाहीं. गंजीपासली खुसपूस, पलीकडेच कुसवालगत कुत्र्यांचें भुंकणें, दारांतून वारंवार कोणी तरी डोकावून पाहत असल्याचा भास, आणि आतां तर आडसरच गडगडला ! कोणी तरी मागीलदारीं असलेंच पाहिजे. हातांत स्टँड घेऊन हापिसर दारांतून परसांत आले. सगळीकडे अंधार. स्टँडचा उजेड असा कितीसा लांब पोंचणार ? आणि म्हाताऱ्याची मंद दृष्टि ! तशांत, हापिसर आणि ती दिंडी ह्यांच्या दरम्यान ५।४ केळी उभ्या असलेला वाफा होता. त्यामुळें दिंडीशी कोण आहे तें नीट न्याहाळावें म्हणून, माज-घराच्या दारापासून दोन-चार पावलें हापिसर पुढें सरकले मात्र; तोंच स्टँड-धरल्या मनगटावर काठीचा जबर तडाखा बसला. स्टँड खळकन पडला अन् फुटला. अधिकच अंधार झाला. त्या अंधारांत आभाळाच्या पार्श्वभूमी-वर हापिसरांना एवढेंच दिसलें कीं ३-४ माणसांनीं आपणास घेरलें आहे. निमिषांत त्या तिघां-चौघांनीं हापिसरावर भराभर घाव घालायला सुरुवात केली. बचावासाठीं डोक्यावरचे घाव उताण्या हातावर घेत घेत हापिसर भिंतीला भिडले. ह्यामुळें कांहीं घाव भिंतीला थटले. तरीपण बसलेल्या जबरदस्त मारानें हापिसर मटकन् खालीं कोलमडले. हापिसरांचा मुडदा पडला असावा अशी त्यांची कल्पना झाली असेल. इतका वेळ, त्यांच्यापैकीं जो एकजण दिंडीचें कुलूप काढण्यासाठीं कडीशीं खळखळ करीत होता त्याला

कुलूप कडींतून काढतां आलें. त्याबरोबर ते चौघे झटकन् पसार झाले; आणि कीर्तन सुटल्यामुळें परतणाऱ्या गांवकऱ्यांच्या लोकगंगेंत ते साळसूदपणें मिसळले.

त्या घायाळ अवस्थेंतहि हापिसर माजघरांत आले आणि दार लोटून, दाराला रेटा देऊन, हाका मारूं लागले—

"अरे मला मारलं! नानू, मला चोरट्यांनीं मारलं! नानू...नाऽऽनूऽऽऽ"

नानू पुढल्या दारीं, (ओसरीपलीकडल्या) सोप्यांत निजला होता. मागील-दारची खणाखणी ऐकूं येण्याइतका सोपा अगदींच चिकटून नव्हता. त्यामुळें तिकडे घडल्या प्रकाराची दाद पुढल्या दारीं झोपेंत असणाराला लागणें शक्य नव्हतें. पण त्याच्या नांवानें मारलेल्या हांका मात्र त्याला ऐकूं आल्या. पण तो आवाज ओळखीचा वाटला नाहीं—इतका तो बदलून गेला होता. म्हणून तो प्रथम झोपेंतच गुटमळला. पण पुन्हा आर्त हाका कानीं आल्या. "अरे मला चोरांनीं मारलं!" हें ऐकतांच झोपेचा अंमल उडून तो जागा झाला आणि घाबऱ्या-घाबऱ्या उठून, उशाचा कंदील मोठा करून तो माजघराकडे धावला. घरांतली इतर मंडळीही जागी झाली. गडबड ऐकून रस्त्यांतून जाणारे कीर्तनश्रोतेहि घरांत आले.

हापिसर रक्तबंबाळ झाले होते. त्यांना दारांतून अलीकडे घेतलें. मग मात्र, इतका वेळ त्यांनीं धरलेलें अवसान पार गळालें—त्यांना मूर्च्छा आली. त्यांच्या एका तळहातावर कुऱ्हाडीची बरीच खोल उभी जखम होती. कान-शिलाजवळहि कुऱ्हाड निसटती लागली होती. त्या जखमेंतूनहि रक्त वाहत होतें. दोन्ही बाहुटे भयंकर ठणकूं लागले. अनेक ठिकाणीं काठ्यांचे तडाखे बसल्यामुळें ती ती जागा काळीनिळी झाली होती. ते कण्हत होते. अंवतीं-भंवतींची मंडळी जमली. ज्यांना जे उपाय सुचले ते करण्यांत आले. कांहीं मंडळींनीं चोरट्यांचा शोध करण्यासाठीं धांवपळ केली. "नदीकांठानें जाऊन आलों, मळाहि धुंडाळला, पण कुठं कांहीं तलास लागला नाहीं." असें सांगत ती मंडळी आली.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३२७८२ दि: ५।३।७८
क्रमांक १०३८ प्रकरण क्रमांक: ७९१५२

उपचारासाठीं एखाद्या शहरीं दवाखान्याकडे जाणें भाग होतें. मिरजेची ह्या बाबतींत त्या काळीं विशेष ख्याती. मिरजेला हापिसरांचे आतेभाऊ न्यायाधीशाच्या हुद्यावर होते. तेव्हां, सोयीच्या दृष्टीनें मिरजेला जाण्याचा बेत पक्का झाला. बैलगाडींत भात्याण भरून मऊमऊपणा आणला. त्यावर गादी पसरली. आबदारपणासाठीं जास्तींत जास्त करतां येण्याजोगें होतें तें हें. सकाळींच बैलगाडी मसूर स्टेशनकडे निघाली. बरोबर नानू होताच. मसूर ते मिरज रेल्वे-प्रवास. मिरजेला सरकारी दवाखान्यांत हापिसरांना दाखल करून घेण्यांत आलें.

३

हापिसरांना मारहाण ! पाणवठ्यावर, तिकाटण्यांत, देवळांत, गांवांत, सर्वत्र हाच चर्चेचा विषय. कुणाच्या अघ्यांत ना मध्यांत ! नाकासमोर पाहून चालणारे ! सरळ ! सात्त्विक ! अजातशत्रु ! अशा गृहस्थावर कुऱ्हाड उगारावी ? कुणीं ? कां ? हेच त्या चर्चेतले मुद्दे असत, आणि जो तो आश्चर्य करी. झाल्या प्रकाराची तालुक्याला वर्दी देणें पोलीस पाटलाचें कामच होतें. त्याप्रमाणें वर्दी गेली. चौकशी सुरू झाली. फौजदार गांवांत येऊन गेले. हापिसर मिरजेच्या सरकारी दवाखान्यांत आहेत असें कळल्यावरून फौजदार मिरजेस आले.

दोन्ही खांद्यांवर काठ्यांचा मार बसल्यामुळें सांधे दुखावले आहेत. हातांत बळ नाहीं. भांडें धरणें, धोतर नेसणें, कपडे घालणें, असलीं कामेंहि हातांनीं होत नाहींत. संडासांत देखील दुसऱ्याची मदत घ्यावी लागते, इतकी परस्वाधीनता आली आहे. ह्या प्रकारची त्यांनीं नोंद केली. शिवाय, जखमावण वगैरेंचाहि तपशील, दवाखान्यांतल्या कागदपत्रावरून त्यांनीं मिळविला. "आम्हांला कांहीं जाब-जबाबहि घ्यायचे आहेत" असें फौजदार हापिसरांना म्हणाले. घडलेला प्रकार हापिसरांनीं सांगितला. प्रश्नोत्तरें झालीं तीं येणेंप्रमाणें :—

फौजदार :—तुमच्यावर हल्ला करणारे लोक किती असावेत ?

हापिसर :—अंधारांत आभाळाच्या अंधुक उजेडांत तीन-चार डोकीं दिसलीं.

फौजदार :—कोण होते ते ? ते चोर असावेत असं तुम्हांला वाटतं का ?

हापिसर :—चोर नसावेत. कारण, कडब्याच्या गंजीजवळ खुसपूस बराच वेळ चालली होती आणि मधूनमधून दारांतून कोणी तरी डोकावून पाहत आहे असा मला भास होत होता. त्यानंतर मी शौचाला नदीकांठीं जाऊन आलों. तास पाऊण तास तरी लागला असेल. त्यांना चोरीच करायची असती तर ती वेळ नामी होती; सारं कांहीं मोकळं होतं त्यांना. वसुलाची रोख रक्कम देखील माजघरांत उघडीच होती.

फौजदार :—मग ते मारेकरी असावेत ?

हापिसर :—छे हो ! माझ्यावर ? अन् मारेकरी ? काय कारण ?

फौजदार :—तुमचं कुणाशीं गांवांत वांकडं ? कुणा कुळाशीं वांकडं ?

हापिसर :—कांहीं, कांहीं नाहीं ! गांवांत कोणीदेखील माझ्या वाइटावर नाहीं. कुणा कुळाचंहि मीं कांहीं वाईट केलं नाहीं. कुळाच्या नडीअडचणी लक्षांत घेऊन त्यांच्या सोयीसवडीनं वसूल घेत आलोंय मी. थकलेल्या वसुलासाठीं मदतीच्या फिर्यादी कराव्या लागतात; पण त्या केवळ कायदेशीर इलाज म्हणून – म्हणजे कायदेशीर तरतूद म्हणून, टाइमबार होऊं नये म्हणून. कुळांचा छळ करून कधींहि वसूल केला नाहीं – उलट, तो मिळायची शक्यता नाहीं असं दिसलं तर, बाकीची सूट देऊन, त्यांना भर पावतीच देत आलों आहें.

फौजदार :—तुमचा कुणावर वहीम आहे का ?

हापिसर :—नाहीं, नाहीं, वहीमहि कुणावर नाहीं.

फौजदार :—तीं जीं तीन-चार डोकीं दिसलीं म्हणतां त्यांतलं कोणी ओळखीच्या सारखं वाटलं का ?

हापिसर :—तसंहि नाहीं. हातांतला दिवाच खळकन् फोडला त्यांनीं. मग काय ? अंधार ! तशांत म्हाताऱ्याची नजर !

फौजदार :—मग एव्हढी मारपीट कशासाठीं ? असा नाहीं का प्रश्न येत ?

हापिसर :—मी त्यांच्या वाटेंत आडवा गेलों म्हणून. दिंडीदरवाजाचा आडसर वाजला. मी बाहेर गेलों; तो बाहेर गेलों नसतों तर कशाला मारहाण झाली असती ? ते लोक कांहीं आंत घरांत घुसले नव्हते; ते बाहेर निघून जायच्याच बेतांत होते.

फौजदार:—पण मग तुमच्या मागीलदारीं तरी ते कां दबा धरून बसले होते?

हापिसर :—मी काय सांगूं ?

फौजदार :—तुम्हांला कांहीं सांगायचं नाहीं तर ?

हापिसर :—अहो काय सांगायचं ? कुणाचं नांव घ्यायला माझा कुणाशीं दावा नाहीं, कोणी माझ्या वाइटावर नाहीं. मी कुणाच्या तनसडीला शिवलों नाहीं. चोरी, चहाडी, शिंदळकी असलं कांहीं स्वप्नांतहि ठावें नाहीं. दारं लावतों घराचीं तीं देखील मनाची समजूत म्हणून. पण चोराला घरांत यायला पडकं कुसूं छान सोयीचं आहे दिवसासुद्धां खुशाल चोरी करतां येईल. घरांत माणसं ईन-मीन-तीन देखील नेहमीं नसतात. अन् घर एवढं लांबलचक आहे–तुम्ही पाहून आलां आहांच कीं !–तेवढ्या लांबींत रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला चार घरं आहेत चार. एवढ्या लांबलचक घरांत केव्हांहि कोणींहि चोरी करायची म्हटली तर आम्हांला दाद लागायची नाहीं. आतांच पाहा ना ! महिना झाला आम्ही इकडे आहों. तिकडे घरीं चोरी करणाराला किती नामी संधि ! पण कोण काय म्हणून माझ्या घरीं चोरी करील ? आतां मारहाण झाली ! झाऽली झालं ! त्यांना वाटलं असेल–'ह्या म्हातारबाबानं आपणांला ओळखलं तर नसेल ? चालवा कुऱ्हाड अन् पाडा मुडदा त्याचा ! म्हणजे मिटलं सारं !' ह्याशिवाय काय म्हणायचं ?

हे जाब-जबाब घेऊन फौजदार निघून गेले. प्रकरण अर्थातच फाईल झालें असावें.

गांवांतील लोक तर्कवितर्क करीत. हापिसरांच्या परसामधून पलीकडच्या वाड्यांत गुपचुप उतरायला वाट आहे. मारेकरी तिकडे जाणार होते. पण हापिसर झोपीच जाईनात. दिवा मंदपणानं जळत ठेवून वाचीतच राहिले.

९२५९०

राममंदिरांतलें कीर्तनहि सुटायची वेळ झाली. तेव्हां, आज कांहीं त्या पलीकडच्या वाड्यांतला डाव साधणार नाहीं, असं पाहून ती मंडळी बाहेर पडत होती दिंडी दरवाजानें. पण हापिसर पुढं झाले अन् हा प्रसंग ओढवला ! प्राक्तन झालं ! कुऱ्हाड चालायची होती कुणावर अन् चालली कुणावर ! पण त्यांतहि दैवाची खैर कीं भिंतीचा आधार घेतां आला म्हणून कांहीं वर्मी बसायचे घाव चुकले. कुऱ्हाड निसटती लागली कानशिलाजवळ; ती डोक्यावरच बसती तर ?

पण ह्या गांवगप्पांशीं हापिसरांना कांहींच कर्तव्य नव्हतें. त्यांचें मन शुद्ध होतें. झाल्या घटनेचें शारीरिक दुःख भोगणें आलें, हा मात्र प्राक्तनयोग. खांद्यांपासून बोटांपर्यंत दोन्ही हातांत आलेल्या दुबळेपणामुळें परस्वाधीनता आली. हळूहळू जखमा बऱ्या झाल्या. तेव्हां दवाखान्यांत राहावयाची आवश्यकता उरली नव्हती. ते गांवीं परतायच्या तयारीला लागले. न्यायाधीशांचा त्यांनीं निरोप घेतला. हापिसरांचा बहुतेक मुक्काम दवाखान्यांतच घडला होता. तथापि त्यांच्या बरोबर आलेला थोरला मुलगा आणि मधून मधून समाचारास आलेले परस्थ यांची सोय न्यायाधीशांच्या घरीं झाली होती. त्याचप्रमाणें जें जें कांहीं वेळोवेळीं लागलें-सवरलें त्याचीहि तरतूद तिकडूनच होत होती. त्यामुळें त्यांचा निरोप घेतांना हापिसरांचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें.

हापिसर गांवीं येऊन दाखल झाले. तांब्या-तपेली उचलतां येणें, धोतराच्या निऱ्या करून तें नेसतां येणें, कपडे घालतां येणें, ह्यांसारख्या व्यवहारांना हातांत जें बळ हवें होतें तें हळूहळू येत होतें. तितकें स्वावलंबन येतांच मुलगा नोकरीवर परत रुजू झाला. मिरजेचा मुक्काम न्यायाधीशांच्यामुळें सोयीचा झाला. त्यांना आपल्या पायीं बरीच तसदी पडली, ह्याची आठवण त्यांना सारखी येत होती; ती त्यांना स्वस्थ बसूं देईना. हात काम करूं लागतांच, त्यांनीं शेतचा उत्कृष्ट शाळू घोळून-पाखडून, एक पोतें भरलें. दुसरें पोतें भरलें भुईमुगाच्या शेंगांचें. आणि तीं दोन्ही पोतीं मिरजेला न्यायाधीशांच्या नांवें रेल्वेनें रवाना केलीं. तिकडून यथावकाश पोंच आली. हा माल

कां आला, ह्याची न्यायाधीशांनीं बरोबर कल्पना करून पत्रांत लिहिलें होतें कीं, " आपण ही इतकी तसदी कां घेतली ? मीं असं काय विशेष केलं ? आप्तस्वकीयाचा मामुली गृहस्थाश्रमधर्मच होता तो." त्यावर हापिसरांनीं उत्तरीं लिहिलें कीं," अहो, तसदी कसली ? आणि मी तरी असं काय केलं ? मी कोण काय करणार ? माझ्या पदरचा आहे का कांहीं तो माल ? आपल्याच आजोळचा आहे तो. माणसं थोर-मोठीं झालीं कीं आजोळीं येणं घडत नाहीं. म्हणून तो आपल्या आजोळच्या शेतचा नमुना पाठवला, इतकंच."

ऋणांतून शक्य तों मुक्त होत असावें, हाच हापिसरांचा स्वभावधर्म होता. तो त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हता. हें उत्तर लिहून झाल्यावर त्यांना किती समाधान वाटलें !

# : : १२

हापिसर आतां वयोमानानें थकत चालले होते. सारी ह्यात कष्ट करण्यांत गेलेली. सावकारी कांच तोडून टाकण्यासाठीं कष्ट करणें भागच होतें. तरीपण शरीरप्रकृतीनें त्यांना चांगली साथ दिली हे दैवाचे उपकारच म्हटले पाहिजेत.

प्रीणाति यः सुचरितैः पितरम् स पुत्रो
यद्भर्तुरेव हितमिच्छति तत्कलत्रम्
तन्मित्रमापदिसुखे च समक्रियं य
एतत् त्रयम् जगति पुण्यकृतो लभन्ते

असें एक सुभाषित प्रसिद्ध आहे. पुत्र, मित्र आणि कलत्र ह्या तिघांबरोबरच 'आरोग्य' ह्याचा उल्लेख व्हायला हवा होता; पूर्वजन्मींची पुण्याई असेल तरच आरोग्याचा लाभ घडतो, असें हापिसर म्हणत. कारण, सांभाळून, भिऊन वागणारेहि प्रकृतीबाबत कण्हत-कुंथत असतात, हें दिसतें. उलट, कांहींहि पथ्यपाणी न करतां, नेमस्तपणा न पाळतां, आणि खाणें-पिणें-जागणें ह्यांच्या बाबतीत वाटेल तसा अतिरेक करणारेहि प्रकृतीनें ठणठणीत असतात, असेंहि आपण पाहतों. ह्याचें कारण काय ? तेव्हां, "माझं आरोग्य खंबीर असणं हें पूर्वजन्मींचंच सुकृत" असें त्यांचें म्हणणें होतें.

ह्या त्यांच्या म्हणण्यांत तथ्य नव्हतें असें कसें म्हणतां येईल ? मेजवानीच्या वेळीं पंगतींत त्यांना आग्रह होई आणि त्याला ते यथास्थित तोंडहि देत. शिळेंपाकें खाऊं नये हा आरोग्यशास्त्रांतला दंडक. पण तो पाळणें गरिबांना शक्य नसतें; सणावारीं देखील आधीं शिळें संपवल्याशिवाय पक्वान्नाचा घास तोंडांत घालणें त्यांना झेपणारें नसतें. जागरणें करण्यांतहि ते माघार घेत नसत. चहाची त्यांची तहान प्रमाणाबाहेरच होती. चहा एक कपाहून अधिक घेतल्याशिवाय तो घेतलासा वाटत नसे आणि दिवसांतून कितीहि वेळां तो पिण्यास त्यांची तयारी असे. चार-चौघांत चहा पिण्याला स्पर्धेचें स्वरूप आलें तरी ते डरत नसत. 'चहा पिऊं नका' असा कडवा प्रचार करणारे डॉ. पटवर्धनासारखे राष्ट्रीय कीर्तनकार वर्षातून एखादी खेप त्या गांवीं घालीत असत. गांवांतल्या भोळ्या-भाविकाना त्यांचा केव्हढा धाक ! कारण, ते घरोघर हिंडून ही तपासणी करीत आणि जिथें खपेल असें त्यांना वाटे तिथें प्रसंगीं खडसावीतहि पण हापिसरांना त्यांची पर्वा वाटली नाहीं. ते म्हणत. "डॉ. पटवर्धनच काय, पण खुद्द महात्मा गांधी जरी मला उपदेश करायला आले तरी मी चहा पिण्याचें सोडणार नाहीं. इतकंच नव्हे तर, माझ्याकडे पाहून ते चहाचे प्रचारकच होतील." सारांश, खाण्या-पिण्यांत असा बेसुमारपणा असूनहि ह्यांतलें त्यांना कांहीं बाधलेलें दिसून आलें नाहीं. स्थूलपणा शरीरांत आला नव्हता, आणि

**दिसे ठेंगणी मूर्ति ही बावळीशी**
**बहू शक्ति पायांत हिंडे स्वदेशीं**

ह्या बहिर्जीच्या वर्णनातला फक्त ठेंगणेपणा वजा करून, बाकीच्यावर हापिसरहि हक्क सांगत होते.

थकल्या-भागल्या श्वशुराना करून घालण्यासाठीं अंबिकाबाईंची जरुरी होती. त्यामुळें नोकरीच्या प्रारंभकाळांत हापिसरांबरोबर त्या नसत तेव्हां हापिसर स्वहस्तेंच शिजवून खात. "वा: ! मास्तर, तुम्हांला स्वयंपाक सगळाच करतां येतो कीं !" असें कोणीं आश्चर्य व्यक्त केल्यास हापिसर म्हणतहि, "अहो, बीजगणित मला उत्तम येतं. युक्लिडचे सिद्धान्त सोडविण्यातहि माझा

ह'तखंडा आहे. मग स्वयंपाकाचा एव्हढा काय बागुलबोवा वाटायला हवा ?"

पण कामकाजाच्या गडबडींत स्वयंपाकाला कधींमधीं सवड सांपडली नाहीं तर ? ते म्हणत, " महाराजा, पोळ्या लाटायला फुरसत मिळाली नाहीं तर कच्ची कणीक खाऊनच मीं वेळ मारून नेली आहे ! " कोवळी कोवळी वाळू देखील पचवीन मी, अशी अतिशयोक्ति सुद्धां ते विनोदानें करीत.

असें होतें त्यांचें आरोग्य. ह्या आरोग्याचें माहात्म्य आल्या-गेल्यांना सांगणारी एक लांबलचक लाकडी फळी ओसरीवरच्या एका खांबाला त्यांनीं टांगून ठेवली होती. त्या फळीवर—

** सर्व संपत्तींत शरीरसंपत्ति श्रेष्ठ आहे **

असें सुभाषित त्यांनीं रंगविलेलें होतें. आरोग्याचें ऐश्वर्य ते उपभोगीत होते.

पण वयोमानानें त्याला ढळ पोंचणें नैसर्गिकच नव्हे काय ? तशांत अंबिकाबाई गेल्यापासून त्यांची उभारी एकदम आटली आणि हळूहळू अस्थमा उसळूं लागला. मारेकऱ्यांच्या तावडींत सांपडले होते तो प्रसंग तर जिवावरचाच. त्यांतून ते निभावले; पण त्या मारानें त्यांचें शरीर दुबळें झालें, खिळखिळें झालें. प्रतिकारशक्ति कमजोर झाली कीं दबलेले उपद्रव डोकें वर काढूं लागतात. चिलमीवाटे हापिसरांच्या शरीरांत दमा शिरला होता. ताकद होती तोंवर त्याला उमटायला अवसर मिळाला नाहीं. पण आतां ताकदीचें मान कमी कमी होऊं लागलें आणि दमा बळावूं लागला. विशेषतः सूर्योदयापूर्वीं त्याचा त्रास पुष्कळच होई. उषःकाल रम्य खरा; पण कुणाला ? निरोगी प्रकृतीच्या माणसाला ! दम्यानें ज्याला घेरलें आहे अशा वृद्धाला पहाटेची रम्यता काय होय ? त्यांनींच एका पत्रांत लिहिलें होतें, " विकार :—शरीरांत कफ तयार होणें व त्याचें विसर्जन केल्याशिवाय बरें न वाटणें. हा मुख्य आजार. रात्रींतून झोपेंत नरड्यापर्यंत, श्वासमार्गा-पर्यंत कफ भरून येतो. तंबाखू २।३ वेळां ओढून खोकला—ठसका मुद्दाम उत्पन्न करून तो सगळा कफ विसर्जन करावा लागतो, व मग श्वासोच्छ्वास नीट चालून दोन पावलें चालण्याची शक्ति येते. पुन्हा तोंड धुतांना राहिला-

साहिला कफ पडला म्हणजे मग तो दिवस सुरळीत सुरू जाहला. मधून मधून दिवसभरहि खोकावें लागतें – व कफ थुंकावा लागतो."

हापिसरांच्या जीवितांत ह्या अस्वास्थ्याचें पर्व सुरू झालें होतें. म्हणून त्यांच्या थोरल्या मुलानें (नानूनें) आपल्या नोकरीच्या गांवीं – पुण्याला (म्हणजे पुण्यालगतच्या येरवडयाला) येऊन राहण्याबद्दल त्यांना लिहिलें होतें. 'वर्षांतून कांहीं काळ इकडे घालवीत चला. इथें औषधोपचारहि करतां येतील' असे तो वरचेवर लिहीत असे. पण हापिसरांचा घरांतून पाय निघत नसे. एकदां त्यांनीं उत्तरीं कळविलें होतें कीं, "आमच्या प्रकृतीबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं. इतर (म्हणजे कफाखेरीज) आनुषंगिक कसलाहि आजार – विकार नाही. यामुळें आम्ही 'रिसीव्हिंग ऑफिसर'ला[१] कैक महिने चाळवीत राहणार. तुमचे मित्र कवि रानडे[२] असेच हुलकावण्या दाखवून अमुक करणार म्हणतात त्याप्रमाणें – असें कोणत्याशा मासिकांत, भिडे[३] B. A. यांनीं कोणत्याशा पुस्तकावर अभिप्राय देतांना नमूद केल्याचें – वाचल्याचें – आम्हांस आठवतें"..."तेव्हां, पाहूं केव्हांतरी सोयी–सवडीनें" असें ते म्हणत.

आणि आतां तशी सवड मिळण्यासारखी परिस्थिति होती. घरप्रपंच आणि शेतीभाती यांकडे आप्पानें लक्ष घालावें म्हणून त्यांनीं त्याला जवळ ठेवून घेतलेंच होतें. आणि त्याचीहि हें सारें अक्कलहुषारीनें सांभाळण्याइतकी ह्या कामांत प्रगति झाली होती. शिवाय "बघतील ज्यांचें तें! माझं काय आहे?" अशी विचारसरणी हापिसरांच्या अंतरीं बळावूं लागली होती. ह्या विचारानें त्यांनीं आपलें मनहि प्रपंचांतून हळूहळू काढून घेतलेंच होतें.

पुण्याला जायचा बेत त्यांनीं पक्का केला.

पुणें स्टेशनवर सकाळीं येणाऱ्या गाडीला हापिसर उतरले. त्यांची छाती भरून आलेली असते नेहमीं ह्या वेळीं. पण रात्रीं झोप न मिळाल्यामुळें कफ

(१) मृत्यूला. (२) प्रा. श्री. बा. रानडे. (३) टीकाकार कै. बा. अ. भिडे.

दाटायचें प्रमाण आज कमी होतें. शिवाय वेळच्या वेळीं खोकून कफाचा निकाल आज प्रवासांत झाला होता. त्यामुळें, नेहमीं जसा जीव टांगल्यागत होत असे तशी आज अवस्था झाली नव्हती.

नेहमींप्रमाणें सामानाचें बोचकें त्यांच्याबरोबर होतेंच. तेव्हढें ओझें सहज वाहून नेण्याचे आतां त्यांचे दिवस नव्हते खरे; पण हमालावांचून निभावून नेण्याचा त्यांचा मानस कायम होता. त्याप्रमाणें ते स्टेशनबाहेर आले आणि बोचकें खालीं उतरून ठेवून त्याला टेकून बसले. लगेच टांगेवाल्यांनीं त्यांच्या-भोंवतीं गर्दी केली. पण त्यांच्याशीं बोलणें करण्यापूर्वी त्यांना थोडा विसांवा घेण्याची आवश्यकता होती.

त्या वेळीं पुणें स्टेशनचें स्वरूप आजच्यापेक्षां किती तरी निराळें होतें. उतरून बाहेर आलेल्या पॅसेंजराला घेऊन टाकण्यांत पुण्याचे टांगेवाले फार वाकबगार. रिक्शा, टॅक्सी यांचा त्या काळीं जन्म झालेला नव्हता. त्यामुळें उतारूंवर एकमेव हुकमत चालविणारे आपणच, असा टांगेवाल्यांचा रुबाब होता त्या काळीं ! बिचारा उतारू त्यांचें भक्ष्यच होय. कितीक टांगेवाले हापिसरांभोंवतीं गोळा झाले. भोळा, खुळा किंवा अर्धाकच्चा माणूस सांपडला कीं त्याला त्यांनीं गिळंकृत केलाच ! हापिसरांचा खेडवळ, गबाळा अवतार पाहून टांगेवाल्यांना अवसान चढलें.

" काय म्हातारबाबा ! कुठं जायचं ?"

" चला आजोबा, मला हाय ठावं ! बिनचुक नेतों बगा. ठरवायचं काय ? समजून द्या म्हणजे झालं ! इतकं लांब जायचंय !"

" दोन रुपये देतां ? चला !" एकामागून एक एक जण आपलें घोडें पुढें दामटीत होता.

" मी सांगूं ? दोन आणे कमी द्या ! मग तर झालं ? तिकडची स्वारी मिळणार नाहीं न् कांहीं नाहीं !"

" म्हातारबाबा, त्यो काय सांगतोय ? त्याचं नगा ऐकूं. एकच सांगतों बगा—दीड रुपाया पडल ! दुसऱ्याला मात्र देऊं नगा बगा !"

अशा रीतीनें त्या टांगेवाल्यांनीं त्यांना घे-काहूर केलें. पण हापिसरांनीं

एकदांच सांगून टाकलें होतें, "बारा आणे देईन. वायफळ बोलायला न् घासाघीस करायला मला नाहीं बळ !"

आजोबा बघत नाहींत, आपलाच सवाल धरून बसलेत हें पाहून आणि विशेषतः त्यांचा तो अवतार पाहून, त्यांची टिंगल करण्याची टांगेवाल्यांना स्फूर्ति झाली. पुणेरी टांगेवाल्यांचीं ख्याति होतीच तशी.

"काय रे गंप्या ? कुठं जायचंय म्हातारबाबाला ?" इतका वेळ ज्यानें तोंड उघडलें नव्हतें असा एक जण आपणाला कांहीं माहिती नाहीं अशा आविर्भावानें पुढें आला. "काय म्हनत्याती ?"

"अरे, मासन कंपनीकडे जायचं हाय त्यांना ! जातोस का घेऊन ? देत्याल आख्खी पावली ! "

"अरे, पावली कशाला होवी ? तूं बी लेका बनवतोस होय, भोळं मानूस पाहून ? चवली दिली तर तुझं रं काय बिघाडलं ? जा घेऊन ! "

"हा शिदू नेईल चवलीला ! –काय रं शिदू ?"

"चवली तरी कशाला गा ? एक आणेली पुरी नाहीं व्हय ? जा कीं मर्दा !"

"आजोबा, तुम्ही काय ऐकताया ह्या समद्यांचं. मी नेतों तुमास्नी... चला...तसंच !"

उपरोधाचे हे एकेकांचे उद्गार हापिसर निवांतपणानें ऐकत होते. 'पासिंजर' फुकट नेण्यापर्यंत चेष्टेनें मजल गांठली तेव्हां आतां आणखी कांहीं बोलायला कुणाला उरलें नसेल असें पाहून, बोचक्याला टेकून बसल्या बसल्या, अंगावरचें उपरणें पाठीमागून घेऊन गुडघ्यासभोंवार गुंडाळत हापिसर म्हणाले,

"गड्यांनो, कां उगाच तोंडची वाफ दवडतां ? ही वाफ फुकट दवडून इथं माझी चेष्टा करीत बसाल अन् इतर स्वाऱ्या मात्र दवडून बसाल ! मला काय ! आजवर तुमची ख्याति नुसतीच ऐकत होतों; आज आपण होऊन ती खरी करून दाखवतां – मला पाहायला काय बिघडलं ! भाड्याचं नाहीं जमलं अन् मला इथंच बसून राहावं लागलं तरी माझं नुकसान कांहींच नाहीं. मी कुठंहि बसून राहिलों तरी माझा दिवसाचा 'रुपया रोज'

कुठंहि मला मिळेलच – त्याला बूड नाहीं. पण तुम्ही मात्र माझी चेष्टा करीत बसलांत तर पॅसेंजर गमावून बसाल. इतर टांगेवाले स्वाऱ्या घेऊन जातील. माझी चेष्टा करण्यानें तुमचा धंदा चालणार असेल तर मग खुशाल चालूं द्या. माझी हरकत नाहीं !"

हापिसर आणखीनच बोचक्याला रेलून बसले.

टांगेवाले चांगलेच वरमले आणि एकेकानें काढता पाय घेतला.

## : : १३

नोकरीवर असलेले हापिसरांचे हे थोरले चिरंजीव होते कारकून. पेशा हलका असला कीं तो हलकेपणा लपविण्यासाठीं, पेशा व्यक्त करणारा मराठी शब्द वापरण्याऐवजीं इंग्रजी शब्द वापरायची त्या वेळीं चलाखी करीत असत. हलकेपणामुळें वाटणारा संकोच टळतो आणि उलट शिष्टपणा दाखवतां येतो, अशी सोय होती इंग्रजी शब्दप्रयोगांत ! माझ्या बायकोनें हा गळपट्टा विणला असें सांगायचें झाल्यास, खरें म्हणजे, 'बायको' ह्या शब्दाबद्दल लाज वाटायचें काय कारण ? पण 'वाइफ्' (Wife) म्हणण्यांत त्या काळीं जरा ऐट वाटत होती. 'कारकून' शब्दाबद्दल 'क्लार्क' म्हणवून घेण्यांतहि ह्याच प्रवृत्तीची साक्ष मिळते. पण नाना [बाळपणचा नानू आतां कर्तेपणीं नाना म्हणून संबोधला जाऊं लागला होता.] क्लार्क म्हणूनहि ओळखले जात नसत. ते ज्या कचेरींत होते तिथें 'क्लार्क' ऐवजीं 'रायटर' हा शब्द – कसा कुणास ठाऊक – रूढ होता. त्याच परंपरागत किताबानें नाना ओळखले जात होते.

वडिलांना बोलवून घेण्यांत रायटरांचा हेतु इतकाच होता कीं, जरा हवा-पालट होईल आणि कांहीं औषधोपचारहि जमल्यास करतां येतील.

हापिसर जाणून होते कीं हा दमा आतां आपला अखेरपर्यंतचा सोबती आहे – तो औषधांना बुजून बाजूला होणारा नसून अधिकाधिक सलगीच

करीत जाणार. पण प्रपंचाच्या दृष्टीनें बारा महिने तेरा काळ खेडेगांवांतच गुंतून पडण्याची आतां त्यांना विशेष गरज उरली नव्हती. तेव्हां कांहीं दिवस इकडे व कांहीं दिवस तिकडे, अशी दोघांहि मुलांकडे त्या त्या ठिकाणच्या सोयीनुसार कालक्रमणा करायला काय हरकत होती ? रोज पहाटे दाटून भरून येणारी छाती मोकळी करण्यासाठीं खोकतांना जी उरस्फोड करावी लागते तिच्यांतले कांहीं हिसके कमी पडले तर तेव्हढीच सोय, अशा कल्पनेनें उपचार करायलाहि त्यांची ना नव्हती.

आणि एक दिवशीं त्यांची प्रकृति दाखविण्यासाठीं रायटर त्यांना डॉक्टराकडे घेऊन गेले. तपासणी झाली. बाकी कांहीं प्रकृतींत दोष नाहीं; फक्त त्रास काय तो अस्थम्याचा, हें स्पष्टच होतें.

" आपण मिल्क इंजेक्शन्स देऊन पाहूं. शिवाय रोज पोटांत घ्यायलाहि औषध सांगेनच." डॉक्टर रायटरना म्हणाले. अर्थात् हॉपिसरांनाहि म्हटल्यागत तें भाषण होतेंच.

" डॉक्टर, शक्तीचं मान हळूहळू कमी होत आहे." हापिसर म्हणाले. " सकाळीं खोकून खोकून कफाचं विसर्जन होईपर्यंत इहलोक अन् परलोक ह्यांच्या हद्दीवर मी घुटमळत असतों. खोकायला वळ ज्या दिवशीं कमी पडेल त्या दिवशीं आम्ही त्या जगांतले रहिवासी झालों म्हणून समजावं ! तेव्हां तें बळ वाढायला हवं—वाढायचं नाहींच म्हणा आतां; पण टिकायला तरी हवं ! तरच निभाव आहे ! "

" त्यासाठीं टॉनिक सांगतों कीं ! " डॉक्टर म्हणाले, आणि त्यांनीं रायटरना खुणावून एका बाजूला बोलवून घेतलें. कांहीं सल्ला द्यायचा झाल्यास हापिसरांना तो आवडेल कीं नाहीं ह्याचा अंदाज घेतल्याशिवाय एकदम उच्चार करून उगाच एखाद्याच्या भावना दुखविणें बरें नव्हे, हा डॉक्टरांचा हेतु. पण रायटरनीं त्यांना सांगितलें, " तसं कांहीं बुजायचं कारण नाहीं. He is quite open-minded. "

" काय म्हणताहेत डॉक्टर ? " हापिसरांनीं विचारलें.

" आपली हरकत नसल्यास मला एक सुचवायचं आहे ! " डॉक्टरांनीं आदबीनें प्रस्तावना केली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रमांक ........ प्रकरण क्रमांक ९९२ ........
क्रमांक ........ नों दि ........

" बोला ना. तुम्ही संकोच करायचं कारण नाहीं, अन् त्यांतून औषधोपचाराबद्दलच सांगणार ना ? मग हो काय ? जमण्यासारखं असेल तर करून पाहीन."

" टॉनिकबद्दल मी म्हणतों–" डॉक्टरांनीं खुलासा केला. " आपण कधीं घेतलं कीं नाहीं कोण जाणें ! म्हणून जरा 'कसं सांगावं' हा प्रश्न ! "

इतक्यांत चहा आला. डॉक्टर आणि रायटर ह्यांचे संबंध केवळ औषधांपुरतेच नव्हते. कांहीं स्नेहभाव नांदत होता त्यांच्यांत. आणि म्हणूनच त्या स्नेहभावापोटीं आस्थापूर्वक सल्लामसलत आपणांस लाभेल, हाच हापिसरांना इथें घेऊन येण्यांतला उद्देश.

" सूप घ्याल का ? " मध्येंच डॉक्टरांनीं हिय्या केला. " तें आपल्या प्रकृतीला चांगलं मानवेल, शक्तिपात थांबेल. पचायला जड नाहीं. चव देखील वाईट लागायची नाहीं."

" चवीचा प्रश्न नाहीं, डॉक्टरसाहेब ! " हापिसरांनीं चटकन् निर्वाळा दिला. " वाटेल तितकं कडू किंवा जहाल घ्यायला माझी जीभ सरावली आहे. कोणींसं सांगितलं होतं म्हणून मी रोज दोनदोन चमचे रॉकेलसुद्धां पिऊन पाहिलं कांहीं दिवस ! पण 'सूप' हा काय प्रकार आहे ? कशाचं असतं तें ?"

" लिव्हर सूप म्हणतों मी." डॉक्टर म्हणाले. " मळमळसुद्धां वाटणार नाहीं. आपण कढी किंवा सार पितों इतकंच वाटेल तुम्हांला ! आयतं मिळण्याची देखील सोय केली आहे एका औषध-विक्रेत्यानं ! "

आतां हापिसरांच्या लक्षांत आलं कीं हां मांस-मासकणाचा प्रकार आहे. तेव्हां ते म्हणाले,

" डॉक्टरसाहेब, आपण माझ्या हिताचंच सांगत आहां. आणि चैन करायचीय अशांतला कांहीं प्रकार नाहीं. आणि 'बाटलों, धर्म बुडाला' असें मानणारा मी नाहीं. कांहीं खाण्यापिण्यानं धर्म बुडावा इतका कांहीं तो काड्या-मोड्यांचा नाहीं ! शिवाय 'औषधं जान्हवीतोयम्' ह्या भावनेनं कांहींहि घ्यायला मी कचरणार नाहीं. खेड्या-पाड्यांत जन्म गेला असला तरी मी हेकट कर्मठ नाहीं–तसला सोवळेपणा मानणारा नाहीं. तेव्हां निषिद्ध

म्हणून समजली गेलेली वस्तु औषध म्हणून घ्यायला संकोच कसला ? पण–"

हापिसरांना फार बोलत बसायची हौस नसे. पण प्रसंग पडला तर ठामपणानें मत व्यक्त करण्याची त्यांची रीत असे. 'पण' हा शब्द लांबटपणें उच्चारून त्यांनीं एक दीर्घ श्वास सोडला व किंचित् विसांवा घेतला; आणि मग ते पुढें बोलूं लागले.

"तेव्हां, काय म्हणतों मी,–हां! डॉक्टर, तुम्ही सुचवितां त्याला तशी माझी हरकत नसली तरी प्रश्न आहे तो हा कीं, तें घेतल्यानं मला कितीसा फायदा होईल ? होईल, कांहीं तरी उपयोग होईलच; नाहीं असं नाहीं ! पण त्याला तरी मर्यादाच राहणार. मी झालों पिकलं पान ! लवकरच गळून पडणार !

हे काळानळाच्या कुंडीं
घातली लोणियाची उंडी
माशी पांखू पाखडी
तंव हें सरे ।

[ज्ञानेश्वरी १३–११०३]

हें सर्वकाळचें सत्य मी पुराणिकाच्या थाटानं सांगतों असं नव्हे, तर मला हें स्पष्टच दिसतंय. सूप घेतल्यानं फार तर इतकंच होईल कीं गळून पडणं पांच-चार महिने पुढं ढकललं जाईल ! होय कीं नाहीं ? मग, हयातभर जी जीभ विटाळली नाहीं ती केवळ पांच-चार महिने अधिक जगायच्या लोभानं कशाला विटाळूं ? लांब मुदतीच्या भाडेपट्ट्याची शक्यता असती तर गोष्ट वेगळी होती. ज्या जमिनीचा कबजा आज नाहीं उद्यां सोडून द्यावाच लागणार तिला खतपाणी घाला कशाला ?–हां ! हा दृष्टान्त म्हणूनच घ्यायचा बरं का ? वाच्यार्थानं नव्हे ! जमीन सोडून द्यायची झाली तर नासाडी करून सोडून द्यावी, असली क्षुद्र व्यवहारबुद्धि मीं नाहीं बाळगली कधीं ! पण ही 'जमीन' ज्याची त्यालाच ! एकानं सोडून दिली म्हणजे

दुसऱ्या कुणाला कसतां येते, असं नाहीं ! हें तुम्हीहि, माझ्यासारख्या गांवढळाहूनहि, चांगलं जाणतां. तेव्हां म्हणतों, जिथं कशाचीच शाश्वति नाहीं तिथं आजवरचं श्रेय तरी कशाला गमावून बसूं ! सूप घेतोंय याची मळमळ वाटणार नाहीं; पण श्रेय गमावून बसलों ही मात्र मळमळ वाटेल ! थोडक्यासाठीं जाणूनबुजून जीभ नको विटाळायला ! थोडें उरलें; कळ सोसावी !”

डॉक्टर रायटरकडे बघत होते. मुलाच्या आग्रहानें कदाचित् हापिसर विरघळतील, हा त्यांच्या बघण्याचा अर्थ असावा. पण मुलगा जाणून होता कीं ह्या विरक्ताच्या विचारसरणीला जगण्याच्या आशेनें सुद्धां मुरड पडणें शक्य नाहीं, तिथं आपल्या रदबदलीचा काय पाड ?

:: १४

थोरल्या चिरंजीवाकडे पुण्यास – म्हणजे येरवड्यास येऊन राहण्यानें हवापालट व थारेपालट घडतो हाच खरा फायदा, असें हापिसर म्हणत. पण आणखी एक समाधान त्यांना मिळत असे.

थोरल्या मुलाचें शिक्षण युनिव्हर्सिटी स्कूल फायनलपर्यंत झालें होतें. तेवढ त्याला शिकवलें, हेंच हापिसरांच्या ऐपतीच्या मानानें पुष्कळ झालें होतें. त्यांच्या नोकरीच्या अखेरीला तो इंग्रजी चौथींत होता. त्यावेळीं निवृत्तीमुळें कमाई निम्म्यानें घटली होती. त्या काळीं खेड्यांतल्या मुलांना इंग्रजी शिक्षणासाठीं शहराकडे धांव घ्यावी लागे. मुलाला परगांवीं शिकायला ठेवल्यामुळें उचलून रोख पैसे दरमहा धाडावे लागत. तेंच त्यांना अवघड जात होतें. पण तेवढी तड गांठायलाच पाहिजे होती. ती गांठल्यावर त्यानें नोकरीला लागावें, असें ठरलें होतें. तेंच आवश्यक होतें. कारण त्याच्या कॉलेज शिक्षणाचा भार त्यांना कसा पेलता येणार ? म्हणून तो नोकरीला लागला होता.

पुढें त्यांचा तिसरा मुलगा भास्कर मॅट्रिक झाला. त्या वेळीं त्याला कॉलेज-शिक्षण द्यायची ऐपत आली होती अशांतला भाग नाहीं. पण मॅट्रिक झाल्याबरोबर त्यानें नोकरीला लागावें, तर तसा तो वयानें लहानच होता. सोळाव्या वर्षींच नोकरीचें जूं त्याच्या मानेवर बसावें, हें हापिसरांना बरें वाटेना. "थोरला मुलगा शहरांत नोकरीला आहे. त्याच्याजवळ राहून कॉलेजचं

काय एखादें वर्ष त्याला लाभेल तेवढेंच ! ‘ माझा मुलगा कॉलेजांत जातो ’ असं तर मला म्हणतां येईल ही त्यांची भावना. ह्या भावनेनें त्यांना आंतरिक सुख-समाधान मिळणार होतें. त्याप्रमाणें, येरवड्याला जवळ असलेल्या डेक्कन कॉलेजांत त्याचें नांव घालण्यांत आलें. पालकांचें उत्पन्न तुटपुंजें, ह्या पात्रतेमुळें त्याला फीची माफी मिळाली. आणि मॅट्रिकच्या परीक्षेंत प्रथम श्रेणीचे गुण त्याला मिळाले होते, ह्या लायकीमुळें त्याला स्कॉलर्शिपहि मिळाली. [बाकीची पूर्तता व पाठपुरवणी होईल घरून असें गृहीत धरलें होतें.] येणेंप्रमाणें येरवड्याला थोरल्या मुलाजवळ राहून धाकट्याचें कॉलेज-शिक्षण सुरू झालें. ह्या घटनेनें हापिसरांना किती समाधान वाटलें ! ‘ बजेटांतील प्रतिवार्षिक तुटीमुळें प्रपंचाची स्थिति ’ कशी झाली आहे ह्या-संबंधीं एका पत्रांत त्यांनीं सविस्तर लिहिलें होतें. पण त्याच ओघांत त्यांनीं म्हटलें होतें कीं,

“ सध्यांच्या काळीं भास्करनें आपलें शिक्षण सेल्फ-सपोर्टिंग ठेवलें आहे ही जगदंबेची स्पेशल कृपा – पैसे व भूषण, दोन्ही गोष्टी. ”

अशा मुलाची दिनचर्या प्रत्यक्ष पाहण्याचें समाधान मिळवावें, हाहि येरव-ड्याला येऊन राहण्यांतला एक फायदा हापिसर मनांतल्या मनांत मानीत.

थोरल्या मुलाच्या बिऱ्हाडासमोरच आवाराच्या दुसऱ्या बाजूला वरिष्ठांचा बंगला होता. वरिष्ठांचा पगार दरमहा आठशें रुपये. त्यांचा मुलगाहि डेक्कन कॉलेजांत जात असे. तो भास्करच्याच वर्गांत होता. बड्या पगारदाराच्या दारीं मोटर असे. बंगला आणि डेक्कन कॉलेज ह्यांत अंतर तसें बरेंच होतें. स्वाभाविकच तो मोटरीनें जा-ये करी.

अंतर जरी बरेंच असलें तरी हापिसरांना घरबसल्या कॉलेजची इमारत दिसत असे. आणि बिऱ्हाडांतून उठून बाहेर रस्त्यावर आल्यास, तहत कॉलेजपर्यंतचा सबंध रस्ताहि नजरेंत येत असे. भास्कर कॉलेजच्या वाटेला लागला कीं थकल्या-वांकल्या देहयष्टीचे हापिसर, काठी टेकीत टेकीत त्याच्या मागोमाग रस्त्यापर्यंत येत व रस्त्याकडेच्या एका पांढऱ्या दगडावर विसांवत. आणि तेथून पाठमोऱ्या भास्करकडे, तो कॉलेजच्या आवारांत शिरून दृष्टी-

आड होईपर्यंत, पाहत बसत. " आठशें रुपये पगारदाराचा मुलगा कॉलेजांत जातो आणि – त्यांच्या दशांशानेंहि प्राप्ति नसलेला मी – माझाहि मुलगा कॉलेजांत जातो " ह्या भावनेची लाट त्यांचा ऊर भरून टाकी आणि तिनें कंठहि दाटून येई. कफानें कंठ दाटून येण्यानें होणाऱ्या क्लेशावर हा उतारा होता. येरवड्याला येऊन राहण्यांत हें नेत्रसुख आणि समाधान ते लुटीत होते, हें टॉनिक त्यांना मिळत होतें.

" काय एखादं वर्ष लाभेल तेव्हढंच ! " अशा भावनेनें भास्करच्या कॉलेज-शिक्षणाला सुरुवात झाली खरी, पण मग तें तेव्हढ्यावरच थांबलें नाहीं. पहिलें वर्ष संपलें आणि त्या परीक्षेंतहि त्यानें आपलें गुणस्थान कायम ठेवलें. " शिकूं द्या त्याला. कशाला आजच नोकरीचा कांच ? निभेल तितकं निभेल ! " ह्या विचारसरणीनें बळ धरलें व त्याचें शिक्षण चालूं राहिलें. फ्रीशिप व स्कॉलरशिप टिकविण्यासाठीं त्याला झटून अभ्यास करावा लागे. अर्थात् तो त्याचा स्वभावच होता. त्याचीं अभ्यासाचीं पुस्तकें जाडजूड; आणि देहयष्टि बरीच बारीक ! हापिसरांच्या दृष्टींतून ह्या गोष्टी निसटणें शक्य नाहीं. तो चिकाटीनें अभ्यास करतांना पाहून ते कळवळून, वात्सल्याच्या उमाळ्यानें कधींकधीं म्हणत, " किती डोकं खुपसून बसतोस ! दे तीं पुस्तकं फेकून बंडगार्डनच्या डोहांत ! " येरवड्याचा मुक्काम संपवून गांवीं परतल्यावर ते पत्रांतूनहि लिहीत,—

> " मेंदूला विशेष ताण देऊं नये असें भास्करला कळवावें. व्यायाम व खेळ – व घुडगूस – यांत कांहीं वेळ घालवावा. बाकीचा वेळ स्टडीला पुरे – तो स्कॉलरशिप मिळविण्यास – टिकण्यास पुरे होईल – काळजी न कर्तव्यं। मेंदू शांत ठेवतव्यं। "

> " आरोग्य व शक्ति पैदा करणें—1st
> " अभ्यास करणें – मागाहून — 2nd

एकदां मे महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीची वार्ता पत्रांतून हापिसरांना कळविली ; तेव्हां त्यांनीं उत्तरीं कळविलें :—

" भास्करचे कॉलेज सुट्टीबद्दल लिहिलें तें समजलें. सुट्टी ऐसपैस आहे – तेव्हां त्यानें घाई करणेचें कारण नाहीं. – रमत गमत इकडे कधींहि यावें, तेथें मोकळ्या अंगानें नाटक-सिनेमा-सभा वगैरेकडे कांहीं दिवस खर्चावे. ...कॉलेंजमधला काळ जितका मजेदार – तजेलदार – व उत्साहजनक असतो तितका पुढील आयुष्यांत (मूठ अगर मुठी भरून पगार मिळूं लागला तरी) लाभणें नाहीं."

होतां होतां भास्करच्या कॉलेज-शिक्षणाची नौका बी. ए. च्या किनाऱ्याला आली. बी. ए. च्या परीक्षेच्या वेळींहि हापिसरांचा मुक्काम येरवड्यालाच होता. ती परीक्षा आटोपली. " चला आतां घरीं (गांवीं) जाऊं " असा दोघांनीं बेत केला.

हापिसरांच्या प्रकृतीचें गाडें घसरगुंडीला लागलें होतें. 'घरीं जाऊन पडावें' असें त्यांचें म्हणणें. नानूनें सुचविलें कीं " इथं आणखी कांहीं उपचार करतां येतील. " पण हापिसर म्हणत –

" औषधाची भावभगत झाली आजवर. आतां काय नवीन बघायची राहिली आहे ? खाल्लेल्या अन्नाचं रक्त कांहीं होत नाहीं; कफच होतो. अशीच भट्टी आंत पक्की तयार होऊन बसलीय. खोकून खोकून इतकी उरस्फोड करावी लागते कीं आतां जगण्यांत हाशील उरलं नाहीं. आणि हें बघ, आतां जगणं महाग पडतंय. कफ इतका दाटून भरून येतो कीं रोज सकाळीं जिवाची घालमेल होते. उद्धाम होतो जीव. खोकायलाहि आतां बळ नाहीं. असं जगून मिळवायचं काय ? तर, रोजीं एक रुपया ! छे छे, आतां जगणं महाग पडतंय ! "

ह्या त्यांच्या विचारसरणीपुढें कोण काय युक्तिवाद करणार ?

ते आणखीन् म्हणाले –

" माझे वडील शेवटच्या दुखण्यांत आजारी होते. पायाला जखम झाली होती आणि ती चरत चरत चालली होती. आम्ही त्यांना मिरजेला घेऊन गेलों. उपचार करायचे तितके केले. कांहीं गुण येईना. जखम चिघळत चालली. पाय काळानिळा पडत चालला. सध्यांसारखीं त्या वेळीं डॉक्टरी शास्त्रांत प्रगति

झाली नव्हती. डॉक्टर कांहीं बोलेनात. लक्षण ठीक दिसेना. काय समजायचं ते भाऊ समजून चुकले. अन् ते म्हणाले, "आतां इथं थांबणें नको. मला घरीं घेऊन चला. माझ्या आढ्याखालीं मला मरूं द्या." हापिसर बोलतां बोलतां थांबले. किंचित् विसांवा घेतला त्यांनीं. आणि पुन्हा बोलूं लागले, "माझीहि पण तीच इच्छा आहे."

ह्या उद्‌गारांतला निर्वाणीचा सूर ऐकून मुलांच्या मनांत कालवाकालव होणारच. पण, प्रवासाची मजल अशा ठिकाणीं आली होती कीं, पुढचें क्षितिज दिसूं लागलें होतें. तें अटळ होतें. तें सृष्टिक्रमानेंच घडत होतें. शेवटीं "भास्करच्या परीक्षेचा रिझल्ट ऐकायला नाहीं थांबत ?" असें नानूनें विचारलें. पण ह्याहि सूचनेला ते वश झाले नाहींत. भास्करच्या कॉलेज शिक्षणाचें त्यांना कौतुक होतें; तें त्यांनीं अनुभवलें होतें. आतां ठरवलेल्या बेतांत बदल करायचें कारण नव्हतें. साऱ्याच गोष्टींतून मन हळूहळू काढून घेण्यांत त्यांची खंबीर व निश्चयी प्रकृति इतकी यशस्वी होत आली होती कीं, कसल्याच प्रलोभनाने ती माघार घेणें शक्य नव्हती. ते म्हणाले, "काय ऐकायचाय रिझल्ट ? मला तो माहीतच आहे. कोणता क्लास मिळणार एव्हढाच काय तो प्रश्न. पण त्यासाठीं इथं कशाला रेंगाळायला हवं ?"

केल्या बेताप्रमाणें भास्कर आणि हापिसर गांवीं दाखल झाले.

हापिसरांची प्रकृति खालीं-खालीं घसरत चालली होती. गेल्या दोन वर्षांत हें विशेष दिसून येत असे. मधून-मधून ऋतुमान बदलायच्या वेळीं त्यांना दोन-तीन दिवस ताप येई. ताप प्रासंगिक असल्यामुळें तो उतरेहि. पण त्यांत जी शक्ति कमी होई ती पुन्हा भरून येत नसे. अशा रीतीनें ते खंगत चालले होते. हिंडणें-फिरणें संपुष्टांत आलें होतें. अंगणांतल्या एखाद्या ओंडक्यावर किंवा कसल्या तरी ढिगाऱ्यावर येऊन बसणें, एवढीच काय ती मोकळी हवा ते घेऊं शकत होते. असेंच एकदां ते अंगणांत हवा खात बसले असतांना गणूदादा आले; आणि गांवबातम्या व शिळोप्याच्या गप्पागोष्टी

सुरू झाल्या. हापिसरांचें प्रकृतिमान हाहि विषय ओघांत निघाला.

"गणूदादा, आतां मुक्काम आवरत आला बरं का !" हापिसर म्हणाले.

"जिवाला खंत वाटत असेल ? साहजिक आहे. जगांतून पाय निघणं कठीण." गणूदादा.

"नाहीं रे बाबा. कधींच तयारी करून बसलों आहें निघायची. जगायचा आतां तिळमात्र मोह उरला नाहीं." असें म्हणून हापिसर किंचित थांबले; आणि आठवल्यासारखा आविर्भाव करून पुन्हा बोलूं लागलें, "हां ! नाहीं म्हणायला, अजूनहि जगावंसं जर कशासाठीं वाटत असेल तर माणसाचे जे एक एक अजब नमुने आढळतात ते पाहायसाठीं. तसंच जगांत जे एक एक कल्पना गुंग करून टाकणारे शोध लागत आहेत ते वाचायला मिळतात म्हणूनहि जगावंसं वाटतं. अगदीं ओळखीच्या माणसाचा स्वभावहि आपण समजतों त्यापेक्षां किती कमालीचा विचित्र, रहस्यमय असतो; कल्पना करवत नाहीं. त्याचे प्रकार पाहतांना वाटतं कीं जगांत जगण्याचा मोह पडावा अशी जर कोणती अवीट चीज असेल तर अनुभवास येणारा मनुष्यस्वभाव."

"तरी पण, हापिसर, काळजी करतांय तुम्ही, असं दिसतं ! बाकी, बरोबरच आहे ! तसा काय मुलांचा संसार रांकेला लागलाय ? माईच्या संसाराची ती तशी परवड..!" गणूदादा सहानुभूतिपर बोलून गेले.

त्यावर हापिसर म्हणाले, "नाहीं गणूदादा. कुणाची कांहीं काळजी करीत नाहीं मी. पाहील सगळ्यांकडे नानू." हें म्हणतांना ते अगदीं शांतचित्त होते. हापिसरांच्या ह्या मुक्तावस्थेचा ग्रामस्थ बंधूंना अचंबा वाटे. शेवटच्या घटकेपर्यंत संसारांत गुंतून असलेले, घोटाळत असलेले, लिडबिड-लेले लोक अंवतींभंवतीं थोडे कां दिसतात ! पण हापिसरांचें मन अगदीं निरासक्त, अगदीं अलिप्त झालें होतें.

आणखी पंधरा-तीन वार गेले. पुन्हा थोडा ताप आला हापिसरांना. भास्कर क्षेमसमाचाराचीं पत्रें वेळोवेळीं नानूला पाठवीत असे. त्यांत हा समाचार त्यानें कळवला. आठवड्याची रजा घेऊन नानू आला. हापिसर अंथरुणांत होते. माजघरांत त्यांचें अंथरूण होतें. ह्या माजघराशीं अनेक

भल्या-बुऱ्या घटनांचा संबंध होता. त्यांच्या वडिलांचें जेव्हां प्राणोत्क्रमण झालें होतें तेव्हां उत्तरेकडच्या भिंतीला लागून त्यांचें अंथरूण होतें. अंबिकाबाईनीं देह ठेवला तो ह्याच माजघरांत – दक्षिणेकडच्या भिंतीशीं. ह्या पानिपताच्या – ह्या तीर्थक्षेत्राच्या मधोमध आतां हापिसर निजले होते. नेहमींप्रमाणें औषध चालूंच होतें. ताप निघाला, तथापि अशक्तता पुष्कळच आली होती. मदतीशिवाय अंथरुणाबाहेर येत्रवत नव्हतें. घरांत वातावरण एकंदर गंभीरच होतें. रविवार उजाडला. नानूची आठवड्याची रजा आजच्यानें संपली. सोमवारीं कामावर रुजू व्हायला पाहिजे. रविवारीं मध्यरात्रींची गाडी मसूरला पकडायची म्हणजे सायंकाळीं तरी घरून निघायला हवें होतें. तसा बेत ठरला.

रविवारीं तिसऱ्या प्रहरीं हापिसर म्हणाले, "भास्कर, मी जरा ओसरीवर बसतों."

विधीसाठीं मागीलदारीं किंवा अंगणांत आपल्या पायांनीं जाण्याइतकेंहि त्यांच्या अंगांत त्राण नव्हतें. उचलूनच त्यांना न्यावें लागे. पण 'मी ओसरीवर बसतों' म्हणण्यांत तसल्या प्रकारची कांहीं निकड दिसत नव्हती. मग आवर्जून ओसरीवर बसायचें हें काय त्यांच्या मनांत आलें, याचें नवल वाटलें. भानावर नसल्यासारखें कांहीं ते बोलत नव्हते; चांगली शुद्ध होती. तेव्हां मनांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे, हें उघड होतें. लगेच त्यांना ओसरीवर आणलें. शेजारच्या खोलींत आंब्याची अढी होती. उभ्या हयातींत यंदाच कबजांत आलेल्या जमिनींतला हा आंबा; प्रथमच घरीं आला होता.

"आप्पा," क्षीण आवाजांत हापिसरांनीं हाक मारली आणि म्हणाले, "अढींतले एक घमेलंभर आंबे आण बघूं." आप्पानें तसें केलें. "हे आंबे गणूदादाकडे पोंचते करून ये आणि दुसरं एक घमेलं भरून नारायणरावाकडे पोचते कर. माझ्याबरोबर, तुझ्याबरोबर ह्या मंडळींनीं पायपीट केली आहे, (कोर्ट-कचेऱ्यापायीं). तेव्हां प्रथम त्यांच्याकडे नमुना पोंचता व्हायला हवा."

ह्या सांगण्यांत निरवानिरव करावी असा भाव होता; आणि ती निरवानिरव डोळ्यांदेखत व्हावी, मागें कांहीं राहायला नको, ही तळमळ दिसत

होती. तात्काळ आप्पानें तसें केलें. गणूदादा आणि नारायणराव यांचीं घरें अगदींच शेजारीं होतीं. आप्पा परत आल्यावर हापिसर म्हणाले, " आतां अंबाबाईला नैवेद्य दाखीव आणि एक आंबा मला कापून दे. " आप्पानें अंबाबाईला नैवेद्य दाखवून आंब्याच्या फोडी करून त्यांच्यापुढें ठेवल्या. हापिसरांनीं एक फोड उष्टावली. त्यांच्या निस्तेज चेहऱ्यावरहि समाधानाची छटा झळकत असल्याचें दिसून आलें. " आतां पडतों मी " असें ते म्हणाले. त्यांना उचलून परत माजघरांतल्या अंथरुणावर निजवण्यांत आलें. इतकें होईतों नानूची निघायची वेळ झाली. वडिलांच्या पायथ्याशीं वांकून नमस्कार करून त्यानें त्यांचा निरोप मागितला.

" ठीक आहे ! " हापिसर म्हणाले. " प्रकृतिमान कळवतीलच तुला. " मुलगा गांवाला जायला निघाला. आपली अशी तोळामासा तब्येत. तथापि स्थितप्रज्ञाप्रमाणें त्यांनीं त्याला निरोप दिला.

आपल्या खोलींत शेजारीं कोणीं निजावें, हें त्यांनाच पसंत नसे – आजारी होते तरीहि ! म्हणून लगतच्या पडवीवर, माजघराच्या दाराशींच आप्पा व भास्कर निजले होते – रात्रीं कानोसा घेत होते. एकदोनदां रात्रीं भास्करच्या मदतीनें ते मागीलदारीं जाऊनहि आले. पुन्हा आपापल्या अंथरुणावर जे ते झोपीं गेले. पहाटे उठून ते खोकूं लागले कीं साऱ्यांना जाग यायची. पण तसे त्या पहाटेस ते खोकायला उठले नाहींत. त्यामुळें सोमवारीं सकाळीं आप्पा आणि भास्कर यांना स्वाभाविकच जेव्हां जाग आली तेव्हां त्यांनीं आंत डोकावून पाहिलें तों—

हापिसर पोटींशीं गुडघे घेऊन उशीवर डोकें ठेवून पालथे निजले होते. कफानें छाती भरून येई तेव्हां ते रोज असेच निजत. " एक दिवशीं असाच मी कायमचा निजलों आहें, असं तुम्हांला दिसून येईल." हे त्यांचे उद्‌गार आठवले. ते आज तंतोतंत पटले होते.

' दुसऱ्याच्या ऋणांत राहायचं नाहीं ' म्हणून अहर्निश तडफडणारा, पितृ-ऋणांतूनच केवळ नव्हे, तर सर्वांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं हयातभर धडपडणारा जीव, पंचमहाभूतांचा देह – ज्यांचा त्यांच्या स्वाधीन करून

परलोकीं प्रयाण करता झाला होता. शुद्ध होती तोंपर्यंत – प्रयाणाच्या अखेरच्या घटकेपर्यंत, आठवणीनें शेवटचें देणें देऊन निजधामास गेला होता. कशांतच त्यांचा जीव अडकून राहिला नव्हता; भास्करच्या परीक्षेचा आठां दिवसांवर आलेला निकाल ऐकायलाहि तो थांबला नाहीं.*

सुखी कोण ?

अनृणी आणि अप्रवासी.

हापिसर नेहमीं हें बोलून दाखवीत. पण इहलोकीं जन्माला येणें हाच मुळीं प्रवास आहे आणि जन्माला येणारा ऋणें घेऊनच आलेला असतो. हापिसरांनीं ऋणांची पुरेपूर फेड केली होती; आणि प्रवास संपला होता. ऋणमुक्ताला फिरून प्रवास नाहीं. हापिसर अखेर सुखी झाले होते; चिरसुखांत विलीन झाले होते !

* दि. २८ ६-१९२८

# परिशिष्टें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 3292 वि: २२।
क्रमांक 903 २।२५२

# भीमराव नाटक

[ सुप्रसिद्ध जर्मन कवि शिलर यांनीं केलेल्या रॉबर्स या नाटकाच्या आधारानें शिवराम महादेव परांजपे यांनीं हें नाटक रचलें. Manohar Press, Poona City. १९०७, किमत १२ आणे. ]

हें पुस्तक वाचून सुचलेले विचार.

(१) सदरहू पुस्तक तुमच्या पुस्तकांत थोरल्या कपाटांत आढळलें. वाचिलें.

(२) परांजपे यांनीं जर्मन पुस्तकावरून रचिलें किंवा जर्मनीचें इंग्रजींत रूपांतर जाहलें असून त्या रूपांतरावरून रचिलें ? ते M. A. आहेत. त्यांना इंग्रजी येतें.–जर्मन भाषा त्यांस अवगत आहे काय, कळत नाहीं.

(३) पुस्तकांत उठावदार विचार, सडेतोड भाषा व मनुष्यस्वभावाशीं एकतानता पावणें, व अस्खलित विचारसरणी, हीं पाहतां सदर कवि शेक्सपियरच्या तोडीचा दिसतो. त्याच्या नाटकाचें रूपान्तर इंग्रजींतच काय पण अनेक युरोपियन भाषांत जाहलें असावें.

(४) परांजपे हे मराठी भाषा मार्मिक व ठसकेदार लिहितात. जाडे विद्वान् आहेत. या दृष्टीनें त्यांनीं रचना चांगली केली आहे, मग भाषेविषयीं त्यांना निराळें सर्टिफिकिट कशाला पाहिजे ? तथापि ती तशी भाषा वाचीत असतांहि तो चांगुलपणा परांजपे यांस न देतां शिलर याचीच भाषा व विचार मुळांत उठावदार आहेत असें मनांत वागतें – वावरतें – व वावरलें.

(५) मला वाटतें, ' काळ 'पत्र सुरू असतां या पुस्तकाची जाहिरात त्या पत्रांत असे – घरचेंच भांडवल !

(६) हें नाटक एखाद्या कंपनीनें हातांशीं घेऊन रंगभूमीवर आणिल्याचें ऐकिवांत नाहीं. कदाचित् कर्त्याचा (परांजपे यांचा) तसा मुळांत हेतु नसेलहि – व त्यामुळें त्या दिशेनें प्रयत्न जाहला नसावा.

(७) पुस्तक रंगभूमीवर यावयाला माझ्या मतें आणखीहि कांहीं – कांहीं कां ? बऱ्याच अडचणी – नडी आहेत. त्या क्रमशः मी खालीं देतों—

(अ) पायका टाइपांतलीं १७८ पृष्ठें एव्हढा कथाभाग स्टेजवरून ओढून काढावयाला दोन रात्री पाहिजेत – १५।१६ तास पाहिजेत – इतका वेळ एका जागीं बसून राहणेंत प्रेक्षकांच्या चहापानाची सोय कशी लागणार ?

(आ) दुसरी हरकत :—सबंध भाकडकथेंत स्त्रीपात्र अवघें एक. बरें तें तरी रसिक – चवचाल – तमाशांतल्या पोऱ्याप्रमाणें उत्तान शृंगारचेष्टित असावें, तर तसेंहि नाहीं. एका भीमरावावर सावित्रीप्रमाणें अढळ प्रेम बाळगणारे व त्याचा संबंध फक्त खंडेराव तिचें मन वळवितो त्या दोघांचे मात्र बोलण्यांत. तेथलें सर्व भाषण] शृंगाररसवर्जित, सडेतोड व वेदान्ती. प्रेक्षकांना त्यांत कुतूहल तें काय ? सगळेच प्रेक्षक लॉजिकचे प्रोफेसर नसतात; ग्राम्य आणि हुच्च (भिकू ×××, महादू ×××) अशासारख्यांचाच भरणा अधिक.

(ई) कोणतेंहि नाटक, पौराणिक कां असेना ? १०-५ स्त्रीपात्रें- त्यांचे प्रवेशावर प्रवेश – अभिनयावर अभिनय अशाखालीं स्टेज पुनीत जाहल्याखेरीज त्या नाटकांत रम्य तें काय ? का ती लोकमान्यांची स्मशानयात्रा आहे ? तात्पर्य, नाटक, कथा, पुराण, लग्नसमारंभ अगर कसलाहि धार्मिक समारंभ, उत्सव, मेळे, वनभोजनें, काय पाहिजे तें असो – बैलगाडीचा ७।८ मजलींचा कुचंबत वाट चालणारा कष्टतर प्रवास

असो – ज्यांत स्त्रियांचें मिश्रण नाहीं तो प्रत्येक प्रकार पूर्वोक्त स्म. या. ! शिलर बिचारा अगदींच कसें विसरला येशू जाणे !

(उ) नाटकांत सगळे रस असावे लागतात. त्यांत शृंगार-हास्य-विनोद हे प्रमुख. यांचाच या नाटकांत अभाव. स्वदेशप्रीति, धीरोदात्त विचार, नीच मनुष्याचा पापी स्वभाव, या तीन रसाचांच सर्वत्र रगाडा आहे. कोकण्या – दरोडेखोराचें एक पात्र – त्याची भाषा अस्सल कोंकणी असल्यामुळें ३।४ सेकंदें प्रेक्षकास जरा मजा वाटेल अशा प्रकारचें कांहींसें आहे.

(ऊ) या कामांत खाडिलकर बेटा धूर्त आहे. विदूषकी थाटाचीं २-३ पात्रें बळेंच घुसडून द्यावयाचीं. चवचाल बायकांचेहि कांहीं प्रवेश दाखवायचे. कांहीं विनोद–कांहीं थट्टा–कांहीं भामटेगिरी, सर्व कांहीं नाटकांत बळेंच खेचून भरावयाचें तरच प्रेक्षक खूष होणार–व शाळेंतील मुलें अभ्यासाचीं पुस्तकें विकून नाटकाचें तिकीट विकत घेणार.

ह्या सर्व प्रकार तुम्हांस विदित करण्याचें कारण तुमचें पवनगड नाटक अशा प्रकारचें 'पंचभेळ खिचडी' वजा असेल तरच तें रंगभूमीवर जगून राहील, नाहींतर अल्पायुषी होईल याचा विचार करावा. × × × × ×

नाटक रचणारानें दुसरी एक गोष्ट लक्षांत बाळगावी लागते ती ही कीं, नटवर्गास नाटक करून दाखविणेंत त्यांची ओढाताण होऊं नये, दगदग विशेष पडूं नये, परस्परभिन्न असे १७-१५ वेष क्षणोक्षणीं घेणें भाग पडूं नये, भलतेच अवघड देखावे, जे स्टेजवर करून दाखविणें क्लेशदायक असे देखावे, असे प्रसंगच फार आणूं नयेत. मी वर्गाच्या शिक्षकास नेहमीं सांगत असें कीं, तुम्ही आपल्या वर्गाचें टाईमटेबल असें बसवा × × × × ×

शेवटल्या अंकांत गरुडपुराणांतला कथाभाग आणिला आहे. पुवाच्या नद्या, रक्ताचा चिखल, नरककुंडें–हा मजकूर व खंडेरावाच्या बुद्धीला

पडलेला पालट, एका साधुमहाराजाशीं त्याचा वादविवाद, हा भाग छाट देण्यासारखा आहे.

वस्तुत: छाट देणें गैर; स्वारस्य कमी होतें. पण वेळ मोजका, तेव्हां कसें करायचें !

मीं कोठें जाहिरात वाचली, १००० पानांची मराठी अरेबियन नाईटची संक्षिप्त आवृत्ति २००-३०० पानांची कोणींशीं काढिली.—मीं ती पाहिली नाहीं—पण मला तेव्हांच वाटलें कीं अशानें कादंबरीचें स्वारस्य गेलें असेल. साध्या गोष्टींत गोडी नाहीं—त्या पाल्हाळांत असते. तो पाल्हाळ मात्र 'कादंबरी' या कादंबरीप्रमाणें नसावा. त्यांत—

असा असा त्या राजाचा घोडा होता—वर्णन ३ पानें.

राघू असा असा होता —वर्णन २॥ पानें

हा प्रकार कंटाळवाणा. ही कादंबरी आम्हीं मराठींत वाचली होती. प्रस्तावनेंत भाषांतरकार म्हणत होते कीं, मूळ संस्कृतांतलीं पाल्हाळिक वर्णनें कटशॉर्ट आम्हीं केलीं आहेत. मला वाटतें मुळांतलीं वर्णनें वाचून गुदमरायला होत असेल. बाकी बाणभट्टाची ती भाषा असल्यामुळें भाषासौष्ठव या दृष्टीनें रसिक तिचें कौतुकच करतात.

'संदेश'कार अ. ब. क. "५०'० रुपये पुन्हा एकदां" म्हणून २३ कॉलम मजकूर खरडतात. नरसूनेना पुराण १३३ कॉलम त्यांनीं लिहिलें तरी आणखी ८३३ कॉलम लिहावयास त्यांची लेखणी कंटाळणार नाहीं—निव्वळ भाषेवरील प्रभुत्व—अगर अरेरावित्व—

तात्पर्य, अशाप्रकारें नटवर्गाची गैरसोय होऊं नये. नाटक ५।४ तासांत—काय तुमची योग्य टाईम असेल त्यांत खलास जाहलें पाहिजे.

नाटक लिहावयाचें असल्यास, साध्य असल्यास, तशी महत्त्वाकांक्षा असल्यास, तितकी पात्रता आपली आहे अशी जाणीव व आत्मविश्वास असल्यास त्या प्रयत्नास लागावयाचें.

मध्यंतरीं संगीतहि घुसडलेलें असावें. गद्य नाटक पुरणपोळीचें जेवण,

संगीतमिश्र नाटक पक्वान्नाचें जेवण, असें मानण्याचा प्रघात पडला आहे.

गडकरी-विनोद पाहिजे व खाडिलकरी टवाळी व विदूषकाचें काम भागविणारीं—नमक-चमक शास्त्र्यांप्रमाणें काहीं पात्रें पाहिजेत. 'भूत तुझ्या उरावर का तूं भूताच्या उरावर' हा चावटपणा उथळ खरा; पण हा पसंत आहे असेंच प्रेक्षक फार. वाढणाराची आवड पाहावयाची नाहीं, जेवणाराची. दुकानदाराची आवड पाहावयाची नाहीं, गिऱ्हाइकांची पाहावयाची.

भीमराव उगीच नांवाला पुढें केला आहे...तुमच्या इंग्रजी वाचण्यांत असें एखादें चटकदार पुस्तक असल्यास त्या आधारानें नाटकरचना झाल्यास पाहावी हा मथितार्थ.

इंग्रजी ग्रंथकर्ते अशाप्रकारें रूपांतर करण्यास परवानगी मोठ्या आवडीनें देतात. मराठी कादंबरीकारच दिवाणी कोर्टांत देखील जाऊन भांडतात—भांडतील. बाकी सगळे चोर—उष्ट्या पत्रावळी चाटणारे—स्वयंस्फूर्तीचा एक नाहीं.

92890
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३५७२ दि: २५।३५
क्रमांक २०३८
REFBK-0012410

[हापिसरांनं ... ठेल्यो पत्राबरोबरै
हा लेख घ... ...]

इदं हि ब्रम्हाण्डं सकलभुवनाभोगभवनं
तरंगैर्यस्यान्तर्लुठति परितक्तिन्दुकमिव ।
स एष श्रीकण्ठप्रविततजटाजूटजटिलो
जलानां संघातस्तव जननि पापं हरतु नः ॥

हापिसरांचें हस्ताक्षर – एका पानावर एक श्लोक ह्याप्रमाणें सबंध 'गंगालहरी' हापिसरांनी उतरून काढली होती. "आम्हां विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेण्यासाठीं ह्या हस्तलिखित गंगालहरीचा उपयोग करण्यांत आला होता," असें प्रा. श्री. बा. रानडे सांगतात. विद्यार्थी संस्कारसंपन्न व्हावेत ह्यावर हापिसरांचा भर असे.